सोलापूर तरुण भारत


www.dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर बुधवार, ०८ मे २०२४ | वर्ष दुसरे | अंक ४७ | पाने : ८ | किंमत रु. ६/-




## रुपाली चाकणकरांविरोधात गुन्हा दाखल



मुंबई : लोकसभा निवडणुकीसाठी आज देशभरात तिसऱ्या टप्प्यातील मतदान पार पडले. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अंतिम निर्णयानुसार, संपूर्ण देशभरात ईव्हीएम मशीनच्या आधारेच मतदान प्रक्रिया पार पडत आहे. त्यामुळे आता ईव्हीएम मशीनच उमेदवाराचं भवितव्य ठरवणार आहे. मात्र, यामुळे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर अडचणीत सापडल्या आहेत. त्यांनी चक्क या ईव्हीएम मशीनची पूजा केली. त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आपल्या देशात धर्मनिरपेक्ष लोकशाही आहे. मात्र, रुपाली चाकणकर यांनी ईव्हीएम मशीनवर धार्मिकरित्या ओवाळणी करत पूजा केल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. सिंहगड पोलीस स्टेशनमध्ये या प्रकरणी कारवाई करण्यात आली आहे.

# ४ जूननंतर कॉंग्रेस इंडिया आघाडी कालबाह्य होणार : पंतप्रधान




त.भा. वृत्तसेवा/अभय ललवाणी

अहमदनगर : देशामध्ये लोकसभा निवडणुकीचे तिसऱ्या टप्प्यातील मतदान पार पडत आहे. यादरम्यान भारतीय जनता पार्टी व महायुतीला जनसामान्यांचे मोठे समर्थन मिळत असल्याचे चित्र असून ४ जून रोजी लोकसभा निवडणूकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर कॉंग्रेस इंडिया आघाडी कालबाह्य होणार असल्याचा घणाघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला.

भाजपा महायुतीचे अहमदनगरचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील व शिर्डीचे उमेदवार खा. सदाशिवराव लोखंडे यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विराट महाविजय संकल्प सभा अहमदनगर शहरातील सावेडी उपनगरात पार पडली, त्यावेळी श्री मोदी बोलत होते.

कॉंग्रेस इंडिया आघाडीकडे कोणताच मुद्दा शिल्लक राहिलेला नसून ४ जून नंतर कॉंग्रेस व घटक पक्षाची इंडिया आघाडी वाळूच्या किल्ल्यासारखी ढासळेल अशी टीका श्री मोदी यांनी यावेळी केली. आपल्या भाषणात श्री मोदी पुढे म्हणाले की, कॉंग्रेस आघाडीचा जाहीरनामा हा मुस्लिम लीग प्रमाणे झालेला असून भाजपा महायुतीचा जाहीरनामा हा विकास, गरीब कल्याण, राष्ट्रीय सुरक्षा, देशाचा स्वाभिमान - सन्मान यावर आधारित असून कॉंग्रेस इंडिया आघाडी यापैकी एकाही विषयावर बोलत नाही. आतंकवादाची तसेच २६ / ११ रोजीच्या हल्ल्यातील कसाबची पाठराखण करणाऱ्या कॉंग्रेस इंडिया आघाडीच्या उमेदवारांना आपण निवडून देणार का असा सवाल देखील श्री मोदी यांनी यावेळी उपस्थितांना केला. कॉंग्रेसने गेली ५० वर्षे केवळ गरिबी हटविण्याची खोटी आश्वासने देऊन गरिबांचा विश्वासघात केला आहे. याउलट भाजपा मोदी सरकारने देशामध्ये ४ कोटी पक्की घरे, ५० कोटी गरिबांचे जनधन बँक खाते, प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेअंतर्गत ३ लाख कोटी, पिक विमा योजनेअंतर्गत दीड लाख कोटींची नुकसान भरपाई दिली आहे. याचबरोबर गेल्या दहा वर्षांमध्ये सुरक्षा व विकासाची गॅरंटी आम्ही दिली आहे. कॉंग्रेसने जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवलेली कामे आम्ही प्राधान्याने करीत आहोत. विकासाच्या माध्यमातून महाराष्ट्राचे चित्र देखील बदलत असून अहमदनगर ते सोलापूर महामार्गाचे काम, शहराभोवतीच्या बाह्यवळण रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे. साई भक्तांच्या सुविधेसाठी मुंबई - शिर्डी वंदेभारत रेल्वे सुरू करण्यात आली असून यामुळे पर्यटनास चालना मिळून रोजगार निर्मिती होणार आहे. अहमदनगर जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पासाठी भरीव निधी उपलब्ध करून देण्यात आलेला असून निळवंडे धरणामुळे नगर व नाशिक जिल्ह्यातील गावांना सिंचन सुविधा उपलब्ध होणार आहे. शेतकरी कल्याणाला आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेअंतर्गत ३० हजार कोटी रुपये थेट खात्यात वर्ग करण्यात आलेले आहेत. येणाऱ्या काळात नारीशक्तीला अधिक सक्षम करण्यासाठी ३ कोटी महिलांना लखपती दीदी बनवण्याची योजना असल्याचे यावेळी श्री मोदी यांनी सांगितले.

या महाविजय संकल्प सभेस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड, मंत्री दादाजी भूसे, आ. राम शिंदे, आ. मोनिकाताई राजळे, आ. संग्राम जगताप, माजी मंत्री मधुकरराव पिचड, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले, माजी आ. बाळासाहेब मुरकुटे, भाजपा युवा नेते विक्रम पाचपुते तसेच भाजपा महायुतीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## वयोवृद्ध, दिव्यांगांना मतदान केंद्रापर्यंत ने-आण करण्यासाठी वाहन व्यवस्था

छत्रपती संभाजीनगर, दि.७ (जिमाका):- लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्ह्यात १३ मे रोजी मतदान होणार आहे. मतदानासाठी येणे व जाणे दिव्यांग, वयोवृद्ध मतदारांना सोईचे व्हावे यासाठी विनामूल्य वाहन व्यवस्था करण्यात आली आहे. १०९ औरंगाबाद (पूर्व) विधानसभा मतदार संघाचे सहा. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कळविल्यानुसार मोहल्ला १) किरादपूरा- राममंदिर, २) शहागंज - हिंदी विद्यालय, ३) नारेगाव पेट्रोलपंप, ४)गारखेडा सुतगिरणी चौक, ५) सिडको एन ६ चौक चिस्तीया कॉलनी रोड या पाच ठिकाणी ही वाहने दि.१३ रोजी सकाळी सात ते सायं. साडेपाच वा. पर्यंत उपलब्ध करण्यात आले आहे. या वाहन सेवेचा लाभ घेण्यासाठी मतदारांनी सक्षम प वर जाऊन वाहना करीता नाव नोंदणी करावयाची आहे. ही नावनोंदणी दि.११ मे रोजी सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत करता येणार आहे. तरी मतदारांनी आपली नाव नोंदणी करावी,असे आवाहन सहा. निवडणूक निर्णय अधिकारी १०९- औरंगाबाद (पुर्व) विधानसभा मतदार संघ यांनी केले आहे.

# माढ्यात मतदाराने ईव्हीएम पेटवलं, तरुण पोलिसांच्या ताब्यात



सोलापूर : राज्यात आज लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातील मतदान सुरु आहे. मतदाराकडून ईव्हीएम मशीन पेटवण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना घडली आहे. मतदान केंद्रावरील अधिकाऱ्यांनी तरुणाला पोलिसांच्या ताब्यात दिलं आहे. सांगोला तालुक्यातील बादलवाडीमधील ही घटना समोर आली आहे. सांगोल्यातील बादलवाडीत मतदाराकडून ईव्हीएम पेटवण्याचा प्रयत्न करण्यात आला. मतदान केंद्रावरील अधिकाऱ्यांनी तरुणाला पोलिसांच्या ताब्यात दिलं.

मतदाराकडून इव्हीएम पेटवण्याचा प्रयत्न

एका तरुणाने मतदान करताना ईव्हीएम पेटवण्याचा प्रयत्न केला. याचा व्हिडीओ आता समोर आला आहे. मतदारकेंद्रावरील संबंधित अधिकाऱ्यांना या व्यक्तीला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिलं आहे. ईव्हीएम पेटवण्यामागचं नेमकं कारण काय, हे अद्याप समोर आलेलं नाही. मिळालेल्या माहितीनुसार, एका मतदाराने ईव्हीएमवर पेट्रोल टाकून आग लावली. ईव्हीएमला आग लावल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

तरुणाला पोलिसांच्या ताब्यात

माढा मतदारसंघात येणाऱ्या सांगोला तालुक्यातील बागलवाडी येथील मतदारकेंद्रावरील हा प्रकार समोर आली आहे. दुपारी तीन वाजताची ही घटना आहे. या घटनेमध्ये दोन ईव्हीएम आणि सोबत असलेले बॅलेट हे तांत्रिक साहित्य जळालं आहे.

पेट्रोल टाकून ईव्हीएम पेटवलं

एका व्यक्तीने ईव्हीएमला आग लावल्यानंतर मतदान केंद्रावर एकच गोंधळ उडाला. दुसऱ्या एका व्हिडीओमध्ये एक व्यक्ती पाण्याने ईव्हीएमला लागलेली आग विझवण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे. या घटनेमुळे नवीन ईव्हीएम मशीन येईपर्यंत काही काळ मतदान थांबवावं लागले. या घटनेनंतर मतदान केंद्रावर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

प्रणिती शिंदे विरुद्ध राम सातपुते

सोलापूर लोकसभा मतदारसंघात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सुशील कुमार शिंदे यांच्या कन्या आणि सोलापूर शहर मध्य मतदारसंघातून तीन वेळा आमदार राहिलेल्या प्रणिती शिंदे या कॉंग्रेसच्या उमेदवार आहेत. तर महायुतीकडून भाजपचे राम सातपुते यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यात आलं आहे.

## टपाली मतदानाचे मतदान केंद्र जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यान्वित

छत्रपती संभाजीनगर, दि.७ (जिमाका):- लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्ह्यात १३ मे रोजी मतदान होणार आहे. त्यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याव्यतिरिक्त इतर १० लोकसभामतदार संघातील कर्मचाऱ्यांनी ज्यांची नियुक्ती मतदाना संदर्भातील कामकाजासाठी झालेली आहे अशा सर्व कर्मचाऱ्यांचे मतपत्रिका पाकीट जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाले आहे. तरी या अधिकारी- कर्मचारी यांनी टपाली मतपत्रिका कक्ष येथे सकाळी ९ ते सायं.६ दरम्यान येऊन टपाली मतदान करावे असे आवाहन करण्यात आले हे. तसेच जिल्ह्यात कार्यरत पोलीस अधिकारी कर्मचारी, राज्य राखीव पोलीस दल, होमगार्ड तसेच १८- जालना लोकसभा मतदार संघातील पोलीस अधिकारी कर्मचारी ज्यांची नियुक्ती छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आहे त्यांनी फॉर्म नं. १२ भरुन दिलेला असल्यास त्याची अनुज्ञेयता तपासून पात्र ठरलेले अधिकारी- कर्मचारी टपाली मतदान करण्यासाठी टपाली मतपत्रिका कक्षात दि.८ ते दि.१२ या दरम्यान सकाळी ९ ते सायं.६ वा. पर्यंत येऊन आपले मतदान करावे,असे आवाहन करण्यात आले असल्याचे टपाली मतदान नोडल अधिकारी प्रभोदय मुळे यांनी कळविले आहे.

# मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले की, अहमदनगरचं नाव अहिल्यानगर होणारच : देवेंद्र फडणवीस



अहमदनगर : नरेंद्र मोदी हे तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले की, अहमदनगर शहराचे नाव अहिल्यानगर होणारच, असा विश्वास राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. आज अहमदनगर लोकसभा मतदारसंघाचे भाजपचे उमेदवार सुजय विखे पाटील आणि शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार सदाशिव लोखंडे यांच्या प्रचारार्थ महायुतीची सभा पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. यावेळी ते बोलत होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पंतप्रधान मोदींचे अहिल्यानगर मध्ये स्वागत करतो. २०१४ आणि २०१९ ला याच मैदानावर मोदींची सभा झाली होती. त्यापेक्षा अधिक रेकॉर्ड ब्रेक गर्दी यंदा झाली आहे. या जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर करण्याचा निर्णय झालाय. मोदी पुन्हा पंतप्रधान झाले की, त्यांच्या आशिर्वादाने लवकर जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याचा आमचा प्रयत्न

ते पुढे म्हणाले की, निळवंडे धरणातून दुष्काळी भागाला पाणी देण्याचे आमचे नियोजन आहे. देशातील ४ महामार्ग नगर जिल्ह्याला जोडले आहेत. जिल्ह्यात ४ एमआयडीसी होणार आहे. मोदींच्या आशिर्वादाने जिल्ह्याची ओळख औद्योगिक जिल्हा म्हणून होईल. येत्या काळात शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याचा आमचा प्रयत्न आहे, अस त्यांनी म्हटले.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### जिल्हयाचे तापमान ४२.६ अंशावर

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्ह्यात तापमानात दिवसेंदिवस वाढ होत असून शनिवारी (दि.०४) ४२.६ अंश सेल्सिअस एवढ्या तापमानाची नोंद करण्यात आली.

मागील अनेक दिवसांपासून तापमानात वाढ होत आहे. उन्हाळ्या तीव्र झळा जाणवत आहेत. वातावरणात प्रचंड उकाडा निर्माण झाला असून नागरीक कमालीचे हैराण झाले आहेत. जिल्ह्यात उन्हाच्या झळा दिवसेंदिवस अधिक तीव्र होत असून शनिवारी (दि.४) तापमानाचा पारा ४२.६ अंशावर पोहाचल्याने नागरिकांना उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागत आहे. विशेष बाब म्हणजे आज नोंदवलेले हे तापमान यंदाच्या उन्हाळ्यातील सर्वाधिक तापमान आहे.

### श्री.रेणूकामाता मल्टीस्टेटच्या लोन मेळाव्यास प्रतिसाद

**परभणी,/प्रतिनिधी:** श्री रेणुकामाता मल्टीस्टेट को-ऑप. अर्बन क्रेडीट सोसायटी अहमद नगर शाखा परभणी येथे शुक्रवार ३ मे रोजी आयोजित केलेल्या लोन मेळाव्यास चांगला प्रतिसाद मिळाला असून यापुढे सोमवार ते शनिवार अशी वर्षभर तात्काळ लोन सुविधा ग्राहकांसाठी उपलब्ध करण्यात आली आहे, अशी माहिती शाखाधिकारी संदीप वाघमारे यांनी दिली. श्री रेणुकामाता मल्टीस्टेट चे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रशांत भालेराव यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्रात आता सर्वत्र सोमवार ते शनिवार वर्षभर लोन सुविधा ग्राहकांसाठी उपलब्ध केली आहे. पर्सनल लोन ३० हजार, ५० हजार व १ लाख यासाठी ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. याचबरोबर कॅश क्रेडिट लोन, होम लोन, मॉर्गेज लोन व वाहन तारण लोन आदी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्रासह देशात ९ राज्यात १३० शाखांच्या माध्यमातून श्री रेणुकामाता मल्टीस्टेटची यशस्वी घोडदौड सुरु आहे. नुकतीच श्री रेणुका मल्टीस्टेट ग्रुपने डीमार्ट सुविधा उपलब्ध केली असून त्याचाही ग्राहकांना फायदा होणार आहे.

दरम्यान, या कर्ज मेळाव्यास श्री रेणुकामाता मल्टीस्टेटचे वरिष्ठ व्यवस्थापक दीपक मेढे उपस्थित होते. कर्ज मेळाव्याच्या यशस्वीतेकरीता शाखेतील पासिंग ऑफिसर सौ. मयुरी लव्हेकर, गोविंद बुद्रुककर, कावेरी काळे, तेजस वाघमारे, मंदार फुटाणे यांच्यासह अन्य कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### जायकवाडीच्या डाव्या कालव्यातून एक पाणी पाळी सोडा- विलास बाबर

**परभणी,/प्रतिनिधी:** जिल्ह्यात तापमानात दिवसेंदिवस वाढ होत असून पाणी पातळीत घट होतांना दिसत आहे. त्यामुळे जनावरांना पिण्यासाठी व चाऱ्यासाठी जायकवाडी धरणातून डाव्या कालव्यात एक पाणी पाळी सोडावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे (ग्रामीण) सरचिटणीस विलास बाबर यांनी केली आहे.

जायकवाडी विभाग क्रमांक २ च्या कार्यकारी अभियंत्यांना शुक्रवारी (दि.०२) बाबर यांनी एक निवेदन सादर केले. त्याद्वारे, जिल्ह्यात सध्या तीव्र पाणी टंचाई असून जिल्ह्यास भिषण दुष्काळाला समोर जावे लागत आहे, हे निदर्शनास आणून दिले. जायकवाडीच्या डाव्या कालव्याला आलेल्या पाण्यामुळे शेतकऱ्यांनी जनावरांसाठी बारा पिके घेतली असून ती चारा पिके वाढीच्या उपस्थित आहेत. परंतु, ती जगली पाहिजेत यासाठी पाण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यामुळे १५ मे पर्यंत जायकवाडीच्या डाव्या कालव्यातून एक पाणी पाळी सोडावी जेणेकरुन चाऱ्यासह जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचीही सोय उपलब्ध होईल, असेही बाबर यांनी या निवेदनाद्वारे म्हटले.

### श्रीस्वामी समर्थ केंद्रात अखंड नाम सोहळा

**जिंतूर,/प्रतिनिधी:** श्रीस्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त जिंतूर सेवा केंद्र या ठिकाणी अखंड नाम योग्य सप्ताह व सामुदायिक गुरुचरित्र पारायण सोहळा सुरू आहे. श्रीस्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त २९ एप्रिलपासून जिंतूर स्वामी समर्थ केंद्रात स्थापित देवता हवन, नित्य स्वाहाकार, श्रीगणेश याग, श्री मनोबोध याग, नित्य स्वाहाकार स्वामी याग, नित्य स्वाहाकार चंडीयाग, नित्य स्वाहाकार, श्री गीताई याग, नित्य स्वाहकर, श्री रुद्र याग, मल्हारी याग, नित्य स्वाहाकार बली पुशहुती आदी धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. यात मोठ्या संख्येने पंचक्रोशीतील भाविकांची उपस्थिती होती. नामजप सोहळ्याची सांगता सोमवारी धार्मिक कार्यक्रमांनी होणार असून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. सेवेकरी केंद्रप्रमुख विश्वनाथ वाघ , अमित घुगे, मुळ शास्त्री मुकेश मुथा संभाजीनगर,आबासाहेब देशमुख, आहेर भोकर ,लखुजी जाधव ,माधव मोरे ,वसंतराव देशमुख ,उद्धवराव देशमुख ,मंचकराव देशमुख , सचिन रायपत्रीवार, कोल्हाळ , पिन्टू अप्पा, रवी घुगे ,चौहान ताई.



**जाहिर प्रगटन**

श्रीमती ए आर फक्राबादकर ५वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, परभणी यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३३६/२०२४
सुधा वि. निरंक
Petitioners:- 1-) Sudha W/o Purushottamrao Pande, Age-76 Occu-household.R/o Trimurti Nagar, Uttar Baju Gandhi Nagar, Parbhain Tq.& Dist. Parbhani.2-) Sangita W/o Pradeep Mandlik Age-52 Occu-household. R/o Balaji mandir ke pass, Flat No.06 Maithali, Plot No.70 Tilak Nagar, Kranti Chowk S.O Aurangabad,3-)Mukund s/o. Purushottamrao Pande, Age-43 Occu-Service R/o Nath nagar, Parbhani.
V/s
Respondent:-Nil.
Claim:- वारसा प्रमाणपत्र[ Legal Heirship Certificate ] मिळणेबाबत...
ज्याअर्थी अर्जदार यांनी अँड. एस.पी. कुलकर्णी वकील यांच्या मार्फत अर्ज दाखल केला आहे की, मयत १.) Purushottamrao Ramkrishna Pande हे दिनांक ११/१२/२०२३ रोजी रोजी त्यांचे राहते घरी परभणी येथे मयत झालेले आहेत. त्यांना अर्जदारा च्या व्यतीरिक्त इतर कोणीही वारस नाहीत. वारसा प्रमाण पत्र [ Issue Legal Heirship Certificate, in the Name of Petitioners for Legal Recognition & other official Purpose. ] मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे
त्याअर्थी, सदर अर्जाबाबतचा कोणाचा काही आक्षेप असल्यास त्यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० (तीस)दिवसाच्या आत आपला आक्षेप या न्यायालयात दाखल करावा नसता अर्जदाराचे म्हणने ग्राहय धरुन त्यांच्या तर्फे निर्णय देवून अर्जदारांच्या नावे वारसा हक्काचे प्रमाण पत्र दिले जाईल.आदेशान्वये

एम.आर. टेकाळे
क. लिपीक,
५वे सह दिवाणी न्यायालय क. स्तर, परभणी

स्वाक्षरीत/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क स्तर परभणी.

**जाहिर नामा**

मा.श्री.एस.व्ही. मुंडे दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सोनपेठ ता. सोनपेठ, जि. परभणी यांच्या न्यायालयात.
दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ५८/२०२४ नि.क्र.०७
राजेश्वर पार्डीकर वि निरंक
ज्या पेक्षा, मयत पंडीत पिता मारोती उर्फ भाऊदेव पार्डीकर जोशी रा. सोनपेठ, ता. सोनपेठ, जि. परभणी हे दिनांक १३-१०-१९९५ रोजी सोनपेठ, ता. सोनपेठ, जि. परभणी येथे मयत झाले आहेत. त्यांना अर्जदार क्रमांक ०१. राजेश्वर पिता पंडीतगुरु पार्डीकर, वय ५१, धंदा. शेती, रा. नांदखेडा रोड, रंगनाथ नगर, परभणी (मयताचा मुलगा), अर्जदार क्रमांक ०२ विजयमाला भ्र. बालासाहेब देशपांडे, वय ७१, धंदा. घरकाम, रा.पोस्ट हट्टा कुप्ट, ता. सेलू, जि. परभणी, (मयताची मुलगी) अर्जदार क्रमांक ०३ मिराबाई भ्र. केशवराव चौधरी, वय ६०, धंदा. घरकाम, रा. वांगी, पोस्ट हामदापूर, ता. मानवत, जि. परभणी, (मयताची मुलगी) अर्जदार क्रमांक ०४ सुनिता भ्र. सिताराम देशपांडे, वय ६८, धंदा. घरकाम, रा. पांगरी, ता. जिंतूर, जि. परभणी, (मयताची मुलगी) अर्जदार क्रमांक ५. सविता भ्र. संजय मुदगलकर, वय ४७, धंदा. घरकाम, रा. घरकाम, रा. मुदगल, ता. पाथरी, जि. परभणी (मयताची मुलगी) हे वारस असल्याचे अर्जात नमुद केले आहे यांचे नाव अर्जात नमुद आहे.
मयत पंडीत पिता मारोती उर्फ भाऊदेव पार्डीकर जोशी यांचे वारस म्हणुन अर्जदाराने शासकीय व निमशासकीय कामासाठी बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट नुसार कलम २ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी विधीज्ञ अॅड एस.ए. शेख यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार सदर मयताचे कायदेशिर वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून ०१ महीन्याच्या आत त्याने हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सहरहु कोर्ट सदरहु अर्जदार यांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबित दिल्यास त्याना सदरहु मयत पंडीत पिता मारोती उर्फ भाऊदेव पार्डीकर जोशी यांचे वारसाचे प्रमाणपत्र देईल.
पुढील तारीख १४-०६-२०२४ ही आहे.
आज दि. १५ एप्रिल २०२४ रोजी न्यायालयाच्या सही व शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरीत/-
क. लिपीक,

स्वाक्षरीत/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क स्तर सोनपेठ.

# न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे त्या प्रकरणात सरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल

**जिंतूर/प्रतिनिधी :** जिंतूर तालुक्यातील मारवाडी येथील विलास गणेशराव देशमुख यांनी जिंतूर न्यायालयात अनंता बन्सीधर देशमुख, पवन प्रसादराव देशमुख आणि मदन प्रभाकर देशमुख यांचे विरुद्ध त्यांनी संगणमत करून ग्रामपंचायतचे पाईपलाईन फोडण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून त्यांचा भाऊ कल्याण गणेशराव देशमुख यांचा खून करून पुरावा नष्ट केल्याबद्दल फौजदारी व्यवहार संहिता कलम १५६ (३) नुसार ऍड. मनोज सारडा यांच्यामार्फत प्रकरण दाखल केले .सदर प्रकरणात माननीय न्यायाधीश श्रीमती वेदवती आद्य देशपांडे यांनी पोलीस स्टेशन बोरी यांना प्रकरणात भादवी ३०२ व इतर कलमा अन्वये संबंधितावर गुन्हा दाखल करून अहवाल सादर करावा. असे आदेश दिले आहेत. घटनेची थोडक्यात माहिती अशी की, दिनांक १८ नोव्हेंबर २०२३ रोजी मयत कल्याण देशमुख यांनी मारवाडी येथील ग्रामपंचायतची पाईपलाईन फोडली या कारणावरून सरपंच अनंता देशमुख व त्यांचे सहकारी पवन आणि मदन यांचे सोबत त्यांचा वाद झाला. त्यावेळी सरपंच व त्यांच्या सहकाऱ्यांनी कल्याण तुझी पाहून घेतो असे धमकावले. त्यानंतर दिनांक १९ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी नऊ वाजता फिर्यादी त्याच्या शेतात जात असताना आरोपी त्यांना गावातील मंदिराजवळ भेटले आणि कल्याणला समजावून सांगा की ? आमच्या नादाला लागू नको. नाहीतर परिणाम वाईट होतील असे म्हणून कल्याणच्या घराच्या दिशेने गेले. फिर्यादी दुपारी शेतातून परत आला

### मारवाडी येथील खून प्रकरण!

असता त्यास त्याच्या आईने सांगितले की कल्याणच्या शेजारी राहणाऱ्या महिलेने आरोपी यांनी घरात मारहाण केली आहे. त्यावरून फिर्यादी यांनी आरोपी यांना त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधून तुम्ही कल्याणला का मारले असे विचारणा केली. असता त्यांनी केवळ आम्ही त्याला थापड बुक्क्या मारल्या असे सांगितले त्यामुळे फिर्यादी व त्याची आई कल्याणच्या घराकडे गेले . त्या ठिकाणी तो जाण्यापूर्वीच बोरी पोलीस स्टेशनचे फौजदार खिल्लारे साहेब व कर्मचारी आलेले होते. त्या ठिकाणी आल्यानंतर फिर्यादी यास त्याच्या भावाची बॉडी घराच्या छताला स्कार्फ बांधून लटकवलेली दिसली तसेच जमिनीवर रक्त सांडेल दिसले. त्या ठिकाणी पोलिसांनी घटनास्थळाचे फोटो घेतले आणि प्रेत खाली घेतले. ज्या ठिकाणी घटना घडली त्या ठिकाणी खोलीमध्ये कोणतेही स्टूल अथवा उंच चढण्याइतपत वस्तू नव्हती. मयताची पत्नी माहेरी मौजे पुंगळा ता जिंतूर येथे गेलेली असल्यामुळे फिर्यादीने सदरची घटना वनिता देशमुख यांना कळवली. त्यानंतर प्रेत सरकार दवाखाना बोरी येथे आणले गेले होते. बोरी येथे दवाखान्यात प्रेत आल्यानंतर आरोपी यांनी संगणमत करून फिर्यादीचा भाऊ कल्याण याने मराठा आरक्षणाच्या निर्णयाबाबत शासन उशीर करत असल्यामुळे जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या लढ्याला पाठिंबा म्हणून आत्महत्या केल्याची वावडी उठवली. त्या रात्री फिर्यादी पोलीस स्टेशन येथे तक्रार देण्यात गेला असता पोलिसांनी त्यास पोलीस स्टेशनमध्ये बसून ठेवले. आणि त्यांची फिर्याद दिनांक २० नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी लिहून घेतली सदरची फिर्यादी देत असताना आरोपी अनंता देशमुख यांनी त्याच्या मोबाईलवरून फिर्यादीला त्याच्या मोबाईलवर संपर्क साधून गुन्हा दाखल करू नका. आपण मिटवून घेऊ अशी विनंती केली .सदरचे मोबाईल रेकॉर्डिंग सहाय्यक पोलीस निरीक्षक सरला गाडेकर व पोलिसांना दिली. परंतु पोलिसांनी त्याबाबत कोणतीही गंभीर कार्यवाही केली नाही. तसेच तुमच्या तक्रारीप्रमाणे गुन्हा दाखल केला आहे असे सांगून फिर्यादीस प्रेत गावाकडे घेऊन जावा अंत्यविधी ऊर्का असे म्हणून घरी जाण्यास सांगितले. त्यानंतर धार्मिक विधी पूर्ण झाल्यावर फिर्यादी पोलीस स्टेशनला आले असतात त्यांना माहिती मिळाली की सरला गाडेकर या पोलीस अधिकाऱ्याने आरोपी यांच्यासोबत संगणमत करून कोणताही गुन्हा दाखल केला नाही. त्यामुळे फिर्यादी याने पाठपुरावा करून पोलीस उपाधीक्षक जिंतूर, पोलीस अधीक्षक परभणी आणि विशेष पोलीस महानिरीक्षक नांदेड,गृहमंत्री, मुख्यमत्री मुंबई यांचे कडे लेखी तक्रार दिली. परंतु त्यानंतर देखील गुन्हा दाखल होत नसल्यामुळे शेवटी त्यांना न्याय दंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय जिंतूर येथे तक्रार दाखल करावी लागली. सदरची तक्रार दाखल करत असताना मयतावर झालेल्या पोस्टमार्टम अहवालात संशयास्पद पुराव्याची माहिती, आरोपी यांच्यासोबत मोबाईल मध्ये झालेले संभाषण व इतर सर्व पुरावे दाखल करण्यात आले. फिर्यादी यांचे तर्फे ऍड. मनोज सारडा यांचा युक्तिवाद आणि प्रकरणात दाखल प्रथम दर्शनी सर्व पुराव्यांचा विचार करून न्यायाधीश श्रीमती वेदवती आद्य देशपांडे यांनी आरोपी यांचे विरुद्ध भादवी ३०२ व इतर कलमा अन्वये गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिनांक ०३/०५/२०२४ रोजी दिले आहेत. प्रकरणाचा क्रमांक फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक ४४/२०२४

**विशेष म्हणजे प्रस्तुत प्रकरणात सरला गाडेकर यांना तत्कालीन पोलीस अधीक्षक यांनी सखोल चौकशी करून गुन्हा दाखल करण्याबाबत तोंडी आदेश दिलेले होते. असे असताना त्यांनी प्रस्तुत प्रकरणात आरोपी यांच्या राजकीय व आर्थिक दबावापोटी गुन्हा दाखल केला नाही. त्यामुळे प्रकरणाची चौकशी सी,आय,डी,मार्फत होऊन दिनांक १९ नोव्हेंबर २०२३ ते आज पर्यंत सरला गाडेकर यांच्या मोबाईल मधून आरोपी व त्यांच्या नातेवाईकांसोबत झालेल्या संभाषणाची सीडीआर, सीसीटीव्ही कॅमेरा मधील फुटेज तपासून आरोपींना वाचवण्यासाठी पुरावा नष्ट करण्यास मदत केल्याबद्दल त्यांचेवर देखील गुन्हा दाखल करून न्याय द्यावा. असे फिर्यादी यांनी वार्ताहर यांना बोलताना सांगितले आहे. जर वरिष्ठांनी संबंधित फौजदाराविरुद्ध कार्यवाही न केल्यास लवकरच माननीय उच्च न्यायालय खंडपीठ संभाजीनगर येथे याचिका दाखल करणार असल्याचे सांगितले आहे.**

### शेतकऱ्याचे ५० हजार चोरटयांनी केले लंपास

**-तूळजा भवानी मल्टीस्टेट पतसंस्थेतील घटना**
**-चोरटे सिसिटिव्हीत कैद**

**सेलू,/प्रतिनिधी**-शहरातील तूळजा भवानी मल्टीस्टेट को ऑपरेटीव्ह सहकारी पतसंस्थेत बचत खात्याच्या पासबूक वर इंट्री करण्यासाठी रांगेत उभ्या असलेल्या शेतक-याच्या पिशवीतून ५० हजार चोरट्यांनी चालाखीने लंपास केल्याची घटना शनीवार ४ रोजी घडली.शहरातील मध्यावर्ती तूळजा भवानी अर्बन को ऑपरेटिव्ह पतसंस्थेची शाखा आहे.शनिवारी रायपूर येथील खातेदार शेतकरी मूंजाभाऊ सूंदर गाडेकर यांनी एक लाख रूपये शाखेतून काढून पासबूक वर इंट्री करण्यासाठी रांगेत उभे असतांना संधीचा फायदा घेत त्यांच्या जवळील पिशवीतून ५० हजार चोरट्यांनी लंपास केले.सदरिल घटनेचे सिसिटिव्ही फूटेज मिळाले असून दोन संशयीतांवर गून्हा दाखल करण्यात आला असून घटनेमूळे पेरणीच्या तोंडावर शेतक-याची अडचण निर्माण झाली आहे.घटनेचा तपास पोलिस निरिक्षक दिपक बोरसे यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपनिरिक्षक देशमूख हे करत आहेत. दरम्यान चोरीच्या घटनेत मोठया प्रमाणावर वाढ झाली आहे, त्यामुळे नागरिकांनी तसेच बँकेच्या वतीने सर्व योग्य ती खबरदारी घेणे गरजेचे असल्याचे यावेळी बोलल्या जात आहेत.

## आई-वडिलांनीच केली स्वत:च्या मुलीची हत्या

### पालम तालुक्यातील नाव्हा येथील घटना : आंतरजातीय विवाहास विरोध

**पालम/प्रतिनिधी-** आंतरजातीय प्रेम विवाहाला विरोध करीत भावकीतील नातेवाईकांच्या सहाय्याने आई-वडिलांनी स्वत:च्या मुलीस जीवे मारल्याची धक्कादायक घटना पालम तालुक्यातील नाव्हा येथे घडली आहे. दरम्यान, या प्रकरणात ८ जणांवर खून करून पुरावा नष्ट केल्याबद्दल पालम पोलिस ठाण्यात शुक्रवारी (दि.३) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

साक्षी बालासाहेब बाबर (वय १९) असे खून झालेल्या युवतीचे नाव आहे. साक्षी हीचे गावातीलच परजातीतील युवकासोबत प्रेमसंबंध जमलेले होते. सदर मुलीने आंतरजातीय विवाह करू नये याकरिता तिच्या या विवाहाला पालकांनी विरोध केला होता. परंतु तरी ही युवती तिच्या आंतरजातीय विवाह करण्यावर ठाम राहिलेली होती. या गोष्टीचा राग मनात धरुन दि.२१ एप्रिल रोजी रात्री १० ते दि.२२ एप्रिल रोजी पहाटेच्या दरम्यान नाव्हा येथे त्या युवतीच्या आई-वडीलांनी जीवे मारण्याच्या उद्देशाने तिला ठार केल्याचे समोर आले आहे. याच रात्री कोणालाही माहिती होवू न देता भावकीतील निवडक लोकांना त्यांनी समवेत घेऊन संगनमत केले आणि त्या युवतीचा मृतदेह नाव्हा येथील स्मशानभूमीत जाळून तो पुरावा नष्ट केल्याची धक्कादायक माहिती समोर आली. त्या मुलीचा अंत्यविधी नातेवाईक करत असताना अनेकजण तेथे हजर होते, त्यांना या अपराधाची माहिती असतानाही पोलिसांना याबाबत न कळवता सदर अपराधास सहाय्य केल्याने पोलिस निरीक्षक रावसाहेब गाडेवाड यांच्या फिर्यादीवरून त्या युवतीचे वडील बालासाहेब भिमराव बाबर, आई रुक्मीनबाई बाबर, अच्युत दत्तराव बाबर, राजेभाऊ रखमाजी बाबर, अशोक रुस्तुमराव बाबर, आबासाहेब रुस्तुमराव बाबर, गंगाधर योगाजी बाबर, गोपाळ अशोक शिंदे अशा ८ जणांवर पालम पोलिस ठाण्यात खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, घटनास्थळी अप्पर पोलीस अधिक्षक यशवंत काळे, डिवायएसपी डॉ. समाधान पाटील, निरीक्षक रावसाहेब गाडेवाड यांनी भेट देवून पाहणी केली. तपास डिवायएसपी डॉ. पाटील हे करीत आहेत.

### ज्येष्ठ व्यापारी तोष्णीवाल यांचे निधन

**परभणी,/प्रतिनिधी:** येथील नवामोंढा भागातील ज्येष्ठ व्यापारी गंगाभिषण (बापूजी) मोतीलालजी तोष्णीवाल यांचे मंगळवारी (दि.०७) सकाळी ८.४० वाजता वृध्दापकाळामुळे निधन झाले. मृत्यूसमयी ते ९३ वर्षांचे होते.

तोष्णीवाल हे शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक संस्थांशी संलग्न होते. विशेषतः नेहरु एज्यूकेशन सोसायटी गांधी विद्यालयाचे ते संस्थापद सदस्य व अध्यक्ष होते. महेश अर्बन बँकेचे ते काही काळ अध्यक्ष होते. लायन्स क्लब परभणीचेही ते संस्थापक सदस्य तसेच काहीवर्षी अध्यक्ष म्हणूनही कार्यरत होते. दरम्यान, तोष्णीवाल यांच्या पार्थीवावर मंगळवारी सायंकाळी जिंतूर रस्त्यावरील वैकुंठधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. गंगाभिषण तोष्णीवाल हे सुनील व अनिल तोष्णीवाल यांचे वडील व निरज तोष्णीवाल यांचे आजोबा होत.

**वाहन विकणे आहे....**

आमच्या बँकेने जप्त केलेली वाहने योग्य कोटेशन पध्दतीने विकणे आहे.

| SR No | COUNT No | VEHICLE MODEL | PRODUCT | VEHICLE NO. | ENG. NO. | CHASSIS NO. |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | MBJ01039G | JAN-23 | TATA ACE HT BS-6 | MH28BB6265 | 800CCDI0 4AWXS07530 | MAT559007PZA A01791 |

संपर्क : इंडसइंड बँक लि,
दुसरा मजला, कांकरिया कॉम्प्लेक्स, सिटी सर्व्हे नं.११४३४/A ११,
जालना - औरंगाबाद रोड, जालना ४३१२०३ (M.S) मो.नं.९८९०२७२८८३



### अभिनेता भालेराव यांना शिर्डीत पुरस्कार

**परभणी,/प्रतिनिधी:** शिर्डी येथे - ओम साई विकास प्रतिष्ठाण व बि.बि.सी.फिल्म प्रोडक्शन संस्थेच्या वतीने महाराष्ट्रातील गुणवंत कलावंत कलाकार यांचा शिर्डी येथे दि.३ मे शुक्रवार रोजी पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.
परभणी जिल्ह्यातील जिंतुर तालुक्यातील येलदरी कॅम्प येथिल अभिनेता तथा पत्रकार यांना सिध्द संकल्प लॉन साकुरी शिर्डी येथे राष्ट्रीय स्तरावरील साईकलारत्न समाज भुषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले
अशोक ल. भालेराव याच्या अभिनय व पत्रकार क्षेत्रातील योगदान व चित्रपट निर्माता दिग्दर्शक गीतकार अतुल चौबे यांच्या हीच पोरगी पाहिजे या चित्रपटात महत्वपूर्ण भूमिका व विविध लघुपट व्हिडिओ साँग्स यामध्ये केलेल्या कार्याची दखल घेऊन अशोक भालेराव यांना राष्ट्रीय स्तरावरील,साई कलारत्न समाज भुषन हा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
संस्था चे अध्यक्ष सुदाम दादा संसारे पदाधिकारी यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला. पुरस्कार मिळाल्याबद्दल अशोक भालेराव यांचे कला साहित्य संगीत पत्रकार क्षेत्रात साहित्य क्षेत्रातील मान्यवरांकडून कलावंत व मित्र परिवाराकडून कौतुक होत असून त्याचे अभिनंदन होत आहे

## कल्याण नावाचा मटका घेणाऱ्यांना अटक; -सेलू व वालूर येथील घटना

**सेलू/प्रतिनिधी-** कल्याण नावाचा मटका घेणा-यांना अटक -सेलू व वालूर येथील घटना घडली आहे.

सेलू तालूक्यात अवैध धंद्याना आवर घालण्यासाठी पोलीस अँक्शन मोड मध्ये आल्याचे पाहावयास मिळत असून शहरासह तालूक्यातील ग्रामीण भागात पोलीस अवैध धंद्यावर कारवाही करत असून शनीवार ४ रोजी शहरासह वालूर येथे कल्याण नावाचा मटका जूगार घेणा-या तीघांवर कारवाही करून अटक करण्यात आले आहे.शहरात घडी टावर परीसरात कल्याण नावाचा मटका जूगार घेणा-या सत्यनारायण शर्मा कडून मटक्याचे आकडे लिहिलेला कागद ,पेन व ७०० रूपये चा ऐवज तर वालूर येथून बस स्थानक परिसरात कृष्णा झाकणे व सूमित कलाल यांच्याकडून लोकांना दिलेल्या चिठ्ठ्या व ३ हजार ९० रूपये रोख व १० हजार किंमतीचा मोबाईल हस्तगत करण्यात आला असून आरोपींना अटक करण्यात आले आहे .सदरिल कारवाही पोलीस निरिक्षक दिपक बोरसे यांच्या मार्गदर्शनानूसार पोलीस तपास मूलगीर व हिंगे यांच्याकडे देण्यात आला आहे.
-वाळू माफिया जोमात मटका ,जूगार या अवैध धंद्यावर कारवाही होत आसतांना मात्र तालूक्यामध्ये अवैध वाळूचा उपसा रात्रंदिवस वाळू माफिया करत असून शहरासह ,ग्रामीण भागात सूद्धा नागरीकांना त्रास सहन करावा लागत असून या वाळू माफियावर सूद्धा कारवाहीसाठी पोलीस प्रशासनांनी अँक्शन मोडमध्ये येण्याची मागणी होत आहे.

## वनामकृवितील नाहेप केंद्रात कृषि ड्रोन अभ्यासक्रम

### १८ मे पासून अभ्यासक्रमास सुरुवात : कुलगूरु डॉ.इंद्रमणि एक विषय शिकविणार

**परभणी/प्रतिनिधी-** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी येथील नाहेप केंद्राद्वारा सहा महिन्याचा कृषि ड्रोन तंत्रज्ञानावरील व्यावसायिक व संशोधन प्रमाणपत्र अभ्यासक्रम विद्यापीठाच्या वर्धापन दिनापासून म्हणजेच १८ मे पासून सुरु होणार आहे.

या अभ्यासक्रमाकरिता सेरेब्रोस्पार्क इंनोवेशन्स पुणे व वनामकृवि परभणी यांच्या मध्ये करार झाला असून या अभ्यासक्रमाकरिता रिमोट पायलट लायसन्स धारक अथवा अभियांत्रिकी शाखेतील पदवीधर उमेदवार पात्र आहेत. या अभ्यासक्रमात ड्रोन तंत्रज्ञानावरील मूलभूत अभ्यासक्रम व कृषी उपयुक्तता ज्यामधे पिक निरिक्षण सेन्सर प्रणालीतून ड्रोन द्वारा विविध कार्य, पीक रोग तपासणी, फवारणी सारखी विविध कार्य करण्याकरिता संरचना व निर्मिती सारख्या शेतीविषयक नवीन ड्रोन तंत्रज्ञान शिकण्याची संधी उपलब्ध होणार आहे. विशेष म्हणजे कुलगुरू डॉ. इन्द्र मणि हे स्वतः या अभ्यासक्रमात एक विषय शिकविणार आहेत.

अभ्यासक्रमातील कृषी विषयक ड्रोन तंत्रज्ञान अभ्यासक्रम तयार करताना कुलगुरु इंद्रमणि यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शिक्षण संचालक डॉ. उदय खोडके आणि नियंत्रक प्रवीण निर्मळ यांची प्रमुख उपस्थिती होती. या अभ्यासक्रमाची माहिती ://... या संकेतस्थळावर ऊपलब्ध असून सदरील अभ्यासक्रमाकरिता इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज गूगल फॉर्म द्वारे संकेत स्थळावर नोंदीत करावा. या अभ्यासक्रमानंतर विविध कृषी ड्रोन उत्पादक कंपनी, शासकीय कार्यालय, सुरक्षा मंत्रालय, ई. सारख्या क्षेत्रात नौकरी वा स्वत:चा व्यवसाय असा फायदा होऊ शकतो. मागील ४ वर्षापासुन नाहेप केंद्राने कृषी ड्रोन क्षेत्रात भरपूर कार्य केलेले असून संशोधन विद्यार्थ्यांना तंतोतंत कृषी व्यवसायकता साधण्यासाठी संधी उपलब्ध करून दिल्या आहेत व विविध १२ देशात ५५ संशोधन विद्यार्थ्यांना तसेच २५ प्राध्यापकांना एक ते तीन महिने प्रशिक्षणासाठी पाठविले व त्यावर संशोधन प्रकाशने झाली.

सेरेब्रोस्पार्क इंनोवेशन्स, पुणे ड्रोन संरचना, उत्पादन व कृषि संबंधित सेवा कार्य करीत असून पाच वर्षाचा करार कालावधी दरम्यान कृषी ड्रोन संशोधन, चालक, चाचणी व दुरुस्ती सारख्या कार्याकरिता वनामकृवि सोबत कार्य करणार असून या करारातून दोन्ही संस्थांना निश्चित कार्य प्रणाली करण्यास आश्वासित केले. नाहेप चे प्रमुख अन्वेषक डॉ. गोपाळ शिंदे यांनी प्रास्ताविक व संशोधन करण्यासंबंधी करारा बाबत माहिती दिली. याप्रसंगी उप अन्वेषण डॉ. डी. डी. टेकाळे, डॉ. गोदावरी पवार, डॉ. प्रवीण कापसे, डॉ. विशाल इंगळे, डी. व्ही. पाटील यांची उपस्थिती होती.

## कै. बाबुरावजी औराळकर यांना अभिवादन

तभा वृत्तसेवा

कन्नड, दि.०७ एप्रिल : लोकनेते कै.बाबुरावजी माणिकराव पाटील औराळकर उर्फ काकासाहेब यांच्या पावन स्मृतिस, शहरातील शिवाजी महाविद्यालयात विनम्र अभिवादन करण्यात आले. लोकनेते कै. बाबूरावजी माणिकराव पाटील औराळकर यांनी कन्नड तालुक्याचे आमदार, औरंगाबाद जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, तसेच महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे संचालक, श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे संस्थापक संचालक, अध्यक्ष अशा विविध पदांवर कार्यरत राहुन, तालुक्यातील, गोरगरीब, शेतकरी, कामगार, कष्टकरी घटकांना योग्य न्याय मिळवून देण्यासाठी, बाबुरावजी औराळकर यांनी सतत प्रयत्न करत संपुर्ण हयात या घटकांना न्याय मिळवून देण्यात घातली. कन्नड सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आपल्याच तालुक्यात चांगले महाविद्यालयीन शिक्षण मिळावे या उद्देशाने त्यांनी आपल्या तत्कालीन सहकाऱ्यांना सोबत घेऊन शहरात श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. आज या शिक्षण संस्थेचा मोठा वटवृक्ष झाला असल्याचे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी याप्रसंगी बोलताना केले.

या प्रसंगी या कार्यक्रमास उपस्थित असलेले तहसिलदार विद्याचरण कडवकर यांनीही मनोगत व्यक्त करत बाबुरावजी औराळकर यांना आदरांजली वाहिली. कार्यक्रमास संस्थेचे कोषाध्यक्ष चंद्रकांत देशमुख, कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. महाले, आर. व्ही. शिंदे, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, विलास पवार, मंडळ अधिकारी, प्राध्यापक यांची उपस्थिती होती.

## १ लाख कोटी रुपयांचा इनव्हॉइस फायनान्सिंग टप्पा गाठला

मुंबई– सिडबी, एनएसई चा स्टेट बँक ऑफ इंडिया, आईसीआईसीआई बँक आणि यस बैंक सह संयुक्त उपक्रम, रिसीवेबल्स एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड ट्रेड रिसीवेबल्स डिस्काउंटिंग सिस्टम प्लॅटफॉर्मने एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे, ज्या अंतर्गत ठी रु. १,००,००० कोटी किमतीचे बीजक, त्याच्या स्थापनेपासून ते सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (एमएसएमई) सुलभ कार्यरत भांडवल वित्तपुरवठा उपाय प्रदान करत आहे.२५,००० हून अधिक सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांनी रिसीवेबल्स एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड ट्रेड रिसीवेबल्स डिस्काउंटिंग सिस्टम प्लॅटफॉर्मवर नोंदणी केली आहे ज्यामुळे उद्योजकता लँडस्केपमध्ये लहान व्यवसायांना प्रोत्साहन देण्यात मदत होईल . रिसीवेबल्स एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड ने अनेक राज्य सरकारांशी भागीदारी केली आहे, अत्यंत स्पर्धात्मक दरांवर सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना वेळेवर पेमेंट सुनिश्चित करण्यासाठी सामंजस्य करार केले आहेत .

## बीएएसएफच्या नव्या सक्रीय घटकाची शक्ती

मुंबई – . भारतातील शेतकरी आता एफिकॉन ह्या बीएएसएफच्या आज सादर करण्यात आलेल्या नवीन किटकनाशकाच्या साह्याने ह्या आव्हानाचा सामना करु शकतात. एफिकॉनला विशेष रसायनामधील क्सालिऑनएँ ह्या बीएएसएफच्या नव्या सक्रीय घटकाची शक्ती मिळालेली आहे.बाजारपेठेतील वर्तमान उत्पादनांच्या बाबत ज्ञात असणारी कोणतीही विरुध्द प्रतिकारक्षमता नसल्याने एक श्रेष्ठ दर्जाचे किटकनाशक प्रतिबंध व्यवस्थापन साधन ठरणाऱ्या किटकनाशकांच्या (ग्रुप ३६– पायरीडाझीन) ह्या संपूर्ण नवीन गटाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या नव्या आयआरएसी ग्रुप ३६ अंतर्गत बाजाररपेठेत सादर करण्यात आलेल्या पहिल्या काही संयुगांपैकी एफिकॉन हे एक अनोखी कार्यपध्दती असणारे किटकनाशक आहे.एफिकॉन किटकनाशक हे पहिल्यांदा ऑस्ट्रेलियात वर्ष २०२३ मध्ये सादर करण्यात आले. चिवट रस शोषक किटकांवर नियंत्रण मिळविण्यास शेतकऱ्यांना मदत करील असे नवे नावीन्यपूर्ण रसायन प्राप्त करणाऱ्या जगातील सुरुवातीच्या काही देशांपैकी एक भारत आहे.

## आपल्या मुलांचं संरक्षण करण्याचे डॉक्टरांचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर – लसीकरणाचं महत्त्व सांगताना औरंगाबाद येथील देवगिरी चिल्ड्रन हॉस्पिटलचे मुख्य निओनॅटॉलॉजिस्ट डॉ. केदार सावळेश्वरकर म्हणाले, लहान मुलांची उत्तम पद्धतीने वाढ होण्यासाठी आणि जगण्यासाठी लसीकरणामुळे मदत होते. लसीकरण हा आरोग्यदायी आयुष्याचा पाया आहे. आयुष्यभर दुष्परिणाम होतील असे रोग लसीकरणामुळे टळतात. मुलांचं लसीकरण केल्यामुळे आपण त्यांच्या आरोग्याचं तर रक्षण करतोच, मात्र आपल्या समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी गुंतवणूकसुद्धा करतो. डॉक्टरांशी बोलून पालकांनी याविषयी अधिकाधिक माहिती घ्यावं असं आवाहन मी त्यांना करतो. लहान मुलांमध्ये सतत विकसित होत असलेल्या प्रतिकार क्षमतेमुळे ते अनेक संसर्गांचा सामना करू शकत नाही. संपूर्ण लसीकरणामुळे गंभीर आजार आणि गुंतागुंतीपासून बालकांचा बचाव होतो. हॉस्पिटललायझेशन टळते. वेळेवर लसीकरण झाल्यामुळे मुले त्यांची शारीरिक आणि मानसिक विकासाची योग्य पातळी वेळेवर गाठतात. लसीकरणामुळे हर्ड इम्युनिटी विकसित होण्यास मदत होते आणि साथीचे रोग टळतात. त्यामुळे लसीकरणाचे वेळापत्रक नीट पाळले तर बालकांना पूर्णत: संरक्षण मिळते.२०२४ सालचा जागतिक लसीकरण सप्ताह (२४ ते ३० एप्रिल) हा जागतिक आरोग्य संघटनेच्या एक्सपांडेड प्रोग्राम ऑन इम्युनायझेशन या योजनेचा ५०वा वर्धापन दिन आहे.


## मॅक्सियन व्हील्स आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या झाल्या

अहमदनगर –मॅक्सियन व्हील्स, प्रवासी कार, हलके ट्रक, बस, व्यावसायिक ट्रक आणि ट्रेलर्ससाठी आघाडीची जागतिक चाक उत्पादक कंपनी, ब्राझीलमधील इओचपे फाउंडेशन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या भागीदारीत, फ़ॉर्मेयर आणत आहे, पुणे, भारताच्या प्रदेशासाठी एक सुस्थापित शैक्षणिक शिष्यवृत्ती कार्यक्रम. हा नवीन दोन वर्षांचा कार्यक्रम, ज्यासाठी भारताच्या आर्थिक दुर्बल विभागाचा भाग असलेल्या ३० विद्यार्थ्यांची निवड केली जाईल, त्याचा परिणाम मॅन्युफॅक्चरिंग टेक्नॉलॉजी शैक्षणिक डिप्लोमा कार्यक्रमात होईल. विद्यार्थी अर्ज आणि निवड प्रक्रिया, ज्यामध्ये किमान ५०% महिला सहभागाचे उद्दिष्ट समाविष्ट आहे, पुणे आणि खेड विभागातील निवडक गावांमध्ये होईल. पुण्यातील कल्याणी मॅक्सियन व्हील्स च्या लाइट आणि कमर्शियल व्हेईकल स्टील व्हील प्लांटचे व्यवस्थापकीय संचालक सुहास मांजरेकर म्हणाले, आम्हाला आमच्या जवळच्या कुरुळी आणि निमगाव सारख्या खेडेगावातील ईडब्ल्यूएस विद्यार्थ्यांसाठी ब्राझील आणि मेक्सिकोमधील अत्यंत यशस्वी फ़ॉर्मेयर प्रोग्राम आणताना खूप अभिमान वाटतो.

## शांती नर्सिंग होमला मिळाले एनएबीएच मानांकन

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी – गेल्या ४५ वर्षांपासून मनोरुग्णांच्या सेवेत कार्यरत असणारे, महाराष्ट्र शासनाने 'सर्वोत्कृष्ट खाजगी मनोरुग्णालय' हा पुरस्कार देऊन गौरविलेले कांचनवाडी, पैठण रोडस्थित मानसिक रुग्णालय, 'शांती नर्सिंग होम'च्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. शांती नर्सिंग होमला नॅशनल ऍक्रिडिटेशन बोर्ड फॉर हॉस्पिटल्स अँड हेल्थ केअर प्रोव्हायडर्स (एन.ए.बी.एच), क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यातर्फे एन.ए.बी.एच. मानांकन मिळाले आहे. सिंगल स्पेशालिटी सायकीयाट्री हॉस्पीटलमध्ये असे मानांकन मिळविणारे शांती नर्सिंग होम हे भारतातील निवडक मानसिक रुग्णालयांपैकी एक झाले आहे. हे मानांकन मिळविण्यासाठी मानसिक रुग्णांकरीता रुग्णालयात उपलब्ध असलेल्या सुविधा, वेगवेगळे विभाग, दिल्या जाणार्या उपचार पद्धती व रुग्णालयाचा परिसर यांचे मूल्यांकन झाले होते. ते मिळविण्यासाठी डॉ.विनय बार्हाळे व डॉ.विनायक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णालयातील सर्व स्टाफने कठीण परिश्रम घेतले.

## साखरबाई अंबादास धरपळे यांचे निधन



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ७ मे : पैठण तालुक्यातील फारोळा येथील सौ साखरबाई अंबादास धरपळे यांचे ६ मे रोजी रात्री ११ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले त्यांचेवर दि ७ मंगळवार रोजी सकाळी दहा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले मृत्यूसमयी त्यांचे वय ७० वर्ष होते त्यांचे पश्चात पती, ३ मुले, ४ मुली, नातवंड, जावई, सुना असा मोठा परिवार आहे त्या डॉ आत्माराम धरपळे व संजय धरपळे यांच्या मातोश्री होत.

# कन्नड शहरात अस्वच्छतेचा कळस डास, चिलटयांचा त्रासाने नागरिक हैराण

तभा वृत्तसेवा/ ता.प्र.

कन्नड, दि. ०७ मे – सध्या सूर्य आग ओकत असल्याने प्रचंड तापमानात वाढ झाल्याने सर्वजण उकाड्याने हैराण असताना शहरात डासांचा, चिलट्यांचा हौदासामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. नगर पालीका प्रशासनाचे नियोजन शून्य व गलथान कारभार हे याचे कारण असून गटारी नाल्या तुडूंब भरल्यामुळे यामुळे डासांची, चिलट्यांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणावर असल्याने रात्रीची झोप पूर्ण होत नसल्याने नागरिक हैराण झाले आहेत.

शहरातील श्रीराम कॉलनी, भोलेश्वर कॉलनी,प्रगती कॉलनी, गणेश कॉलनी,सिद्धार्थ कॉलनी,आदर्श कॉलनी,हीवरखेडा रोड परिसरासह,शहरातील संपूर्ण नागरी वसाहतीत स्वच्छ तेचे तीन तेरा वाजले असून नाल्या,गटारी साचल्या असून त्यांची साफ सफाई नसल्याने त्या अनेक रस्त्यावर तुडूंब भरून वाहत आहे.नगरपालीका प्रशासनाचा हलगर्जी पणा हे महत्वाचे कारण असून नियोजनशून्य कारभाराचे एक उत्तम उदाहरण आहे.



मागील वर्षी दिवाळीच्या दरम्यान शहरातील भोलेश्र्वर कॉलनी, प्रगती कॉलनी, श्रीराम कॉलनी, गजानन कॉलनी या भागात जवळपास घरोघर डेंग्यूचे पेशंट होते. भोलेश्र्वर कॉलनीतील श्री महादेवाच्या मंदिराजवळील गटार आजही तुडूंब भरलेली असून ती रस्त्यावर ओसंडून वाहत आहे त्यामुळे पायी चालनाऱ्याला त्रास सहन करावा लागत आहे याचं परिसरातील डेंग्यूचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर होते. गटारी व नाल्या तुंबल्या मुळे अनेक भागात दुर्गंधी पसरली असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शहरात अनेकदा लाईट गुल होते. तापमान वाढल्यामुळे अंगाची लाही लाही होते. अचानक लाईट जाते . अनेकदा हवा(वारा )बंद झाल्याने नागरिकांच्या कानाजवळ येऊन चिलटे भुणभुण करतात त्यामुळे झोपेचा हिरमोड होतो. डास चावा घेतात. यामुळे नागरिक हैराण व त्रस्त आहेत. घरातील साचलेला कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी दररोज घंटा गाडी प्रत्येक गलोगल्ली फिरणे आवश्यक असताना अनेकदा घंटा गाडी२/३ दिवस बंद असते त्यामुळे कचऱ्याची दुर्गंधी असते. विशेष म्हणजे नगरपालिकेला सर्वात जास्त कर नवीन शहतातून वसूल होतो परंतु नगरपालिकेच्या वतीने रहिवाश्यांना पाहिजेल त्या प्रमाणात सेवा मिळत नाही . नगरपालीकेच्या प्रशासनाच्या नियोजनशून्य व भोंगळ कारभार यामुळे नगर पालिका प्रशासनाच्या विरोधात नागरिक संताप व्यक्त करीत आहेत.

## पैठणला दिव्यांग तसेच जेष्ठ नागरिकांचे घरीबसून मतदान



तभा वृत्तसेवा

पैठण दि ०७ :- जालना लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पैठण निवडणूक अधिकारी यांनी मतदान केंद्रावर येण्यास असमर्थ असणाऱ्या दिव्यांग तसेच वयोवृद्ध नागरिक मतदारांना घरपोच मतदान करण्याचे आवाहन केले असता यासाठी वयोवृद्ध ९३ व दिव्यांग २१ असे ११४ मतदारांनी नावनोंदणी केली असता मंगळवार दिनांक ७ मे रोजी पैठणला संध्याकाळी ६ वाजेपर्यंत ८० मतदारांनी घरीबसून आपल्या मतदानाचा हक्क बाजावल्याची माहिती निवडणूक सहाय्यक हरीश शिंदे यांनी दिली.निवडणूक विभागाने घेतलेल्या या निर्णयामुळे अनेक मतदारांनी त्यांचे धन्यवाद मानले.

दुसरीकडे लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने पैठण विधानसभा कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या १८४१ मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांन पैकी ६३५ मतदारांनी सोमवार दिनांक ६ मे रोजी मतदान कक्षात पोस्टल पध्दतीने आपला मतदानाचा हक्क बजावत लोकसभेसाठी समस्त मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले.सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा एसडीएम नीलम बाफना यांनी आज पोस्टल मतदान केले.पोस्टल मतदान प्रक्रिया ही दिनांक १० मे ते १२ मे अशी तीन दिवस चालणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

## शिर्डी विधानसभेतील मतदान यंत्रे तयार करण्याच्या प्रक्रियेला सुरूवात

शिर्डी – शिर्डी विधानसभा मतदारसंघातील २७० मतदान केंद्रासाठीची मतदान यंत्रे तयार करण्याच्या प्रक्रियेला आज, दि.६ मे रोजी सुरूवात झाली. मतदान यंत्रे तयार करण्याचे हे काम निवडणूक आयोगाच्या मागदर्शक सूचनानुसार अतिशय काटेकोरपणे करण्यात येत आहे.

यावेळी शिर्डी लोकसभा मतदारसंघात वीस उमेदवार निवडणूक लढत असल्याने प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान यंत्राबरोबर प्रत्येकी दोन इलेक्ट्रॉनिक्स बॅलेट पेपर वापरावे लागणार आहेत. शिर्डी लोकसभा मतदार संघात अकोले, संगमनेर, शिर्डी, कोपरगाव, श्रीरामपूर व नेवासा या ६ विधानसभा मतदारसंघात १७०८ मतदान केंद्र आहेत. या विधानसभा मतदारसंघात मतदान यंत्राची जुळणी/मतदान यंत्रे तयार करण्याचे काम मागील दोन दिवसापासून त्या त्या विधानसभा मतदानसंघातील सहायक निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांमध्ये सुरू आहे.

शिर्डी विधानसभा मतदारसंघात २७० मतदान केंद्र आहेत. यासाठी मतदान यंत्रे जुळणी करण्याचे राहाता तालुका प्रशासकीय भवन येथे सुरू झाले. ही प्रक्रीया दोन दिवस चालणार आहे. यासाठी २१ टेबलवर प्रत्येकी ६ अधिकारी/कर्मचारी असे एकूण १०६ अधिकारी – कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## मेडीकव्हर हॉस्पिटलमध्ये ब्रेन ट्यूमर असलेल्या रुग्णावर यशस्वीपणे 'अवेक क्रॅनियोटॉमी'

वैद्यकीय कौशल्य आणि तांत्रिक प्रगतीच्या प्रदर्शनात, मेडीकव्हर हॉस्पिटल, संभाजीनगर येथील न्यूरोसर्जरी विभागातील डॉक्टरांनी ब्रेन ट्यूमर असलेल्या रुग्णावर मेंदूच्या गंभीर हात आणि तोंडाच्या क्षेत्राजवळ (मोटर कॉर्टेक्स) यशस्वीपणे 'अवेक क्रॅनियोटॉमी' केली.

अवेक क्रॅनिओटॉमी ही एक अत्याधुनिक प्रक्रिया आहे जिथे रुग्ण शस्त्र क्रियेदरम्यान जागरूक राहतो, सर्जिल टीमला रुग्णाला जागे ठेवण्यामागचे मुख्यकारण म्हणजे या प्रकारच्या सर्जरीमध्ये रुग्णाच्या इतर अवयववारीती काय परिणाम होत आहे हे जाणून घेणे असते



, या शस्त्रक्रियेदरम्यान रुग्णाला त्याच्या अवयवांची हाल चाल करण्यास सांगितले जाते . त्यामुळे शास्त्रक्रियेदरमन रुग्णाच्या इतर अवयवांवरती होणारे बदल बघून डॉक्टरांना शस्त्रक्रिया करण्यात मदत होते . या शस्त्रक्रियेपूर्वी डॉक्टर रुग्णाला या संदर्भात माहिती देऊन त्याला याकरिता तयार करतात.

मेंदूच्या मोटर क्षेत्रावर परिणाम करणार्या ब्रेन ट्यूमरमुळे हात आणि चेहर्यावर कमकुवतपणा येऊ शकतो, परिणामी हाताचे कार्य, बोलणे आणि गिळण्यात अडचण येते. अशा परिस्थितीत ब्रेन ट्यूमरची शस्त्रक्रिया करणे हे न्यूरोसर्जनसाठी अत्यंत कठीण आव्हान असते.

अवेक क्रॅनियोटॉमी' केला गेलेला हा रुग्ण स्पर्धा परीक्षेची तयारी करणारा २४ वर्षांचा तरुण होता, त्याला गेल्या ३ महिन्यांपासून ओठ आणि उजव्या हाताला अर्धवट झटके येत होते. या रुणावर मेडीकव्हर हॉस्पिटलमधील न्यूरोसर्जरी विभागाचे प्रमुख डॉ आनंद डंक यांनी यशस्वी शस्त्र क्रियेबद्दल समाधान व्यक्त केले. डाव्या गोलार्धातील मोटर क्षेत्राजवळ त्यांच्या गाठींचे स्थान लक्षात घेता, अवेक क्रॅनियोटॉमीसाठी तो योग्य रुग्ण होता. काटेकोरपणे शस्त्र क्रियापूर्व नियोजन आणि समुपदेशनाने, आम्ही जागृत क्रॅनिओटॉमीच्या दृष्टीकोनातून पुढे गेलो आणि त्याचे परिणाम यशस्वी झाले, असे डॉ आनंद डंक यांनी सांगितले.

## भारतीय जनता पार्टी ही वॉशिंग मशीन नसून कार्यकर्ते घडवणारी एक तेजस्वी पार्टी आहे : सुनील देवधर

नगर – भाजपात इतर पक्षातून आलेल्या अनेकांवर ईडी, सीबीआयच्या चौकश्या चालू आहेत. भाजपात प्रवेश केल्याने त्या थांबलेल्या नाहीत. योग्यवेळी ते नेते जिथे जायचे तिथेच जाणार आहेत. त्यामुळे भारतीय जनता पार्टी ही वॉशिंग मशीन नसून कार्यकर्ते घडवणारी एक तेजस्वी पार्टी आहे. त्यामुळे त्यांचे दुर्गुण आम्हला लागणार नाहीतर आमच्या सद्गुणांनी त्यांच्यात परिवर्तन होत आहे, असा टोला भाजपचे माजी राष्ट्रीय महामंत्री सुनील देवधर यांनी विरोधाच्या टीकेला लावला. ते म्हणाले, भाजपचे उमेदवार खा.डॉ.सुजय विखे यांनी वायोश्री योजनीची देशात सर्वात जास्त अंमलबजावणी केली आहे. काही वस्तू मीही स्वतः दिव्यांग लाभार्थींना दिल्या आहेत. त्यामुळे खा.विखे हे जनतेतील नेते आहे, असेही ते म्हणाले.

सुनील देवधर यांनी लोकसभा निवडणुकी संदर्भात प्रचाराच्या नियोजनासाठी बुधवारी नगरमध्ये कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी शहर भाजपचे जिल्हाध्यक्ष ड. अभय आगरकर यांनी देवधर यांचे स्वागत करून सत्कार केला. यावेळी लोकसभा निवडणूक प्रमुख भानुदास बेरड व बाबासाहेब वाकळे, ड.विवेक नाईक, अनिल मोहिते, धनंजय जाधव, महेश नामदे, प्रिया जानवे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबुशेट टायरवाले आदीसह शहरातील सर्व बूथ प्रमुख, सुपर वॉरियर, पदाधिकारी, युवा मोर्चा, आघाडी प्रमुख, प्रकोष्ठ प्रमुख व महिला पदाधिकारी उपस्थित होते.

सुनील देवधर पुढे म्हणाले, ही निवडणूक राष्ट्रीय स्तरावरील विषयांची आहे. स्थानिक विषय काढून समोरचा विरोधी उमेदवार जनतेचे लक्ष विचलित करत आहे. मात्र भारतीय जनता पार्टी ही निवडणूक विकासाच्या मुद्यांवर व मोदींनी देशासाठी केलेल्या कामांवर लढवत आहे. नागरिकांना पुन्हा मोदीच पंतप्रधान म्हणून पाहिजे आहेत. त्यांच्या भावना मतदानातून उतरवण्यासाठी भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी विरोधकांच्या आरोप प्रत्यारोपाकडे लक्ष न देता केवळ सर्व नागरिकांना पंतप्रधान मोदींनी गेल्या १० वर्षात देशात केलेला विकास व सर्व जनतेच्या उद्धारासाठी दिलेले योगदानाची आठवण जनतेला करून द्यावी, असे आवाहन करून मोदींनी करोडो हिंदूंचे अयोध्येतच त्याच ठिकाणी राम उभारण्याचे स्वप्न नुकतेच पूर्ण केले आहे. पण या निवडणुकीत काँग्रेसच्या वतीने अयोध्येतील राममंदिर तोडून परत तिथे बाबरी मस्जिद उभारणार असल्याचा व्हिडीओ जाहीर केला आहे. अशा माथेफेरू काँग्रेसने सत्तेत असताना केलेला कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार व त्यांनी केलेल्या पापांची आठवणही जनतेला भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी करून द्यावी, असेही नमूद केले.

## हॉटेलमध्ये अवैध दारू विक्री करणाऱ्या विरोधात ग्रामीण पोलिसांत गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.०७ एप्रिल – तालुक्यातील कालीमठ ते आंबा रोड वर असलेल्या हॉटेलवर अवैधरित्या दारू विक्री करणाऱ्या विरोधात कन्नड ग्रामीण पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार कालीमठ आंबा रोड लगत असलेल्या हॉटेलवर आरोपी अवैधरित्या दारू विक्रीचा व्यवसाय करत असल्याची माहीती दि.०६ रोजी मध्यरात्री १२ वाजेच्या सुमारास गुप्त बातमीदारामार्फत मिळाली असता कन्नड ग्रामीण पोलिस स्टेशन येथील पोलिस उपनिरीक्षक मधुकर मोरे,पोलिस हेडकॉन्स्टेबल युसुफ शेख यांनी आपल्या पथकासह हॉटेलवर धाड मारली असता त्यांना ०१)१०१५ रुपयांच्या देशी दारू संजीवनी संत्राचे ९० एम एल चे २९ बाटल्या प्रति बॉटल किंमत ३५ रुपये दराने तर ०२)७५० मॅकडॉल नंबर वन १८० एम एल च्या ०५ काचेच्या बाटल्या प्रति बॉटल किंमत १५० रुपये, ०३) ११६० किंगफिशर बियर चे ५०० एम एल च्या ०८ सीलबंद टीन लोखंडी डबे किंमत प्रति नग १४५ दराने असा एकूण २९२५ रुपयांचा मुद्देमाल कन्नड ग्रामीण पोलिसांनी जप्त केला असून आरोपी सुनील रावसाहेब मोरे वय ३५ वर्ष रा. आंबा तालुका कन्नड याच्या विरोधात पोलिस उपनिरीक्षक मधुकर मोरे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे,

अधिक तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक डॉ.रामचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेडकॉन्स्टेबल धीरज चव्हाण हे करत आहेत.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद,**

किरकोळ दिवाणी अर्ण ग्रा.:– ८./२०२४.

अर्जदार : १) कृष्णा ओंकार राठोड, वयः ४० वर्षे, धंदा शेती, २) समाधान ऑकार राठोड, वयः ३५ वर्षे, धंदा शेती, दोन्ही, रा. जंगला तांडा ता. सोयगांव जि, औरंगाबाद,

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रगटनव्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे. कविताबाई ओंकार राठोड यांचा मृत्यु दिनांकः– १३/०४/२०१८ ला जंगला तांडा ता. सोयगांव जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. मयतास वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. (पुढील दिनांकः१५/०६/२०२४).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा, अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक:–७/०५/२०२४ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्रं. २००/२०२४

अर्जदार – १) आशा भ्र. सोमनाथ इंगळे वय ४० वर्षे, धंदा घरकाम रा. लासूर स्टेशन ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) प्रथमेश सोमनाथ इंगळे वय १६ वर्षे, अ.पा आई आशा भ्र. सोमनाथ इंगळे वय ४० वर्षे, धंदा घरकाम रा. लासूर स्टेशन ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर. ३) वेदिका सोमनाथ इंगळे वय १० वर्षे, अ.पाआई. आशा भ्र. सोमनाथ इंगळे वय ४० वर्षे, धंदा घरकाम रा. लासूर स्टेशन ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) कमल गंगाधर इंगळे वय ६४ वर्षे, धंदा घरकाम रा. लासूर स्टेशन ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ व ३ ची जनकमाता असुन अर्जदार क्र. ४ हि अर्जदार क्र. १ ची सासू असून मयत सोमनाथची आई आहे वरील सर्व नमुद ठिकाणचे रहिवाशी आहेत. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ व ३ चे वडील व अर्जदार क्र, ४ चा मुलगा नामे सोमनाथ गंगाधर इंगळे हे मौजे लासूर स्टेशन ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक १७/०३/२०२४ रोजी मौजे शिरेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे अपघाताने मयत झाले आहे आता मयत सोमनाथ गंगाधर इंगळे यांना अर्जदार क्र.१ ते ४ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयत सोमनाथ गंगाधर इंगळे यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. अर्जदार क्र. १ ते ४ यांना शासकीय–निमशासकीय व इतर कार्यालयीन कामाकरीता मयत सोमनाथ गंगाधर इंगळे यांचे वारस प्रमाणपत्राची (हेअरशिप सर्टिफिकीट) ची आवश्यक असल्याने अर्जदार क्र. १ ते ४ यांनी प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदाराचा अर्जास व त्यातील मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर असेल तर संबन्धीतानी त्यांचा असलेला आक्षेप उजर या न्यायालयात व्यक्तिश अथवा विधीज्ञ मार्फत हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा मुदतीनंतर आलेला आक्षेप उजर गृहीत धरला जाणार नाही. व हे न्यायालय अर्जदाराच्या हक्कात मागणी प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील.

करिता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्याने आज दिनांक ०६/०५/२०२४ रोजी दिले.

लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर, गंगापूर

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद,**

कि.दि.अर्ज क्र.१६८/२०२४

पु–ता. १९/०६/२०२४

अर्जदार : १) श्रीमती नर्मदावाई भ्र. भागचंद जाधव, वय ६० वर्षे, धंदा घरकाम, रा. टेंभापुरी ता. गंगापुर जि. औरंगाबाद. २) मनोज पि. भागचंद जाधव, वय २० वर्षे, धंदा शेती रा. टेंभापुरी ता. गंगापुर जि. औरंगाबाद. ३) सुनिता भ्र. साईनाथ प्रधान, वय ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. अंबेलोहळ ता. गंगापुर जि. औरंगाबाद. ४) मनिषा भ्र. खंडु निगोटे, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. हडसपिंपळगाव, करंजगाव ता. जि. औरंगाबाद. ५) दुर्गा भ्र. दिलीप मोरे, वय ३३ वर्षे, धंदा घरकाम, रा. भऊर ता. वैजापुर जि. औरंगाबाद. ६) सरिता भ्र. दिपक गुडदे, वय ३१ वर्षे, धंदा घरकाम, रा. बगडी ता. गंगापुर जि. औरंगाबाद. ७) गिता भ्र. महेंद्र मोरे, वय २९ वर्षे, धंदा घरकाम, रा. भऊर ता. वैजापुर जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार – निरंक

प्रकरण – हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार क्र. १ ते ७ यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. पी.जी. आठवले यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. २ ते ७ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व वहिण असुन अर्जदार क्र.१ ही त्यांची जनकमाता आहे. अर्जदार क्र.१ चे पति, अर्जदार क्र.२ ते ७ यांचे पिता नामे भागचंद कचरु जाधव हे मौजे टेंभापुरी ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथील रहिवाशी होते ते दिनांक १९/०१/२०२४ रोजी मयत झालेले आहे. मयत भागचंद कचरु जाधव यांना अर्जदार क्र.१ ही पत्नी, अर्जदार क्र.२ हा मुलगा व अर्जदार क्र.३ ते ७ ह्या मुली असे कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याने अर्जदारांनी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप–उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०७/०५/२०२४ रोजी दिले.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

### जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश मा. वाघचौरे साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क. १७५/२०२४

अर्जदार : १) गौरी संतोष चरांडे, वय. ३९ वर्षे, धंदा, शेती व घरकाम, रा. कोबापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) आरती संतोष चरांडे, वय. १३ वर्षे, अ.पा. क. आई अर्जदार क्र. १ नामे गौरी संतोष चरांडे, रा. कोबापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद. ३) श्रुती संतोष चरांडे, वय ११ वर्षे, अ.पा. क. आई अर्जदार क. १ नामे गौरी संतोष चरांडे, रा. कोबापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत.

याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, संतोष हरिचंद्र चंराडे हा दि. ०१/०४/२०२३ रोजी मौजे सिरसगांव ता. गंगापूर येथे मयत झालेला आहे. अर्जदार क. १ ते ३ हे वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे संतोष हरिचंद्र चंराडे यांना अर्जदार क. १ ही पत्नी असून अर्जदार क. २ व ३ हया अज्ञान मुली असून या व्यतिरिक्त मयत संतोष हरिचंद्र चंराडे यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयताच्या माघारी केवळ अर्जदार क. १ ते ३ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना शासकीय/निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप / उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप / उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक :– ०७/०५/२०२४

आदेशावरून

सहाय्यक अधिक्षक,

दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर

## अग्रलेख...

# उधळले बेताल जिभेचे वारू...

काहीही करून राजकारणातील सभ्यतेची आणि संस्कृतीची पातळी सोडायचीच, असे एकदा ठरविल्यावर देशाच्या प्रतिष्ठेला, सुरक्षेला आणि राजकारणाच्या नैतिकतेला वेठीस धरण्याची काँग्रेसची सवय नवी नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमी ज्यांचा उल्लेख 'शहजादा' असा करतात ते काँग्रेसचे सर्वोच्च नेते राहुल गांधी यांनी परदेशातील विविध व्यासपीठांवरून मुलाखती देताना देशाच्या ऐक्याविषयी, समाजरचनेविषयी आणि धार्मिक भावनांविषयी केलेल्या काही अप्रिय वक्तव्यांतून अकारण वाद ओढवून घेतल्याच्या अनेक घटना देशाला आठवत असतील. भारत हे प्राचीन काळापासून एकसंघ राष्ट्र आहे आणि भारतीयत्व हा या राष्ट्राचा आत्मा आहे. या राष्ट्रात विविध धर्म, प्रांत, पंथ, भाषा, संस्कृती आपापल्या परंपरा जपत ऐक्यभावनेने हजारो वर्षांपासून नांदत असताना, त्यांना प्रांतभेदामध्ये, धर्मभेदामध्ये गुरफटवून किंवा जातीय द्वेषाची बीजे रुजवून समाजाच्या या ऐक्याला धक्का देण्याचे प्रयोग राजकीय स्वार्थासाठी नेहमीच सुरू असतात. मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून व देशात प्रचंड जनाधार प्राप्त झाल्यापासून सत्तेची स्वप्नेदेखील दुरापास्त झाल्यामुळे वैफल्याच्या गर्तेत गुरफटलेले अनेक नेते संयम सोडून बेताल वक्तव्ये करू लागली आहेत. १० वर्षांपूर्वी, जेव्हा मोदी सरकारला देशाने प्रचंड बहुमताने विजयी करून देशाची सत्ता भाजपाच्या हाती सुपूर्द केली, तेव्हा सत्तेची ऊब हरपल्यामुळे नैराश्यग्रस्त झालेल्या काही नेत्यांमध्ये काँग्रेसचे नेते पहिल्या रांगेत होते. त्याच वेळी काँग्रेसचे नेते मणिशंकर अय्यर यांनी पाकिस्तानला घातलेले एक साकडे देशाला कधीच विसरता येणार नाही. नोव्हेंबर २०१५ मध्ये एका विदेशी वाहिनीवरील चर्चेत मणिशंकर अय्यर यांनी पाकिस्तानी नेत्यांकडे मोदी सरकारला हटविण्यासाठी मदत करण्याचे साकडे घातले होते. त्यावरून गदारोळ माजला होता आणि 'ही मागणी तुम्ही पाकिस्तानच्या आयएसआयकडे करत आहात का?' असा सवालही त्यांना विचारला गेला होता. त्यामुळे मोदी सरकार हटविणे हे काँग्रेसचे कायम उद्दिष्ट असले, तरी मतपेटीच्या माध्यमातून पुन्हा सत्तेवर येणे शक्य नाही, या निराशाजनक जाणिवेने काँग्रेसी नेत्यांनी आपल्या सत्तेच्या राजकारणासाठी देशाच्या प्रतिष्ठेला वेठीस धरण्याचे धोरण ठरविले असावे, या शंकेची पाळेमुळे तेव्हापासूनच भारतातील जनतेच्या मनात रुजली आहेत. राहुल गांधी यांनीदेखील परदेशात जाऊन भारतातील लोकशाहीच्या पुनर्स्थापनेसाठी मदतीचे साकडे घालणारे सूर आळविले होते. मोदी सरकारच्या सत्ताकाळात भारतातील लोकशाही धोक्यात असल्याचा कांगावा तर परदेशातील मुलाखतीदरम्यानच्या त्यांच्या सुरातून नेहमीच ओसंडत असतानाच, ते साकडे म्हणजे भारताच्या स्वाभिमानावर व प्रतिष्ठेवर परदेशात जाऊन शिंतोडे उडविण्याचाच प्रकार ठरला होता. सत्तेच्या राजकारणासाठी देशाला वेठीला धरणे, देशाच्या अस्मिताचिन्हांविषयी अनुदार उद्गार काढणे, अहोरात्र डोळ्यात तेल घालून सजगपणे देशाच्या सीमांचे संरक्षण करणाऱ्या शूर जवानांच्या शौर्यावर प्रश्नचिन्हे उमटविणे हा विरोधकांच्या राजनीतीचाच एक भाग झाला आहे. मोदी सरकारने स्वीकारलेल्या शून्य सहनशीलता धोरणाचा धागा म्हणून पाकिस्तानात घुसून तेथील दहशतवाद्यांचे हल्ले नेस्तनाबूत करण्याच्या सैन्याच्या शौर्याचे पुरावे मागण्यापर्यंत व त्या कारवाईविषयी जनतेच्या मनात संभ्रम पेरण्यापर्यंत या राजकारणाची मजल गेली होती. अशा राजनीतीने कळसाध्याय गाठला असून आता त्याच राजनीतीचा नवा अंक पुन्हा एकदा पटलावर येऊ पाहात आहे. सत्ताधारी पक्षाच्या नेत्याची प्रतिमा मलिन करण्याच्या धोरणाचा भाग म्हणून देशाच्या संरक्षणसिद्धतेसारख्या संवेदनशील मुद्द्यावरच वादळे उठविली जात असतील, तर अशी राजनीती देशाला कोणत्या दशेकडे घेऊन जाईल, याचा विचार समाजातील विवेकशील घटकांनी अवश्य करावयास हवा.

जम्मू-काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यात शनिवारी भारतीय हवाई दलाच्या ताफ्यावर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात हवाई दलाचे पाच जवान जखमी झाले. पैकी एकाचा लष्करी रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्या जवानाचे हौतात्म्य वाया गेलेले नाही. या घटनेनंतर लगेचच सुरक्षा दलांनी हल्ल्याची पाळेमुळे खणून काढण्यास सुरुवात केली आणि शोपियान जिल्ह्यातून दहशतवाद्यांच्या दोघा कथित साथीदारांना अटक केली. त्यांच्याकडील शस्त्रास्त्रे व दारूगोळाही जप्त केला. या कटाची उकल आता होऊ लागली असून लष्कर-ए-तोयबा या अतिरेकी संघटनेचा या हल्ल्यात हात असल्याच्या संशयास पुष्टी देणारे काही धागेदोरे हाती लागत आहेत. अशा कारवायांपासून देशाचे आणि देशाच्या जनतेचे संरक्षण करण्यासाठी सदैव सज्ज असलेल्या जवानांना नैतिक धैर्य देण्याकरिता उभा देश त्यांच्या पाठीशी असल्याची भावना सदैव व्यक्त करत असताना, काही नेत्यांना मात्र, पुन्हा एकदा निवडणुकीच्या राजकारणाचे भांडवल करण्याचा हा नवा मुद्दा हाती सापडल्याचा आसुरी आनंद लपविता आलेला नाही, हे दुर्दैवी आहे. निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर या हल्ल्याची सडेतोड परतफेड केली जाईल, असा इशाराही काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंडी आघाडीने दिल्याचे सांगण्यात येते. निवडणुकीच्या राजकारणात अलगदपणे या संवेदनशील आणि नाजूक मुद्द्याचे भांडवल करण्याचा हा नवा प्रयत्न असावा. तसेही, या हल्ल्यावरून काँग्रेसच्याच पंजाबमधील एका नेत्याने पुन्हा एकदा मागच्याच इतिहासाची पुनरावृत्ती केली आहे. पुलवामा हल्ल्याप्रमाणेच संशयाचे धुके पेरण्याचा विरोधकांचा प्रयत्न अधूनमधून उघड होतच असतो. अलिकडे मुंबईवरील पाकिस्तानी दहशतवादी हल्ल्यातील अतिरेकी कसाबच्या चकमक प्रकरणावरूनही विनाकारण आरोपांचे शिंतोडे उडविण्याचा पोरकट प्रकारही उघडकीस आला आहे. त्यात भर घालण्यासाठी काँग्रेसी संस्कृतीचे पाईक असलेले पंजाबचे माजी मुख्यमंत्री चरणजितसिंग चन्नी यांनीही या हल्ल्याचे वर्णन 'भाजपाचा निवडणूकपूर्व स्टंट' असे केले आहे. राजकारणात परस्परांवर चिखलफेक होत असते. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपही होत असतात, पण ज्या घटनेत एका देशभक्त जवानास हौतात्म्य पत्करावे लागले, ज्या घटनेनंतर अतिरेकी कारवायांची पाळेमुळे खणून काढण्याच्या लष्करी मोहिमा तीव्र झाल्या आणि पुन्हा एकदा दहशतवादग्रस्त जनतेला निर्धास्त वाटण्याजोगे वातावरण प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांतून ज्या लष्करावरील विश्वास दृढ झाला, त्या घटनेचे वर्णन 'निवडणूकपूर्व स्टंटबाजी' असे करून काँग्रेसी मानसिकतेच्या चन्नी यांनी या घटनेच्या संवेदनशीलतेलाच संशयाच्या भोवऱ्यात ढकलण्याचे राजकारण साधले आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे, काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांनी चन्नी यांच्या या वक्तव्याबद्दल माफी मागावी, अशी मागणी भाजपाने केली आहे. मात्र, ज्या काँग्रेसने अशा घटनांचा राजकीय फायद्यासाठी स्वार्थी वापर करण्याचा प्रयत्न याआधीही केला होता, त्या पक्षाचे नेते अशा वक्तव्यांचा निषेध करणार नाहीत आणि माफीदेखील मागणार नाहीत, हे स्पष्ट आहे. निवडणुका जिंकण्यासाठी असे हल्ले घडविले जात असतील तर १९६२, १९६५ आणि १९७१ मधील लढायादेखील निवडणुका जिंकण्यासाठीच झाल्या होत्या का, या प्रश्नावर काँग्रेसला स्पष्टीकरण द्यावे लागेल. मणिशंकर अय्यर यांच्या त्या वक्तव्यानंतरही असाच गदारोळ झाला, राहुल गांधी यांच्या विदेशातील मुलाखतींनंतरही अशीच वादळे उठली आणि चन्नी यांच्या बेताल वक्तव्यानंतरही तेच वादळ पुन्हा उफाळले आहे. तरी निवडणुकांच्या राजकारणासाठी सैन्याच्या शौर्यास वेठीला धरून देशाच्या संरक्षणासारख्या संवेदनशील मुद्द्या ऐरणीवर आणण्याच्या या प्रयत्नांची विवेकी चिकित्सा व्हावयास हवी. तसेही, बेताल बडबड करून गंभीर मुद्द्यांचे मातेरे करणाऱ्या राजनीतीला सध्याच्या निवडणुकीच्या रणधुमाळीत भलतीच भरती आली आहे; त्यात आपण मागे पडू नये आणि दुर्लक्षितही राहू नये या भावनेने असे चन्नी जागोजागी उगवलेले दिसतात.

## आंतरराष्ट्रीय

वसंत गणेश काणे

# चीनची ही शस्त्रसिद्धता कुणासाठी?

जगातले बहुतेक देश, दुसरा देश काय करतो आहे, हे जाणून घेण्याच्या खटाटोपात असतात. याला क्वचितच कुणाचा अपवाद असेल. यातल्या मातब्बर मंडळीत अमेरिका, रशिया, चीन हे देश येतात. अमेरिकेने चीनमध्ये अशाच प्रकारे डोकावून पाहिले तेव्हा चीन आपल्या रणनीतीमध्ये बदल करण्याच्या खटाटोपात आहे, असे अमेरिकेला आढळून आले आहे. तसा अहवालच अमेरिकेच्या सैनिकी रणनीतीविषयक समितीने तयार करून देशासमोर ठेवला आहे. चीनने अतिविकसित आक्रमक शस्त्रांसोबत आक्रमण निवारक अतिविकसित शस्त्रेही तयार करण्याचा धडाकाच लावला आहे. यात निरनिराळ्या प्रकारांची शस्त्रे आहेत, ती भरपूर प्रमाणात तयार केली जात आहेत आणि त्यांची गुणवत्ताही अद्ययावत स्वरूपाची आहे, असे हा अहवाल सांगतो.

**शस्त्रे डागता आली पाहिजेत** : नुसती शस्त्रे असून उपयोगाचे नाही. ती डागण्यासाठीही यंत्रणा (डिलिव्हरी सिस्टिम) पाहिजे. जमिनीवरून प्रक्षेपित करायची आंतरराष्ट्रीय प्रक्षेपणास्त्रे (इंटरकॉन्टिनेंटल बॅलिस्टिक मिसाईल - आयसीबीएम) तयार करण्याचा जंगी कार्यक्रम चीनने हाती घेतला आहे. अशाप्रकारची क्षेपणास्त्रे (मिसाईल्स) आजच चीनजवळ अमेरिकेपेक्षा जास्त आहेत. हल्ला झाला तर त्याचा प्रतिबंध करण्याची क्षमता असलेली कवचवजा शस्त्रे चीन का बरे तयार करतो आहे, असा प्रश्न अमेरिकेला पडला आहे. आज जगातले कोणतेही राष्ट्र स्वतःहून पुढाकार घेऊन चीनवर हल्ला करण्याच्या विचारात असेल, असे संभवत नाही. मग चीनच तर असा हल्ला करण्याच्या विचारात नाही ना, अशी रास्त शंका अमेरिकेला आली आहे. असा हल्ला चीनने केला तर त्याला आक्रमित राष्ट्र चोख उत्तर देण्याचे बाबतीत मागेपुढे पाहणार नाही, हे उघड आहे. अशावेळी बचाव करता यावा म्हणून तर चीन अशी कवचकुंडले प्राप्त करण्याच्या खटाटोपात नाही ना, असा प्रश्न अमेरिकेला पडला आहे.

**चीनचे संभाव्य आक्रमण कुणावर?** : चीन आक्रमण करण्यासाठी दोनच राष्ट्रांचा विचार करीत असणार. पहिले राष्ट्र आहे अमेरिका आणि दुसरे असू शकते भारत. विद्यमान प्रतिस्पर्धी म्हणून चीन अमेरिकेकडे बघत असणार आणि संभाव्य प्रतिस्पर्धी म्हणून भारताकडे. भारताच्या सीमेवर चीनने जी सेना आणून उभी केली आहे, ती लगेचच आक्रमण करील, असे वाटत नाही. चीन भारताच्या अधूनमधून लहान-मोठ्या खोड्या काढीत राहील आणि ठिकठिकाणी चकमकीही होत राहतील. पण यामुळे भारताचे फार मोठे सैन्य सीमेवर सर्वत्र अडकून राहील. त्यासाठी भारताला कायमच फार मोठा खर्च करावा लागेल आणि विकासावर करायच्या खर्चात भारताला सतत कपात करत राहावी लागेल, हा चीनचा मर्यादित हेतू निदान सध्यातरी स्पष्ट दिसतो आहे. अण्वस्त्रांचे बाबतीत चीन अमेरिका आणि रशिया यांच्या बरोबरीला येऊन बसू इच्छितो आहे, ही भारतासाठी धोक्याची घंटाच मानली पाहिजे. म्हणूनच अण्वस्त्र निवारक यंत्रणा उभी करण्यासाठीचे भारताचे प्रयत्न महत्त्वाचे ठरतात.

**चीनचे मनसुबे आणि सावध भारत** : भारताने या दृष्टीने वेळीच दखल घेणे का आवश्यक होते, हे जाणून घेण्यासाठी चीनच्या क्षेपणास्त्रांचे तळ कुठे कुठे आहेत, हे पाहिल्यास लक्षात येते. कुनमिंग आदी बहुतेक तळ भारतापासून विमानाने १५०० किलोमीटर अंतरावर आहेत. याचा अर्थ असा की, भारतातील महत्त्वाची शहरे आणि सैन्यतळ चीनच्या क्षेपणास्त्रांच्या कक्षेत येतात. याशिवाय चीन अण्वस्त्रे, क्षेपणास्त्रविषयक कच्चा माल आणि तंत्रज्ञान पाकिस्तानलाही पुरवतो आहे, ही बाब तर आणखीनच गंभीर आहे. कारण एक जबाबदार राष्ट्र अशी पाकिस्तानची ख्याती नाही. चीनचे हे कृत्य माकडाच्या हाती कोलित ठरेल.

**शस्त्रसज्जतेसाठी स्वतंत्र विद्यापीठ** : शी जिनपिंग यांनी सत्तारूढ होताच सैन्य दलात 'रॉकेट फोर्स' या नावाची एक नवीन शाखा उभारली आहे आणि सर्व प्रकारांची क्षेपणास्त्रे या शाखेकडे सोपविली आहेत. 'स्ट्रॅटेजिक सपोर्ट फोर्स' या शाखेकडे अवकाशातून होऊ शकणारे हल्ले, सायबर हल्ले आणि इलेक्ट्रॉनिक हल्ले थोपवण्याची जबाबदारी सोपविली आहे. या विषयांशी संबंधित एक विद्यापीठच चीनमध्ये आहे. रूढ अभ्यासक्रमासोबत नवीन संशोधन हा विषयही या विद्यापीठात हाताळला जातो. या विद्यापीठातील संशोधकांनी अतिवेगवान आणि महत्तम पल्ला गाठणारी क्षेपणास्त्रे विकसित केली आहेत. चीनवर कोणत्याही दूरवरच्या राष्ट्राकडून हल्ला होण्याची शक्यता नसताना एकीकडे अवकाशातून होऊ शकणारे हल्ले, सायबर हल्ले आणि इलेक्ट्रॉनिक हल्ले थोपवण्याची कवचसदृश बचाव यंत्रणा उभारायची आणि दुसरीकडे प्रत्याघात करण्यासाठीची अत्याधुनिक शस्त्रास्त्रे आणि क्षेपणास्त्रे चीन तयार करीत आहे.

या नवीन क्षेपणास्त्रांवर जैविक, रासायनिक आणि आण्विक अशी कोणत्याही प्रकारची शस्त्रे असू शकतात. यांच्या जोडीला सुलभ हालचालीसाठी चीन ठिकठिकाणी परस्परांशी जोडलेले बोगदे तयार करतो आहे. सर्व शस्त्रसाठा यात साठवून सुरक्षित ठेवण्यासाठी आणि भूपृष्ठाखालूनच्या हालचालीसाठी ही व्यवस्था आहे. याशिवाय चीन काँक्रिटची शंभरापेक्षा जास्त भूमिगत आश्रयस्थाने (सिलो) बांधतो आहे. ही व्यक्तींसाठी सुरक्षा प्रदान करतील तसेच शस्त्रास्त्रे साठविण्याठीही उपयोगी पडू शकणारी आहेत. शस्त्रे आहेत पण ती डागायची कशी, हा प्रश्न हाताळण्यासाठी चीनने एक जंगी कार्यक्रम आखला आहे. हवेतूनच डागता येतील अशी बॅलिस्टिक मिसाईल्स आणि क्रूझ मिसाईल्स डागण्यासाठी नवीन मंच (प्लॅटफॉर्म्स) बांधले आहेत.

'स्टेल्थ बॉम्बर' नावाचे एक अमेरिकन बॉम्बर आहे. हे विमान ओळखणाऱ्या यंत्रणेला चकमा देऊन शत्रूच्या प्रदेशात शिरून बॉम्ब हल्ला करू शकते. अशी बॉम्बर विमाने तयार करण्याच्या खटाटोपात चीन आहे. ही विमाने अण्वस्त्रेही वाहून नेऊ शकतात. याशिवाय मानवविरहित हवाई विमाने तयार करण्याचा कार्यक्रम चीनने हाती घेतला आहे. अण्वस्त्रधारी क्षेपणास्त्रे वाहून नेणारी सबमरीन तर चीनने २०१४ सालीच विकसित केली होती. तिचे हिंदी महासागरातील अस्तित्व जाणवताच भारताने जागरूकतेने तोडीस तोड म्हणून तत्काळ अँटी-सबमरीन वॉरफेअर (एएसडब्ल्यू) केपेबिलिटी ही निवारण क्षमता प्राप्त करण्यासाठीचा एक जंगी कार्यक्रम हाती घेऊन तो तडीस नेला.

**अतिशुद्ध युरेनियम हवे कशाला?** : अतिशुद्ध युरेनियम आणि पुनर्प्राप्त (रिप्रोसेस्ड) प्लुटोनियम तयार करण्यासाठी चीनने पराकोटीचे प्रयत्न चालविले आहेत. यांची माहिती प्रत्येक देशाने स्वतःहून वेळोवेळी जाहीर केली पाहिजे, असा आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार आहे. चीनने २०१७ पासून या मूलद्रव्यांचा आपल्याजवळ किती साठा आहे, हे जाहीर करणे थांबवले आहे. पण बित्तंबातमी काढणाऱ्या शोध पत्रकारांनी चीनचे बिंग फोडले आणि अतिशुद्ध युरेनियम वापरून तयार केलेली ५०० न्युक्लिअर वॉरहेड्स चीनजवळ तयार आहेत. आणखी तयार करणे सुरू आहे आणि अशी निदान १००० अस्त्रे चीन तयार करतो आहे, ही बाब उघड केली आहे. आम्ही केवळ किमान प्रतिबंधात्मक (मिनिमम डिटरन्स) कारवाईपुरतीच लष्करी क्षमता साध्य करीत आहोत, हा चीनचा दावा खोटा ठरला आहे. या तयारीला बचावापुरती शस्त्रसज्जता मानायला जग तयार होईल का?

आपल्यावर हल्ला होतो आहे, हे तत्काळ कळावे, त्याच्या निवारणाची सिद्धता असावी आणि लगेच प्रत्याघात करून शत्रूस नामोहरम करता यावे, यासाठीची क्षमता प्राप्त करण्याची योजना आखून ती अंमलात आणायला अमेरिका आणि भारत यांनीही तातडीने सुरुवात केली आहे. कारण, दोन राष्ट्रे समान शक्तीची असतील तर ती एकमेकांवर फार तर गुरगुरतात, पण हल्ले करण्याचे नाईलाज होईतो टाळतात. म्हणून तर समर्थ सांगून गेले आहेत की,

***अखंड सावधान असावे । दुश्चित कदापि नसावे ॥***
***तजविजा करीत बसावे । एकांत स्थळी ॥***

९४२२८०४४३०

## वेध

नितीन शिरसाट

# उष्णतेची लाट; पुन्हा अवकाळीचा इशारा!

प्रत्येक शहराचे एक भौगोलिक वैशिष्ट्य असते. हवामानाची माहिती देताना ती बाब विचारात घ्यावी लागते. त्याशिवाय शहराच्या आसपासच्या परिसरातील हवामान, वर्षातील ऋतू-वेळ या सगळ्यांचा अंदाज घेऊन हवामानाची माहिती सादर केली जाते. 'हवामान' हा शब्द वातावरणाच्या तात्पुरत्या स्थितीचा निदर्शक आहे. आपापल्या परिसरातील वातावरणाच्या अनुषंगाने आपण एकूण हवामानाचा विचार करतो. मात्र, हवामान हे पाण्यात गारगोटीसारखे कार्य करते. गारगोटी पाण्यात टाकल्यानंतर तिचे तरंग पाण्यात दूरपर्यंत उमटतात. जगभरातील हवामानाच्या बाबतीतही हेच घडते. मानवी जीवनावर हवामानाचा अनेक प्रकारे परिणाम होतो. दिवसागणिक बदलणारे हवामान वाढते. प्रचंड तापमान, वादळ, चक्रीवादळ आणि हिमवादळ यामुळे होणाऱ्या गंभीर नुकसानीमुळे मानवी जीवनाची वाताहत होते. राज्यात पुढील काही दिवस विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्रात वादळी वाऱ्यासह पाऊस आणि उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. विदर्भासह मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाच्या सरी पाहायला मिळतील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. पुढील चार ते पाच दिवस विदर्भात आणि संलग्न मराठवाड्यातील जिल्ह्यांत काही ठिकाणी विजांचा कडकडाट आणि जोरदार वारे वाहण्याची शक्यता असून पावसाचाही अंदाज आहे. तसेच काही भागांत गारपीट होण्याचीही शक्यता आहे. दरम्यान, काही भागांत तापमान वाढण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. राज्यात विदर्भ आणि मराठवाड्याला उष्णतेच्या झळांचा सामना करावा लागला. राज्यात सर्वाधिक ४४.३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद अकोला येथे झाली. त्याखालोखाल अमरावती ४३.८, चंद्रपूर ४३.८, गडचिरोली, वर्धा आणि वाशीम ४३.०, बीड ४३.१, सोलापूर ४३.४, जळगाव ४२.३, मराठवाड्यात परभणी येथे ४३.६ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. उष्णतेची लाट निर्माण झाल्याने दुपारी रस्त्याने अनेक ठिकाणी शुकशुकाट असतो. लग्नसराई असल्याने त्याचा परिणाम बाहेरगावी जाणारे प्रवासी, वऱ्हाडी बसस्थानकावर कमी झाले आहेत. भौगोलिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा 'शून्य सावली दिवस' महाराष्ट्रात ३ मे ते ३१ मे दरम्यान येणार आहे. विद्यार्थी आणि संशोधन करणाऱ्या नागरिकांनी या भौगोलिक घटनांचा अभ्यास आणि निरीक्षण करावे, असे आवाहन खगोल अभ्यासकांनी केले आहे. अवकाळी पाऊस आणि तापमानातील फरक यामुळे बागायती क्षेत्राला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. ग्लोबल वॉर्मिंगशी संबंधित दुष्काळ, पूर, गारपीट इत्यादी फळबाग लागवडीत गुंतलेल्या शेतकऱ्यांसाठी घातक ठरू शकतात. हवामान बदलामुळे तापमान वाढल्याने पशुधन उत्पादन आणि आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. बदलत्या हवामानाचा सामना करताना देशांतर्गत अन्न उत्पादन टिकवून ठेवण्याच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी भारतीय कृषी संशोधन परिषद, कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय भारत सरकार यांनी 'नॅशनल इनोव्हेशन्स इन क्लायमेट रेझिलिएंट ॲग्रिकल्चर' हा प्रमुख नेटवर्क प्रकल्प सुरू केला. योजनांद्वारे हवामान बदलाशी मुकाबला करण्यासाठी भारत सरकार कटिबद्ध आहे. शाश्वत शेती, आरोग्य, हिमालयीन परिसंस्था, शाश्वत अधिवास, हरित भारत आणि हवामान बदलासाठी धोरणात्मक ज्ञान. सर्व हवामान कृतींसाठी एक व्यापक उपक्रम प्रदान करते. गावातील ८० टक्के लोकांचा व्यवसाय शेती असताना त्यासाठी आवश्यक असणारे हवामान केंद्र मात्र दिसत नाही. ज्या ठिकाणी विशेषतः कृषी विज्ञान केंद्रांनी स्वयंचलित हवामान केंद्र बसवलेले आहे, तेथील शेतकऱ्यांना चांगल्या प्रकारे मार्गदर्शन मिळते. शेतकरी समृद्ध होण्याकडे वाटचाल करीत आहेत. बाजारात साधारण स्थानिक हवामान केंद्राची किंमत ३५ हजारांपासून एक ते दीड लाखापर्यंत आहे. या हवामान केंद्रामधील सर्व नोंदी दर १० मिनिटाला स्वयंचलित पद्धतीने घेतल्या जातात. पीक नुकसान मदतीसाठी स्वयंचलित हवामान केंद्र त्यामध्ये भ्रमणध्वनीचे सिमकार्ड टाकले तर लोकांना या नोंदी मोफत पोहोचू शकतात. या सर्व माहितीचा उपयोग योग्य कृषी सल्लागाराची मदत घेऊन केला तर याचा शेती आणि उत्पादनात भरपूर उपयोग होतो. हवामान केंद्र हा स्मार्ट शेतीचा पहिला पाया आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वीच प्रत्येक ग्रामपंचायतीने शासन योजना, अनुदानाची वाट न बघता आपल्या गावात हवामान केंद्र त्वरित बसवून स्मार्ट शेती करायला हवी. माणसाच्या वेगवेगळ्या कृत्यांमुळे पृथ्वीचे तापमान वाढतेय आणि मानवी आयुष्याला धोके निर्माण होत आहेत. याविषयी पावले उचलली नाहीत तर माणूस आणि निसर्ग या दोन्हींना धोका निर्माण होईल.

९८८१७१७८२८

## इतस्ततः

दत्तात्रेय आंबुलकर

# 'नमो' नेतृत्वाचे तीन विशेष : प्रदेश, भाषा आणि वेश

सध्या लोकसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. या सगळ्या सभा, रॅली, रोड शो दरम्यान प्रदेश, भाषा आणि वेशभूषा या तिन्ही कसोट्यांवर वेगळेपण उठून दिसते; ते केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेच. काही नेत्यांच्या पोशाखाचा परिचयच मुळी त्यांच्या नावासह होत असतो, हा इतिहास आहे. पंडित नेहरूंची गांधी टोपी व गुलाबाच्या फुलासह असणारी वेशभूषा, वगबंधू मुजीबचे विशेष काळे जॅकिट ही जागतिक स्तरावर कधीकाळी चर्चित असणारी नावे यासंदर्भात प्रामुख्याने सांगता येतील. मात्र, मोदी आणि त्यांच्या सहकाऱ्यांची पोशाखाच्या संदर्भात विशेष दर्जा आणि चोखंदळता प्राप्त करून दिली असल्याचे स्पष्ट मत सुप्रसिद्ध दिग्दर्शक सुधन्वा देशपांडे व्यक्त करतात. त्यांच्या मते, स्वतः नरेंद्र मोदी चर्चा-बैठकींपासून सभा-संमेलनांपर्यंतच्या विविध प्रसंगी आपल्या नेतृत्व, कर्तृत्व व वक्तृवाला प्रासंगिक, समर्पक व योग्य साथ देण्यासाठी प्रसंगानुरूप कपड्यांचा वापर करतात. यासंदर्भातील नवे व ताजे उदाहरण द्यायचे म्हणजे, त्यांच्या नुकत्याच झालेल्या दक्षिण भारतातील मंदिर यात्रांच्या दरम्यान केवळ दक्षिणेतीलच नव्हे, तर स्थानिक रीतिरिवाजांनुसार पोशाख करून सर्व परंपरांचे पालन केले. याउलट नव्या संसद भवनातील प्रथम प्रवेश असो अथवा अयोध्येतील श्रीराम प्रतिष्ठापना, अशावेळी नरेंद्र मोदी आवर्जून पारंपरिक पूजा पोशाखात उपस्थित असतात. तर, उद्योगपती व व्यापारी संस्थाप्रमुखांशी चर्चा करताना साजेसा कार्यालयीन पोशाख घालतात. मुख्य म्हणजे, या सर्व ठिकाणी व प्रसंगी त्यांचे संबंधित विशेष प्रसंगाशी निगडित असतात. सुमारे १० वर्षांपूर्वी नरेंद्र मोदींच्या कपड्यांचा रंग तुलनेने आजच्यापेक्षा भडक असायचा. पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी आपल्या कपड्यांच्या रंगछटा व रंगसंगती बदलली असल्याचे जाणकार मंडळी सांगतात. या विषयातील एक प्रमुख जाणकार व दिल्लीच्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नोलॉजीच्या टेक्सटाईल डिझाईन विभागातील वरिष्ठ प्राध्यापक आशिया तिवारी यांच्यानुसार, नरेंद्र मोदी यांना परंपरागत भारतीय कापड आणि कपड्यांची मूलभूत आणि चांगली जाण आहे. त्यानुसार, ते आपल्या पोशाखांसह त्यांच्या रंगसंगती आणि प्रकारांची निवड करतात.



राजस्थानच्या दौऱ्यावर जातील तर राजस्थान नव्हे, तर राज्यांतर्गत मारवाड, थार, शेखावटी पद्धतीच्या पारंपरिक व रंगीबेरंगी साफा ही त्यांची स्वाभाविक पसंत असते. उत्तराखंडसारख्या पहाडी राज्यात रंगीत टोपी परिधान करतात तर दक्षिणेत विशिष्ट पद्धतीची लुंगी. महाराष्ट्रातील संतनगरी देहूमध्ये वारकरी पोशाखासह सहभागी पंतप्रधानांची छबी तर चिरस्मरणीय ठरली. याशिवाय, स्वातंत्र्य दिन वा गणतंत्र दिनी लाल किल्ल्यावरून ध्वजारोहण संबोधन करताना भारतातील विविध प्रांतांचे प्रतिनिधित्व करणारे पोशाख जेव्हा सातत्याने पंतप्रधान करतात, तेव्हा त्यामागची त्यांची योजकता-कल्पकता स्पष्ट होते व ते लोकांच्याही लक्षात राहते. मोदीजींच्या पेहरावाची दखल त्यांच्या पंतप्रधानपदाच्या पहिल्या टप्प्यातच आंतरराष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली आणि ती पण चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासह झालेली भेट. त्यावेळी चर्चेच्या दरम्यान शी जिनपिंग यांच्यासह मोदीजींनी परंपरागत कुर्ता-चुडीदारच्या जोडीलाच आकर्षक गॉगलसह काढलेली सेल्फी त्यावेळी भारत-चीन चर्चेप्रमाणेच जागतिक चर्चेचा विषय बनली होती. याचीच नोंद घेत 'न्यूयॉर्क टाईम्स'च्या फॅशन पुरवणीने मोदी व जिनपिंग यांच्या सेल्फीची दखल घेत टिप्पणी केली की, मोदींनी आपले वेगळेपण धोरणात्मक स्वरूपातच नव्हे, तर दिसण्यात पण सिद्ध केले, हे महत्त्वाचे आहे.

अमेरिकन काँग्रेसच्या सदस्या असणाऱ्या अलेक्झांड्रिया ओसियो कॉर्ट्रेझ यांच्यासंदर्भात सांगण्यासारखी विशेष बाब म्हणजे, त्यांची राहणी, वेशभूषा, रंगसंगती ही नेहमीच लॅटिन शैलीची असते. पोशाखतज्ज्ञ आशिया तिवारी यांच्यानुसार, पंतप्रधान मोदींचे प्रस्तावित कार्यक्रम व त्यांची विशेष प्रासंगिकता यावर आधारित वेशभूषेचे अभ्यासपूर्वक व विशेष प्रयत्नांसह पूर्वनियोजन केले जाते. या नियोजनांमध्ये आणखी काय केल्याने प्रभाव वाढण्यास अथवा प्रासंगिकतेचे औचित्य साधण्यास मदत होऊ शकते, याचा विशेष अभ्यासपूर्वक अवलंब केला जातो. उत्तराखंडच्या निवडणूक प्रचारातील एका सभेत अत्यंत महागडा सूट घालून भाषण करतानाचे छायाचित्र प्रकाशित झाले. प्रत्यक्षात हा वेश त्यांना त्यांच्या मित्राने २०१५ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांच्या भेटीसाठी जाण्याच्या निमित्ताने दिला होता. या विशेष वेशावर मोदीजींचे नाव वेगवेगळ्या प्रकारे कोरले होते. यानिमित्ताने त्यावेळी मोदी विरोधकांना त्यांच्यावर टीका करण्याची संधी मिळाली. प्रत्यक्षात मोदींनी त्यांच्या कार्यशैलीनुसार दरवर्षी त्यांना मिळणाऱ्या विशेष भेटवस्तूंच्या जाहीर लिलाव पद्धतीनुसार, या भेट म्हणून मिळालेल्या सूटचा पण लिलाव करविला व त्याची रक्कम 'नमामी गंगे' प्रकल्पाला समर्पित केली. गिनीज इतिहास नोंदीनुसार एका लिलाव बोलीमध्ये सर्वाधिक रक्कम देणारी वस्तू म्हणून मोदींच्या त्या भेट पोशाखाची नोंद झाली.

सुरुवातीला नमूद केलेल्या व्यक्तिमत्त्व वैशिष्ट्यांपैकी त्यांच्या वेश-राहणीभूषेची चर्चा प्रामुख्याने होते. मात्र, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी निगडित असे प्रदेश आणि भाषा हे मुद्दे मोदीजींना नेहमीच पूरक व हजारोंना प्रसंगानुरूप ठरतात, याचा अनुभव येत असतो. तसेच आपल्या फर्ड्या वक्तृत्वाला मोदीजी प्रादेशिक भाषा वा स्थानिक बोलींची जी जोड देतात, त्यामुळे त्यांच्या प्रत्येक भाषणाची परिणामकारकता वाढते. भारतात बोलताना गुजराती, हिंदी व इंग्रजीचा प्रभावी वापर ते करतातच, दक्षिण गुजरातमध्ये प्रदीर्घ काळ संघटनात्मक काम केल्याने त्यांना मराठी चांगले येते. याशिवाय चंदीगड-हिमाचल क्षेत्रात बरीच वर्षे काम केल्याने त्यांना पहाडी परिसरातील डोगरी-गढवाली यांसारख्या बोलीभाषा येतात व त्यांचा ते प्रसंगानुरूप प्रभावीपणे वापर आपल्या भाषणांमध्ये करतात. मोदींच्या भाषण-संवादादरम्यानची अन्य प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजेच, त्यांच्या संवादशैली व समयसूचकतेचे संसदेत वा राजकीय भाषणात वारंवार प्रत्यंतर येतो. संवादाच्या संदर्भात वर नमूद केलेली प्रमुख उदाहरणे मर्यादित व निवडक स्वरूपात असल्याने नरेंद्र मोदींचे नेता-वक्ता असे दुहेरी महत्त्व नेहमीसाठी अधोरेखित होते.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)
९८२२८४७८८६

### मतदानाचा उत्सव... कर्मचारी त्रस्त

देशातील सर्वात मोठा उत्सव म्हणून मतदानाला महत्त्व देण्यात येत आहे. या मतदानाचे कार्य पार पाडणारा सर्वात मोठा कणा हा कर्मचारी वर्ग असतो. मतदानाच्या आदल्या दिवशीच सकाळी ८ वाजतापासून जवळपास ४८ तास झाल्यावरच घरी येतो, मग ती महिला असो अथवा पुरुष. परंतु या कर्मचाऱ्यांकडे निवडणूक आयुक्त व जिल्हाधिकारी कार्यालय माणूस म्हणून बघणार काय? विशेष करून महिला वर्गाला या उत्सवात खूप त्रासातून जावे लागते. सामान घेताना गर्दी इतकी होते की त्यांना बसायची सोयही नसते. जवळजवळ मतदान केंद्र म्हणून शाळेची निवड केली जाते. शाळा असल्यामुळे तिथे स्वच्छता असणे आवश्यक आहे. परंतु काही शाळा ५ वर्षांपासून बंद असूनही त्यांचा मतदान केंद्र म्हणून वापर केला जातो. तरीही तिथे ना स्वच्छता केली जात, ना प्रसाधनाची सोय असते. ती जबाबदारी कोणाची? साहजिकच आहे जिल्हाधिकारी कार्यालय व निवडणूक आयुक्त कार्यालय या अशा शाळा बुथ म्हणून का घेतात आणि घेतली तरी येथे सर्वप्रथम स्वच्छतेला प्राधान्य द्यावे. कमीत कमी एकतरी अनुभवी कर्मचारी ज्याला निवडणूक ड्युटीचा अनुभव आहे असा कर्मचारी बुथवर द्यायला पाहिजे.मतदानाच्या दिवशी पहाटे ५ वाजतापासून कर्मचारी तयारीत लागतो कारण सकाळी ७ वाजता पासूनच मतदानाला सुरुवात होते व या वेळेपासून कर्मचारी इतका व्यस्त होतो की त्याला पाणी सुद्धा पिण्यास वेळ मिळत नाही, जेवण तर दूर राहिले. कर्मचाऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची, बसण्याची व्यवस्था व जेवणासाठी वेळ द्यायला पाहिजे. अतिरिक्त कर्मचाऱ्यांना त्याच बुथवर काही तासांसाठी कामाला लावून इतर व्यस्त असलेल्या कर्मचाऱ्यांना मध्यान्हासाठी वेळ द्यायला पाहिजे. काळानुसार निवडणूक आयोगाने सुधारणा करणे आवश्यक आहे.



**डॉ. शेखर दंताळे**/७८८७८८८०६८

## वाचक पत्रे

### माझे विचार...

भारतीय जनतेसमोर कितीही डोके फोडले तरी मतदानाचा टक्का फारसा वाढत नाही. त्याकरिता सर्वोत्तम पर्याय म्हणजे ज्यावेळेस आपण मतदान करतो तेव्हा जी व्यक्ती मतदान करेल त्याला मतदान केल्याचे व्हिजिटिंग कार्डसारखे एक छोटेसे प्रमाणपत्र द्यायचे. ते प्रमाणपत्र पुढील निवडणुकीपर्यंत सर्व शासकीय योजना, सर्व प्रकारांचे अनुदान, एसटी प्रवासाच्या सवलती, पाल्याची स्कॉलरशिप, दवाखाने, शेतीवर आधारित सवलती या सर्वांसाठी आधारकार्डप्रमाणे आवश्यक करायचे. अर्थात ज्यांच्याकडे मतदान केल्याचे प्रमाणपत्र असेल तोच पुढील पाच वर्षे शासकीय योजनांचा फायदा घेईल अन्यथा नाही. असे झाल्यास एकही मतदार मतदानापासून वंचित राहणार नाही. ऊन असो, वारा असो, पाऊस असो की स्वतःचे लग्न, एवढेच नव्हे, तर अंत्यसंस्कारालादेखील लोक मतदान केल्याशिवाय जाणार नाहीत. हे विचार निवडणूक आयोगापर्यंत गेल्यास यावर विचार झाल्याशिवाय राहणार नाही. याकरिता शक्य होईल तेवढे पुढे पाठवा म्हणजे कदाचित यावर विचार होऊ शकतो. अजून निवडणुकीचे टप्पे बाकी आहेत.

**बळवंत चिंतावार**/९८२३७७५३४९

### विद्यार्थ्यांची आत्महत्या

तेलंगणात इंटरमीडिएटचे निकाल जाहीर झाले. नापास झालेल्या सात विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. त्यात एक मुलगी आहे. मागच्या वर्षी २२ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली होती. अत्यंत गंभीर व विचार करणारी गोष्ट आहे. आत्महत्या आपण नेहमी ऐकतो, परंतु प्रत्येकाची कारणे वेगळी आहे. येथे अपयश नापास होणे एकच कारण आहे त्याची चौकशी व्हायला हवी. विद्यार्थ्यांना अपयश न पचविता येणे, मनाचा भित्रेपणा, समाजातील, घरातील, मित्र-मैत्रिणी काय म्हणतील ही भीती. जीवनात यश-अपयश येणारच त्यासाठी लहानपणी शिवाजी महाराज, रामायण-महाभारतातील लोकांनासुद्धा अपयश आले होते, त्यांनी अपयशावर कशी मात केली, या गोष्टी सांगाव्या. अपयश पचविण्यासाठी शारीरिक मानसिकता बळकट हवी. अपयश पुढील यशाची पायरी आहे. घरातील, बाकीच्यांनी लगेच त्याला बोलू नये, शांत राहावे, त्याच्या वागण्याकडे लक्ष द्यावे. विद्यार्थ्यांनो, तुम्ही तुमची जीवनयात्रा संपविली, परंतु संपूर्ण कुटुंब आयुष्यभर तुमच्या आठवणीत होरपळून निघणार. बहीण किंवा भाऊ रक्षाबंधन, भाऊबीज आनंदाने साजरी करू शकणार नाही. खूपदा 'नयनी हसू हृदयी आसू' अशी त्यांची परिस्थिती राहील. कुटुंबाला दुःख देण्याचा अधिकार कोणी दिला आहे, विद्यार्थ्यांनो! कुटुंबाचे, समाजाचे, राष्ट्राचे तुम्ही आधारस्तंभ आहात. सर्वांना सुख, हिंमत देण्यासाठी तुमचा जन्म झालेला आहे. एका आजीची कळकळीची विनंती आहे, तुम्हाला फुलताना बघण्यासाठी माझी अंधुक नजर भिरभिरते आहे.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. निवासी संपादक: प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दूरध्वनी -८८८८४७२६८
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No 46878/87

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मराठा क्रांती मोर्चाच्या नावाचा प्रचारात वापर करू नये -देशमुख

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

मराठा आरक्षण आणि समाजाच्या विविध प्रश्नांसाठी मराठा क्रांती मोर्चाच्या नावाखाली मराठा समाज एकत्र आलेला आहे. विविध पक्षात काम करणारे नेते आणि कार्यकर्ते मराठा क्रांती मोर्चात असलेतरी ही पक्षविरहित संघटना असल्याने, कुणीही हे नाव वापरू नये आणि कोणत्याही पक्षाने या संघटनेला गृहीत धरू नये. मराठा क्रांती मोर्चाने कोणत्याही पक्षाला पाठिंबा नाही आणि त्यामुळे कुणीही मराठा क्रांती मोर्चाच्या नावाखाली कुणासाठी प्रचार करू नये. वैयक्तिक पातळीवर कुणाला मतदान करायचे, कुणाचा प्रचार करायचा हा ज्याचा-त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. मात्र, मराठा क्रांती मोर्चाच्या नावाखाली असे कुणी करू नये, असे आवाहन अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांनी केले आहे.

यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात अरविंद देशमुख यांनी म्हटले आहे की, मराठा आरक्षणासाठी सकल मराठा समाज 'एक मराठा, लाख मराठा' हे ब्रीद घेऊन एकवटलेला आहे. मराठा क्रांती मोर्चाच्या या एकीच्याच बळावर राज्यभर लाखोंचे मोर्चे शांततेत पार पडले आहेत. पक्ष विरहित संघटनेची ही वज्रमुठ कायम ठेवून मराठा क्रांती मोर्चाने मोर्चाने सत्ताधारी आणि विरोधक यांना सारख्याच अंतरावर ठेवले आहे. खरे तर विरोधक असो या सत्ताधारी कोणीच आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात मराठा आरक्षणाबाबत ब्र शब्दही काढलेला नाही. त्यामुळे क्रांती मोर्चाने



कुणालाही पाठिंबा दर्शविलेला नाही. मतदान हे प्रत्येकाचे कर्तव्य असून, कुणाला मतदान करायचे हा निर्णय घेण्यास प्रत्येकजण स्वतंत्र आहे. मात्र, मराठा क्रांती मोर्चाची ओळख असलेल्या 'एक मराठा लाख मराठा' नामोल्लेख असलेल्या टोप्या घालून प्रचारात सहभागी होण्याने मराठा क्रांती मोर्चाच्या पक्ष विरहित बांधिलकीला ठेच पोहचू शकते, ही बाब समाजाची दिशाभूल करणारे ठरू शकते. त्यामुळे मराठा क्रांती मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी याबाबतीत दक्षता घेणे महत्त्वाचे आहे. शिवाय निवडणुकीत कोणत्याही पक्षाच्या नेत्याने मराठा क्रांती मोर्चाच्या नावाचा वापर करू नये, असे आवाहन मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, जिल्हा कोषाध्यक्ष अशोक पडूळ, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष चव्हाण, ॲड. शैलेश देशमुख, संतोष कराळे, मंगेश मोरे, श्रीकृष्ण यादव, रविकांत सूर्यवंशी यांनी केले आहे.

## सासरच्या जाचाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

### सासरच्या सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा
टेंभुर्णी / प्रतिनिधी

तुला घर काम येत नाही तू नेहमी आजारी असतेस यासाठी आजारपण व बचत गटाचे पैसे भरण्यासाठी माहेरून पैसे घेऊन ये म्हणून होणाऱ्या शारीरिक व मानसिक त्रासाला कंटाळून निवडुंगा येथील विवाहितेने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी ज्योती सुनील शिंदे (रा. उंमरद तालुका जि. जालना) यांच्या फिर्यादीवरून सासरच्या सहा जणांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्ती केले म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संदर्भात पोलिसांनी दिलेली माहिती अशी की निवडुंगा येथील बालू अण्णा तायडे यांच्याशी सोनालीचा विवाह झाला होता . दरम्यान घरातील लहानसहान बाबींवरून तुला घरातील काम येत नाही बचत गटाचे पैसे भरण्यासाठी माहेरून पैसे घेऊ नये असे म्हणून मारहाण केली जात होती तसेच तु नेहमी आजारी राहते तुला दवाखान्यात नेण्यासाठी आमच्याकडे पैसे नाहीत तुझ्या आई-वडिलांकडून दवाखान्यासाठी पैसे घेऊन ये असे म्हणून सतत शारीरिक व मानसिक छळ होत असल्याने या छळस कंटाळून सोनाली बाळू तायडे व २८ विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी ज्योती शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीवरून मयत सोनालीचा नवरा बालू अण्णा तायडे सासू कांताबाई यांना तायडे सासरा अण्णा नाथाजी तायडे अजन सासू कलाबाई नाथाजी तायडे यांच्यासह नणंद सागरबाई ढिलपे व भागू बोर्डे यांच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केले म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ करीत आहे.

## संक्षिप्त

### दानवे यांच्या प्रचारार्थ जाफ्राबाद शहरातील घरोघरी जाऊन प्रचार



तभा वृत्तसेवा
जाफ्राबाद/प्रतिनिधी

जालना लोकसभा महायुतीचे उमेदवार रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रचारार्थ जाफराबाद शहरातील प्रभाग ११ व प्रभाग ९ या प्रभागात महायुतीच्या कार्यकर्त्यांचा घरोघरी जाऊन प्रचार करण्यात येत आहे जालना लोकसभा मतदार संघात रावसाहेब पाटील दानवे यांनी दहा वर्षाच्या काळात वीज, पाणी, रस्ते, राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे, सिंचन, कृषी, उद्योग, रोजगार, अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण इत्यादी अनेक क्षेत्रात गेल्या साठ वर्षात झाली नव्हती त्यापेक्षा जास्त कामे झालेली आहे. काही कामे प्रगतीपथावर आहेत, काही कामाचे नियोजन झालेले आहे अनेक कामे पूर्ण झालेली आहे. त्यामुळे मतदार संघातील सर्व जाती धर्माचे नागरीक, महिला, युवक, युवती, ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी केंद्रातील भारतीय जनता पार्टीच्या वतीने नरेंद्र मोदी सरकारने आणि राज्यातील महायुतीच्या सरकारने भरिव कार्य केले आहेत. हीच विकास कामे जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी कंबर कसली असून घरोघरी जाऊन प्रचार करण्यात येत आहे. यावेळी सुधीर पाटील, अमोल पडघन, सचिन जैस्वाल, बबलू जोडीवाले, दुर्गेश दीक्षित, सुनील भारद्वाज, उदय मुळे, चेतन बायस जितेंद्र भारद्वाज गणेश विभुते सुनील साळवे मधुकर भारद्वाज मनोहर भोई नितीन भारद्वाज वैभव मुळे, आदींनी प्रभागातील घरोघरी जाऊन रावसाहेब पाटील दानवे यांनी मतदार संघात केलेले विकास कामे सांगून रावसाहेब दानवे यांना मतदान करा असे आवाहन करण्यात येत आहे.

### डॉ.काळे यांच्या प्रचारार्थ उद्धव ठाकरे यांची शुक्रवारी सभा



तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

जालना लोकसभा मतदारसंघाचे आघाडीचे उमेदवार डॉ. कल्याण काळे यांच्या प्रचारार्थ उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार दिनांक दहा तारखेला दुपारी तीन वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या जवळील डॉक्टर फ्रेजर बॉईज हायस्कूलच्या मैदानावर ही सभा पार पडणार आहे .काँग्रेस पक्षाचे आमदार कैलास गोरंट्याल, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव आंबेकर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत आज ही माहिती देण्यात आली.

### ना.अमित शाह आज जालन्यात घेणार महाविजय संकल्प सभा

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी



जालना लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार केंद्रीय मंत्री ना. रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रचारार्थ केंद्रीय गृहमंत्री ना. अमित शाह यांची बुधवारी ( ता. ०८) सायंकाळी ०४.०० वा.जालना शहरातील डॉ. फ्रेजर बॉईज हायस्कूलच्या मैदानावर महाविजय संकल्प सभा आयोजित करण्यात आली आहे.

या सभेस नामदार रावसाहेब पाटील दानवे, शिवसेना उपनेते, माजी मंत्री अर्जुनराव खोतकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आ.अरविंदराव चव्हाण, रिपाइंचे मराठवाडा अध्यक्ष ड.ब्रह्मानंद चव्हाण,रासप नेते ओमप्रकाश चितळकर,शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, मनसे जिल्हाध्यक्ष रवींद्र राऊत,रिपाइं ( कवाडे गट) जिल्हाध्यक्ष राजेंद्र हिवाळे, लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष विनोद आठवे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे ,यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर होत असलेल्या ना. अमित शहा यांच्या महाविजय संकल्प सभेची भाजपा सह महायुतीच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली असून दहा हजार नागरिक बसू शकतील असा वातानुकूलित सभा मंडप, भव्य व्यासपीठ, महिलांसाठी स्वतंत्र आसन व्यवस्था, सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस प्रशासनासह स्वयंसेवक तैनात राहतील. तरी या अति विराट महा विजय संकल्प सभेस भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाइं,मनसे, रासप, रिपाइं कवाडे गट, लहुजी शक्ती सेना, महायुतीतील सर्व घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मतदारांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन महायुतीच्या वतीने करण्यात आले आहे.

## बनाव आला उघडकीस; निर्दयी बापाला ठोकल्या पोलिसांनी बेड्या

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

गुन्हयाची थोडक्यात हकिकत अशी आहे कि, पोलीस ठाणे तिर्थपुरी येथे खबर देणार नामे बिबीशन किशनराव गपाट वय ५० वर्ष व्यवसाय शेती रा. मुरमा ता. घनसावंगी जि. जालना यांनी पोलीस ठाणे येथे हजर येवून खबर दिली की मयत नामे शिवप्रसाद महादेव थुटे वय १९ वर्ष रा. मुरमा ता घनसावंगी जि. जालना याने राहते घरामध्ये मराठा आरक्षण न मिळाल्याने घरातील लोखंडी फॅनला चादरच्या सहायाने गळफास घेवून आत्महत्या केली. वरून दि. २४.०२.२०२४ रोजी आ. मृ. क्र. ०६/२०२४ कलम १७४ फौ. प्र. स. प्रमाणे दाखल करून चौकशी बिट अंमलदार पाहेकों माळी ब.नं. १३०२ यांना देण्यात आली. दि. १६.०४.२०२४ रोजी मा. वैद्यकिय अधिकारी श्री. शिवाजी घुले प्राथमिक आरोग्य केंद्र तिर्थपुरी ता. घनसावंगी जि. जालना यांनी शवविच्छेदन अहवाल दिला त्यात मयत नामे शिवप्रसाद महादेव धूटे वय १९ वर्ष रा. मुरमा ता. घनसावंगी जि. जालना याचे मरणाचे कारण हे ढ्ठठ-छत्रग्गड-ढखजछ (णछछ-ढणठ-ड) असे निष्पण्ण झाल्याने वरिष्ठांच्या निर्दशनात आणून पोहेकों माळी ब.नं. १३०२ यांचे फिर्यादीवरुन अज्ञात आरोपी विरुदध गुरनं. ९१/२०२४ कलम ३०२ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करून पोलीस ठाणा प्रभारी सपोनि साजीद अहेमद यांनी स्वतकडे तपासकामी घेतला. आज रोजी मयत शिवप्रसाद याचे वडील तथा संशयीत आरोपीत नामे महादेव थुटे यांना स्थानिक गुन्हे शाखा जालना येथे विचारपूस करणेकामी पोनि. श्री. खनाळ साो. यांचे समक्ष हजर केले असता आरोपीताने नमुदचा गुन्हा केल्याचे कबूल केले. तसेच मराठा आरक्षणाचा फायदा व्हावा करीता आरोपीताने मुलाचा केलेला खून लपवून बनावट चिठठी तयार करून मुलाने मराठा आरक्षणासाठी आत्महत्या केली असल्याचा बनाव रचला. सदरचा बनाव पोलीसांनी फस्त केला.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कूमार बंसल साहेब, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपानी साहेब, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी अंबड श्री. विशाल खांबे साहेब, पोनि. स्थानिक गुन्हे शाखा श्री. खनाळ साहेब यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे तिर्थपुरी येथील सहायक पोलीस निरीक्षक साजीद अहेमद, पोहेकॉ/१३०२ माळी, पोकॉ/२९८ पवार, पोकों/१६५७ तोटे, पोकॉ/९४३ फोलाने, पोकों राजू जाटे/९९२, पोकॉ. बावीस्कर स्थानिक गुन्हे शाखा यांनी केली. सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

## निवडणूक खर्च निरीक्षकांनी केली उमेदवारांच्या व्दितीय वेळीच्या लेख्यांची तपासणी

तभा वृत्तसेवा
जालना/ प्रतिनिधी

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने १८-जालना लोकसभा मतदारसंघाकरीता खर्च तपासणीसाठी निवडणूक खर्च निरिक्षक म्हणून सर्वना कुमार के. (आयआरएस) यांची नियुक्ती भारत निवडणुक आयोगाने केलेली आहे. उमेदवाराच्या प्रचाराच्या कालावधीत किमान तीन वेळा ते प्रत्येक उमेदवाराच्या खर्चाच्या नोंदवहीची तपासणी करणार आहेत. आज मंगळवार, दि. ७ मे २०२४ रोजी त्यांनी जालना लोकसभेसाठी उभ्या असलेल्या उमेदवारांच्या व्दितीय वेळेच्या लेख्यांची तपासणी जिल्हाधिकारी कार्यालयात केली.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा खर्च नियंत्रण कक्षाचे नोडल अधिकारी राजू सोळूंके, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी पंजाब पुंडगे आदींसह उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

उमेदवाराने खर्च निरीक्षक यांना व्यक्तीशः किंवा आपल्या निवडणूक प्रतिनिधीमार्फत नोंदवही सादर करणे आवश्यक आहे. निवडणुक प्रक्रियेमधील प्रत्येक तपासणीनंतर उमेदवाराच्या दैनंदिन निवडणूक खर्चाची नोंदवही तपासणीच्या तारखेपर्यंत स्कॅन करण्यात येऊन निवडणुक आयोगाच्या



संकेतस्थळावर अपलोड केली जाईल. निवडणूक खर्च तपासणीसाठी तिसरी तपासणी दि. ११ मे २०२४ रोजी केली जाईल. तरी सर्व लोकसभा निवडणूकीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी १८ जालना लोकसभा मतदार संघात दि. १३ मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ चे कलम ७७ (१) हे लोकसभेच्या किंवा राज्य विधानसभेच्या प्रत्येक उमेदवारांस ज्या तारखेस तो नामनिर्देशित झाला होता ती तारीख व निवडणुकीच्या निकाल घोषित झाल्याची तारीख या दोन्ही तारखांसह या दरम्यान त्यांनी केलेल्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने केलेल्या खर्चाचा स्वतंत्र व अचूक लेखा (हिशेब) ठेवणे अनिवार्य आहे.

## द वर्ल्ड इंग्लिश स्कूलच्या बसचे काच फोडून बॅटरी लांबवली; अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल




तभा वृत्तसेवा
मंठा/ प्रतिनिधी

मंठा येथील उमरखेडा रोडवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलींच्या शासकीय वस्तीग्रहाच्या पाठीमागे द वर्ल्ड इंग्लिश स्कूल च्या प्रांगणात उभ्या असलेल्या स्कूलबसच्या काचा फोडून बॅटरी लांबवल्याची घटना घडली. मोठी टाटा कंपनीची बस व मॅजिक या दोन्ही वाहनाचे मिळून ३४ हजाराचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी शिवाजी वसंतराव जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मंठा पोलीस स्टेशनला अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याविषयी सविस्तर वृत्त असे की, मंठा येथे उमरखेडा रोडवर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मुलींचे वस्तीग्रहाचे पाठीमागे शिवाजी वसंतराव जाधव यांचे द वर्ल्ड इंग्लिश स्कूल आहे. सोमवार सहा मे च्या रात्री ९ वाजता नेहमीप्रमाणे टाटा कंपनीची मोठी स्कूल बस क्र.एमएच २१/बीएच ०९८५ व टाटा कंपनीची छोटी मॅजिक क्र. एमएच २१/ एएक्स ७४५० ही दोन्ही वाहने उभी करून गावाकडे गेलो असता ७ मे रोजी सकाळी साडेनऊ वाजता गाडी चालक नामे प्रमोद उत्तम विधाते रा. उमरखेडा यांने फोन करून दोन्ही स्कूलच्या बसचे काच फोडल्याची माहिती दिली. यावरून घटनास्थळावर जाऊन पाहणी केली असता दोन्ही स्कूलच्या वाहनाचे समोरील व मागील काच दगडाने ठेचून फोडल्याचे दिसून आले. निरीक्षण करून पाहिले असता छोट्या मॅजिक वाहनातील चार हजार रुपये किमतीची एसएफ सोनिक कंपनीची पावरलाईन बॅटरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली अशी निदर्शनास आले. या घटनेत एकंदरीत ३४ हजाराचे नुकसान झाले आहे. शिवाजी वसंतराव जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मंठा पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरोधात भारतीय दंड संहिता १८६० कलम ३७९, ४२७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## दीड हजार विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज प्रलंबित

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रवेशित व भारत सरकार शिष्यवृत्ती शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती व इतर शिष्यवृत्ती योजनेस पात्र अनुसूचित जाती व इतर मागास प्रवर्ग विमुक्त भटक्या जाती, भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करण्यासाठी महाडीबीटी पोर्टल सुरू आहे. मात्र, पाच वेळा मुदतवाढ देऊनही १५७० विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयीन स्तरावर प्रलंबित आहेत. त्यामुळे हे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित आहेत.समाज कल्याण विभागाकडून ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी येत्या १५ जूनपर्यंत मुदवाढ देण्यात आली आहे. शिवाय शासन स्तरावरून ॲटोरिजेक्ट करण्यात येतील, असे सांगण्यात आले होते. तरीही अद्याप दीड हजारांवर विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन करणे प्रलंबित आहेत. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही अर्ज नोंदणी केली नाही. त्यासाठी पाठपुरावा करावा. महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जाची पडताळणी करून परिपूर्ण पात्र अर्ज मंजूर करावेत व अपात्रत अर्ज तत्काळ विद्यार्थ्यांच्या लागीनवर पाठविण्यात यावेत.त्रुटींची पूर्तता करण्यासाठी संधी न दिल्यास अर्ज ॲटोरिजेक्ट झाल्यास संबंधित विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास याची जबाबदारी महाविद्यालयाची राहील, असे समाजकल्याण सहायक आयुक्त यांनी कळविले आहे.

## १८ वर्षानंतर भरला १० वी चा वर्ग भरला;अन् जुन्या आठवणी ताज्या झाल्या

### छत्रपती शिवाजी हायस्कूल चे २००५-२००६ बॅच चे स्नेहसंमेलन उत्साहात

तभा वृत्तसेवा
अबंड / प्रतिनिधी

अंकुशनगर येथील छत्रपती शिवाजी हायस्कूल च्या २००५-२००६ बॅच च्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन रविवारी मोठया उत्साहात पार पडले. या स्नेहसंमेलनाची सुरुवात सरस्वती पूजनाने करण्यात आली. यावेळी दोन मिनटे मौन बाळगून दिवंगत शिक्षक व विद्यार्थी यांना भावपूर्ण श्रद्धांजली देण्यात आली.



यावेळी सेवा निवृत्त जेष्ठ अधिव्याख्याते शालेय शिक्षण विभाग जालिंदर बटुळे, मुख्यध्यापक किशोर डावकर, मुख्यध्यापक पंढरीनाथ चव्हाण, बळीराम मिंदर,राजकुमार काकडे,रमेश नाईक, शेळके, कृष्णा गवळी, दिलीप नाटकर, चक्रधर नाटकर, शिपाई सखाराम कुहे, सुरेश आदी होते.

१८ वर्षा नंतर मित्र मैत्रिणी या सोशल मीडियाच्या माध्यमातून एकत्र आले. या स्नेहसंमेलना दिवशी शाळेत येऊन प्रत्येक वर्गात जाऊन जुन्या आठवणीं ताज्या झाल्या.

दहावी नंतर आयुष्याच्या वेगवेगळ्या वाटा निवडून पुढे गेल्यानंतर ही नेहमीच शाळेची आणि शाळेतील शिक्षक तसेच विद्यार्थी मित्र मैत्रिणींची आठवण मनात साठवून ठेवलेली होती. कधीतरी सर्वांचा वर्ग भरावा आणि तो गोंगाट, हसनं खिदळनं ऐकू यावं यासाठी आम्ही आमच्या मित्रांची शोध मोहीम सुरू करून सोशल मिडीयाच्या माध्यमातून एकमेकांच्या संपर्कात आलो असल्याची प्रतिक्रिया आलेल्या माजी विद्यार्थी यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केली.

स्नेहसंमेलन दिनी १८ वर्षा नंतर वर्ग भरवला. यावेळी सर्व शिक्षकांचा सन्मान करण्यात आला असून त्यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी माजी विद्यार्थ्याकडून शाळेला स्नेह भेट देण्यात आली. शिक्षक व विद्यार्थी यांनी सोबत स्नेह भोजन केले या स्नेह संमेलनास २००५-२००६ च्या बॅच चे माजी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

१८ वर्षानंतर घंटी वाजली अन् वर्ग भरवला स्नेहसंमेलन दिनी १८ वर्षानंतर शाळेत आल्या नंतर घंटी वाजून पुन्हा वर्ग भरवला यावेळी वर्गात जाऊन शिक्षक व विद्यार्थी यांनी कविता व गीत गायन केले अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आपल्या जून्या आठवणीना उजाळा देत शेवटी राष्ट्रगीत घेतले.

प्रत्येक जण सद्या आपल्या कामात व्यस्त आहेत कोणी नोकरी, शेती, व्यवसाय, राजकारण, समाजकारण या माध्यमांतून आपल करिअर च्या मागे धावत असताना मित्रांना भेटणं तर दूरच पण बोलणंही नव्हतं. जो तो आपल्या पद्धतीने आपल्या जीवनात व्यस्त आहे. व्यस्त जीवनातून आधुनिक काळात आलेले हे सोशल मिडिया आपल्या मैत्रीत जवळीक ठेवण्याचे मोठा दुवा ठरलं. अन् आपल्या मैत्रीचा पुर्नजन्म घडवला. या माजी विद्यार्थ्या मध्ये शेतकरी, डॉक्टर, पोलीस, वकील, इंजिनीअर, पत्रकार, अभिनेता, दिग्दर्शक, व्यवसायिक, शिक्षक, तर कोणी समाजिक राजकीय क्षेत्रात आहेत.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अक्षय तृतीयेच्या दिवशी बालविवाह होण्याची शक्यता

# आढळल्यास गुन्हा दाखल होईल

**तभा वृत्तसेवा**

**बीड दि.७ एप्रिल**

अक्षय तृतीया या दिवशी मोठ्या प्रमाणात बाल विवाह आयोजित होत असतात. जे कायद्याने गुन्हा आहे. बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ संपुर्ण राज्यात लागू आहे. त्यानुसार बाल विवाह आयोजित करणे हा अजामीन पात्र गुन्हा आहे.

अक्षय तृतीया या दिवशी बाल विवाह होवू नये म्हणून आवश्यक त्या उपाय योजना शासना करीत आहे. बाल विवाह हि प्रथा बाल हक्काच्या विरोधी असून बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ नुसार असे बाल विवाह बेकायदेशिर ठरतात. या विरोधात गुन्हा नोंदविला जाणे अपेक्षीत आहे. तसेच सदर कायद्याच्या अंमलबजावणी संदर्भात महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने यंत्रणानी / विभागाने / कार्यालय यांनी आपल्या अधिकार क्षेत्रात (ग्राम / तालुका व जिल्हा स्तरावर) बाल विवाह होवू नये यासाठी जाणीव जागृती कार्यक्रम, प्रशिक्षण, रॅली, इ. प्रतिबंधात्मक उपाय योजना कराव्यात. बाल विवाहाचे आयोजन करणारे वधु व वर यांचे आई वडिल, नातेवाईक, भटजी, मंडपवाले, आचारी, आणि व-हाडी मंडळी या सर्वांवर गुन्हा नोंदविण्यात येईल. या बाबतची दंवडी सर्व गावात, सर्व ग्रामपंचायतींनी द्यावी. तसेच दंवडी बाबतचा अहवाल गटविकास अधिकारी कार्यालयात सादर करावा.

सरपंच, पोलीस पाटील व ग्रामसेवक यांना अक्षय तृतीया या दिवशी आपआपल्या गावी उपस्थित रहावे, बाल विवाह होत असल्याचे लक्षात आल्यास त्याबाबत चाईल्ड हेल्प लाईन क्रं. १०९८ या टोल फ्री क्रमांकावर माहिती देण्यात यावी. यासह संबंधित पोलीस स्टेशनला माहिती देण्यात यावी.अक्षय तृतीया या दिवशी जिल्ह्यात बाल विवाह होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. असे जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या आदेशाने जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी कळविले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय धानोरा रोड, वरद प्राईड कॉम्प्लेक्स ता.जि.बीड या ठिकाणी संपर्क करण्यात यावा. Email- dwcdbeegmail.com



## सैन्य भरती पूर्व प्रशिक्षण सूचना

**तभा वृत्तसेवा**

**बीड दि.७ एप्रिल**

भारतीय सैन्य दल नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांन Service Selection Board (SSB) या परीक्षेची पूर्वतयारी करून घेण्यासाठी छत्र पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील uo;qod uo;qorhlkBh दिनांक २० मे २०२४ ते २९ मे २०२४ या कालावधीत डड्ड कोर्स क्रमांक ५७ आयोजित करण्यात येत आहे. सदर कोर्ससाठी प्रशिक्षणार्थीची निवास, भोजन आणि प्रशिक्षणाची निशुल्क सोय करण्यात येणार आहे.

बीड जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदाचे संधी उपभोगण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय बीड येथे दिनांक १५ मे २०२४ रोजी मुलाखतीस हजर राहावे. मुलाखतीस येतेवेळी त्यांनी Department ofSainik Welfare Pune (DSW) यांच्या वेबसाईटवर सर्च करून त्यामधील SSB-57 कोर्ससाठी (किंवा सबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या) प्रवेश पत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टाची प्रिंट घेऊन व ते पूर्ण भरून सोबत घेऊन यावे.सदर यशस्वी कोर्समध्ये प्रवेश मिळवण्यासाठी खाली नमूद कोणतीही एक पात्रता आवश्यक आहे व त्यासंबंधीचे पात्रता प्रमाणपत्र कोर्सला येताना सोबत घेऊन यावेत.कम्बाईन डिफेन्स सर्व्हिसेस एक्झामिशन (CDSE UPSC) अथवा नॅशनल डिफेन्स अकॅडमी एक्झामिनेशन (ND- UPSC) पास झालेले असावे व त्यासाठी सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावेत.

## दुष्काळी भागाचा कायापालट करू, अवजारांवर शुन्य टक्के कर करू

## राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**

**आष्टी दि.७ एप्रिल**

आष्टी तालुक्यातील खुंटेफळ साठवण तलावात पाणी पाडू, तसेच जिल्ह्यातील दुष्काळी भागाचे चित्र बदलण्यासाठी घाट माथ्यवरचे वाहून जाणारे पाणी आणण्याचा प्रयत्न करू,आमचे सरकार आल्यावर शेतकऱ्यांच्या अवजारांवर शून्य टक्के कर करणार, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले.

बीड लोकसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या जाहीर प्रचार सभेत आष्टी येथे ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर खा.डॉ.अमोल कोल्हे, आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.साहेबराव दरेकर, युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, राम खाडे, पूजा मोरे,



उपस्थित होते.यावेळी जयंत पाटील यांनी केंद्र सरकारवर सडकून टीका केली. पुढे बोलताना ते म्हणाले,केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकऱ्याला खड्ड्यात घालण्याचे काम सरकारने केले. आमचे सरकार आल्यावर शेतकऱ्यांच्या अवजारांवर शून्य टक्के कर करणार असल्याचे आपल्या घोषणा पत्रात सांगितले. यावेळी राज्यात ४८ खासदारांपैकी ३२ ते ३५ खासदार महाविकास आघाडीचे होणार असून त्यापैकी ८ खासदार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद पवार पक्षाचे असणार आहेत, असेही त्यांनी यावेळी जाहीर केले.खा.डॉ.अमोल कोल्हे यांनी टीका करताना केंद्र सरकारने कांदा निर्यातीला बंदी उठवली मात्र ४० टक्के निर्यात शुल्क लावले. तसेच शेतकऱ्यांचे साडे तीन हजार कोटी नुकसान झाले असल्याचे सांगितले.माझ्या मतदारसंघात देवेंद्र फडणवीस प्रचार कोणाचा करणार असे सांगून ज्या खासदारांनी आपल्या खासदारकीचा वापर स्वतः च्या कंपनीच्या फायद्यासाठी केला, त्यांचा तुम्ही प्रचार करणार आहात का असा सवाल उपस्थित केला.

## खर्च निरीक्षक उद्या करणार निवडणूक लेखांची तपासणी

**तभा वृत्तसेवा**

**बीड दि.७ एप्रिल**

निवडणूक खर्च निरीक्षक सुसांता कुमार बिस्वास हे ८ मे रोजी निवडणूक लेखांची तपासणी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात करणार आहेत. अशी माहिती निवडणूक खर्च संनियंत्रण कक्षाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

३९ बीड लोकसभा मतदारसंघात सोमवार दिनांक १३ मे रोजी मतदान होणार आहे. त्या अनुषंगाने लोकसभा निवडणुकीमध्ये उभे राहणाऱ्या उमेदवारांना केलेल्या खर्चाची लिखित नोंद ठेवावी लागते.



भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार या लेखांची तपासणी निवडणूक खर्च निरीक्षक यांच्याकडून केली जाते. यापूर्वी ४ मे रोजी ही तपासणी करण्यात आली असून दुसरी तपासणी ८ मे रोजी होणार आहे.

उमेदवारांना नोंदवही दिलेले असून त्यांनी हा खर्च व्यवस्थितरित्या लिहिलेला आहे की नाही याची तपासणी करण्यासाठी ८ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात सकाळी १० ते सांय. ५ वाजता खर्च निरीक्षक सुसांता कुमार बिस्वास हे करणार आहेत.

# खर्चाची नोंदवही तपासण्यासाठी कसूर केल्याबद्दल ७ उमेदवारास तर २ दोन उमेदवारांना खर्चातील तफावतीबाबत नोटीस

**तभा वृत्तसेवा**

**बीड दि.७ एप्रिल**

बीड लोकसभा मतदारसंघात निवडणुकीत उभे असलेले ७ उमेदवारांना निवडणूक खर्चाची नोंदवही तपासणीसाठी सादर करण्यात कसूर केल्याबाबत जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी नोटीस बजावली आहे.

नोंदवही लेखांची प्रथम तपासणी न करणाऱ्या उमेदवारांमध्ये करुणा धनंजय मुंडे, शेषेराव चोकोबा वीर, गोकुळ बापूराव सवासे, प्रकाश भगवान सोळंके, राजेंद्र अच्युतराव होके, शेख तौसिफ अब्दुल सत्तार, शेख एजाज शेख उमर यांची नावे आहेत.निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे प्रथम खर्चाची नोंदवही शनिवार दिनांक ०४ मे रोजी सकाळी १० ते सायंकाळी ०५ या कालावधीत खर्च सनियंत्रण कक्ष ३९ बीड लोकसभा मतदारसंघ राष्ट्रीय विज्ञान केंद्र (छखउ) कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय येथे उपस्थित राहून अथवा प्रतिनिधी उपस्थित राहून नोंदवही तपासणी करून घेणे बंधनकारक होते. जे उमेदवार अभिलेखाचे तपासणी करण्यास आलेले नाहीत अशा उमेदवारांना लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ चे कलम ७७ अन्वये निवडणूक खर्चाचा हिशोब ठेवण्यात कसुर केल्याचे निदर्शनास आले आहे.

अशा ०७ उमेदवारास नोटीस पाठविण्यात आले असून या उमेदवारांनी स्वतः अथवा प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत ४८ तासात निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा भारतीय दंड संहितेचे कलम १७१ 'झ' अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशा आशयाचे नोटीस जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी बजावले आहे.

२ उमेदवारांकडून तपासणीची तफावतबाबत नोटीस भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार पंकजा मुंडे, यांना आणि नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार बजरंग सोनवणे या दोन उमेदवारांना तपासणीसाठी सादर केलेल्या निवडणूक खर्चातील तफावती बाबत नोटीस जारी करण्यात आलेले आहे.पंकजा मुंडे यांनी दिनांक २४ एप्रिल ते २ मे २०२४ पर्यंत सादर केलेल्या एकूण खर्चाची रक्कम दोन लाख ७३ हजार ३८,(२७३०३८) एवढी सादर केली आहे. खर्च निरीक्षक कार्यालयाच्या छायांकित निरीक्षण नोंदवहीनुसार नोंदविण्यात आलेल्या एकूण खर्च रक्कम ८ लाख ६८ हजार १०१ (८६८१०१) एवढी आहे. यामध्ये छायांकित नोंदवहीनुसार झालेल्या खर्चाचा विचार करता उमेदवाराकडून ०५ लाख ९५ हजार ६३ त्यांच्या लेख्यात कमी दर्शविलेली आहे.बजरंग सोनवणे यांनी २२ एप्रिल ते ०२ मे २०२४ पर्यंत सादर केलेल्या एकूण खर्चाची रक्कम ०३ लाख ५३ हजार १६५ आहे. तर कार्यालयाच्या छायांकित निरीक्षण नोंदवहीनुसार नोंदविण्यात आलेल्या एकूण खर्चाची रक्कम ०८ लाख ८४ हजार ४५९ आहे. छायांकित नोंदवहीनुसार झालेल्या खर्चाच्या विचार करता उमेदवाराकडून ०५ लाख ३१ हजार २९४ रक्कम त्यांच्या लेखात कमी दर्शविली आहे.लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ च्या कलम ७७ प्रमाणे निवडणूक कालावधीत प्रत्येक उमेदवार स्वतः किंवा त्यांच्या प्रतिनिधी द्वारे निश्चित तारखेस नामनिर्देशित झालेल्या व त्याचा निकाल जाहीर झाल्याची तारीख दोन्ही तारखांसह या दरम्यान त्यांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी निवडणुकीच्या संबंधातील सर्व खर्चाचे स्वतंत्र व अचूक लेखी ठेवतील अशी तरतूद आहे. या दोन उमेदवारांचे सदर तरतुदीचे पालन न केल्यामुळे त्यांना नोटीस दिले असुन ४८ तासांच्या आत खुलासा सादर करण्यात लावलेला आहे अन्यथा लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ चे कलम ७७ अनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी कळविले आहे.

## राष्ट्रवादी नगरसेवकाची चंदन तस्करी उघडकीस आली, अन शरदचंद्र पवारांनी आष्टीची सभाच रद्द केली!

**तभा वृत्तसेवा**

**बीड दि.७ एप्रिल**

सुमारे दोन कोटी रुपयाची चंदन तस्करीची चोरी केज पोलिसांनी पकडली. त्यात बीड लोकसभा मतदार संघात महावीकास आघाडीच्या वतीने निवडणूक लढवणारे बजरंग सोनवणे यांचे निकटवर्ति नव्हे तर प्रचारात प्रमुख असलेले बालाजी जाधव नगरसेवक केज तथा शरद पवार राष्ट्रवादी गटाचे असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाल्यानंतर राज्यभरत खळबळ उडाली. या घटनेची गंभीर दखल दस्तूर खुद शरदचंद्र पवारांनी घेतली आणि स्वत:च अंतरमुख होऊन सोनवणे यांच्या प्रचारासाठी दिलेली सभा रद्द केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात जोरदार होताना दिसते. एवढेच नव्हे तर प्रकरण पुढे आल्यानंतर फार मोठा फटका सोनवणे यांना बसू शकतो.

## महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांची रिपाई प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या कार्यालयास भेट

**तभा वृत्तसेवा**

**बीड दि.७ एप्रिल**

बीड लोकसभा मतदार संघात महायुतीच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांनी काल रिपाई प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या शहरातील जन संपर्क कार्यालयातील भेट दिली. त्यावेळी उपस्थतीत सर्व पदाधीकाऱ्यांनी त्यांचा यथोचित सत्कार केला.



रिपाईचे संस्थापक अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री ना. रामदास आठवले माहायुतीचे घटक पक्ष म्हणून सोबत काम करत असून, लोकसभा निवडणूक प्रचारात राज्यात त्यांचा झंझावती दौरा सुरू आहे. बीड लोकसभा मतदार संघात महायुतीचे सर्व घटक पक्ष पंकजाताईच्या विजयासाठी परिश्रम घेत असून काल उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी शहरात रिपाई युवा प्रदेश अध्यक्ष पप्पू कागदे यांच्या संपर्क कार्यालयात भेट देऊन प्रमुख कार्यकर्त्यांशी सू- संवाद साधला. सुरवातीला पप्पू कागदे यांनी पुष्पहार घालून उमेदवाराचे स्वागत केले.यावेळी राजू जोगदंड जिल्हा सरचिटणीस, किसन चांगडे, किशोर कांडेकर, अविनाश जावळे, महादेव उजगरे, सचिन कागदे, दशरथ सोनवणे, दीपक कांबळे, अशोक साळवे, अरुण भालेराव, नरेंद्र जावळे, अरुण निकाळजे, गोवर्धन वाघमारे, उत्तम मस्के, मायाताई मिसळे, दशरथ शिंदे, सादीक कुरेशी, संदीपान डोंगरे, अजित सिरसट, भगवान ससाणे, बंटी गायसमुद्रे, बबन मस्के, आदि प्रमुख कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## मॉ जिजाऊंच्या माहेराहून खा. प्रतापराव जाधव पंकजाताई मुंडेंच्या प्रचारासाठी बीडमध्ये

## पंकजाताईंच्या एका सभेमुळे आम्ही निवडून येतो - खा. जाधव

**तभा वृत्तसेवा**

**बीड दि.७ एप्रिल**

राष्ट्रमाता जिजाऊंचे माहेर असलेल्या बुलढाणा जिल्हयाचे खासदार आणि शिवसेनेचे लोकसभेचे उमेदवार खासदार प्रतापराव जाधव भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी आज बीडमध्ये आले. पंकजाताईंच्या एका सभेमुळे माझ्यासारखे अनेक नेते निवडून येतात अशा शब्दांत त्यांनी पंकजाताईंचा नेतृत्व बीडसाठी किती महत्वाचे आहे हे अधोरेखित केले.



पंकजाताई मुंडे यांच्या राज्यभरातील जनसंपर्कमुळे त्यांना मानणारा प्रचंड मोठा वर्ग एका शब्दावर विश्वास ठेवत तो देतील तो उमेदवार निवडून आणतात हा आमचा अनुभव आहे. माझ्यासारखे अनेक जण पंकजाताई मुंडे यांच्या सक्षम नेतृत्वामुळे लोकसभा निवडणूक असो की विधानसभा या निवडणुकीत विजयी होतात. पंकजाताई आमच्यासाठी सभा घेतात त्यामुळे त्या निवडणूक लढवत असलेल्या बीड जिल्ह्यात मासाहेब जिजाऊंच्या माहेरातून प्रतापराव जाधव हे खास पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी आज पिंपळनेर येथे आले होते.

भाजप-महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी त्यांच्या प्रचारार्थ संपूर्ण जिल्हा पिंजून काढला आहे.ठीकठिकाणी होणाऱ्या बैठका, पदयात्रा जाहीर सभा या सर्वच ठिकाणी मतदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. पंकजाताई मुंडे या लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या विचारांचा वारसा घेऊन समाजकारण आणि राजकारण समर्थपणे करत आहेत. सर्व,धर्म,समभाव ही शिकवण घेऊन पंकजाताई सर्व जाती धर्माच्या लोकांना सन्मान देऊन विकासाचे राजकारण करतात.गेले कित्येक वर्ष आम्ही दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब आणि त्यांच्यानंतर पंकजाताईंच्या नेतृत्वाखाली काम करत आहोत. बीड लोकसभा निवडणुकीत पहिल्यांदाच पंकजाताई मुंडे सामोरे जात आहेत. पंकजाताईंच्या एका सभेमुळे माझ्यासारखे अनेक जण निवडून येतात हा इतिहास आहे. त्यांचे विचार, काम करण्याची पद्धत आणि उस्फुर्त भाषण मतदारांना भावते.

पंकजाताईंमुळे आम्ही निवडून येतो

भाजप महायुतीकडून लोकसभा निवडणुकीला सामोरे जाणारे सुजय विखे पाटील, खा. रावसाहेब दानवे पाटील असो की, सुधाकर शृंगारे, बबनराव लोणीकर तानाजी मुटकुळे, मेघनाताई बोर्डीकर असे कितीतरी नेते पंकजाताईंमुळे निवडून येतात हा इतिहास आहे. आज त्यांच्यासाठी आम्ही प्रचारात उतरलो आहोत. त्या विक्रमी मताधिक्य घेऊन विजयी तर होणारच आहेत पण त्यांच्या पाठिशी आपण सर्व जण एकजुटीने उभे रहावे. जिल्ह्यासाठी त्यांच्या नेतृत्वाची आवश्यकता असल्याचे जाध. यांनी म्हटले आहे.

## एलईडी व्हॅन, कलापथक हायटेक प्रचाराने अशोक हिंगे पाटीलांचे गॅस सिलेंडर पोचले घराघरात

**तभा वृत्तसेवा**

**बीड दि.७ एप्रिल**

बीड लोकसभा प्रचाराचा तिसरा म्हणजे अंतिम टप्पा चालू असून यामध्ये विविध प्रकारे आयडिया करून आपले चिन्ह घराघरापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करत आहेत त्यानुसार वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोकराव हिंगे पाटील यांनी एलईडी व्हॅन कलापथकच्या माध्यमातून हायटेक प्रचार करत घराघरात जनतेच्या मनामनात गॅस सिलेंडर पोहोचवले आहे.

बीड लोकसभा मतदार संघातील उमेदवाराच्या प्रचाराचा अंतिम टप्पा चालू असून प्रचाराचे रणधुमाळी जोरात चालू आहे विविध प्रकारे डोकेलिटी लढवत आयडियल आणि हायटेक प्रचार करून आपली चिन्ह घराघरापर्यंत पोहोचवण्याचं काम उमेदवार करत असून वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी गेवराई आणि बीड येथे अडकत प्रकाश आंबेडकर यांच्या सभांचे आयोजन करून मतदारांचे मन परिवर्तन मत परिवर्तन करण्याचे नियोजन आखले आहे तर एलईडी व्हॅनच्या माध्यमातून वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी केलेले कार्य तसेच वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी वंचित दिन दलित दुबळे यांच्यासाठी केलेले कार्य या सर्व गोष्टीवर प्रकाश टाकणारे चित्रफीत एलईडी व्हॅनच्या माध्यमातून गावागावातील मतदारांना दाखवली जाते कला पथकाच्या माध्यमातून प्रकाश आंबेडकर हे दिन दलित दुबळ्याचे नेते आहेत हे गीतांच्या माध्यमातून जनतेसमोर सादर करत हायटेक प्रचार करून वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी प्रचाराचा आघाडी घेतली आहे वंचित बहुजन आघाडीचे चिन्ह गॅस सिलेंडर घराघरात पोहोचते केले आहे गाव, वाडी,वस्ती, तांडा, शहरात, वंचित बहुजन आघाडीचे गॅस सिलेंडर पोहोचवले आहे त्यामुळे मतदारातही उत्साह वाढला आहे नको महायुती, नको महाविकास आघाडी आता हवी वंचितांची वंचित बहुजन आघाडी असा सूर गाव, खेडे, शहरातील मतदारा मधून निघत आहे त्यामुळे वंचित बहुजन विकास आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

# सीड बँकेतून होणार वृक्ष लागवड

## यावर्षी ७३ लाख ४१ हजार २०० वृक्ष लागडीचे उद्दीष्ट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मे**

जिल्ह्यात यावर्षी ७३ लाख ४१ हजार २०० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट असून यावर्षी सद्यस्थितीत १३ लाख ६० हजार रोपे उपलब्ध आहेत. त्यामुळे विविध झाडाच्या बियांचे संकलन करुन सीड बँक तयार करावी व या सीड बँकेतून उपलब्ध बियांचा वापर करुन वृक्ष लागवड करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी यावेळी दिल्या.

जिल्हा नियोजन समिती सभागृहात वृक्ष लागवडीची आढावा बैठक जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, निवासी उपजिल्हाधिकारी दिलीप कच्छवे, उपजिल्हाधिकारी गणेश महाडीक, समाधान घुटुकडे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

जिल्ह्यात वृक्ष लागवडीसाठी वन विभाग ५ लाख ७९ हजार, सामाजिक वनीकरण विभाग १ लाख ६६ हजार, रेशीम विभाग ६ लाख, नगर पालिका प्रशासन विभागाकडून १५ हजार याप्रमाणे १३ लाख ६० हजार रोपे उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. उर्वरित वृक्ष लागवडीसाठी लागणाऱ्या आवश्यक बियांचे संकलन करण्यासाठी शिक्षण विभाग, वन विभाग, जिल्हा परिषद यांच्या अखत्यारीतील ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, तलाठी, कृषि सहायक, आशाताई, शिक्षक, विद्यार्थी यांना बियांचे संकलन करण्यासाठी उद्दिष्ट ठरवून द्यावेत. यासाठी स्वयंसेवी संस्थां (एनजीओ)नाही सहभागी करून घ्यावे. वृक्ष लावगवडीसाठी जागानिश्चिती व खड्डे तयार करण्याचे काम वेळेत पूर्ण करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी दिल्या. यावेळी बैठकीस वन विभाग, सामाजिक वनीकरण, महसूल, कृषि, रेशीम विभागासह संबंधित विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी जलयुक्त शिवार अभियान २.०, प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना, पाणलोट विकास घटक २.०, गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजनेचा आढावा घेतला. यामध्ये प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रकल्प अहवालानुसार दिलेल्या प्रशासकीय मान्यतेनुसार कामाची सद्यस्थिती, प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना अंतर्गत एमएसआरएलएम अंतर्गत उपजीविका उपक्रम घटकाचा प्रकल्पनिहाय खर्चाचा व शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करणे, माहिती अद्ययावत करणे, जलयुक्त शिवार २.० अंतर्गत प्रस्तावित कामाचा, झालेला खर्च याचा आढावा घेण्यात आला. तसेच गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजनेंतर्गत सन २०२३ मधील झालेल्या कामाचा तसेच सन २०२४ मध्ये तलावातील गाळ काढण्याबाबतचे नियोजन याबाबतचा सविस्तर आढावा घेतला.

जिल्ह्यातील पाणीटंचाई आढावा देखील जिल्हाधिकारी पापळकर यांनी घेतला. तसेच पाणी टंचाई काळात नागरिकांना पाणी पुरविण्याचे आदेश संबंधित यंत्रणांना दिले. यावेळी अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# वीजप्रश्नी तत्काळ तोडगा काढण्याच्या आ. मुटकुळेंच्या सूचना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मे**

वारंवार विज खंडीत होत असल्यामुळे शहराला पाणीपुरवठा होत नाही. उन्हाळ्याचे दिवस असून पाणीटंचाई भासत आहे. नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे महावितरणने वीजप्रश्नी तातडीने तोडगा काडण्याच्या सूचना भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी अधीक्षक अभियंता यांना दिल्या.

हिंगोली शहराला सिध्देश्वर धरणातून पाणीपुरवठा केल्या जातो. तीन ते चार दिवसांआड पाणीपुरवठा होतो परंतु मागील काही दिवसात अवकाळी पाऊस वादळे यामुळे वीजेचे खांब तसेच तारा तुटण्याचे प्रकार वाढले. परिणामी शहराला पाणीपुरवठा करणारी वीज खंडीत होत आहे. ८ ते १० दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. अनेकजण पाणी विकत घेत आहेत. परंतु गोरगरीब नागरिकांना ते परवडणारे नाही. त्यामुळे नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. याप्रश्नी तोडगा काढण्यासाठी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे, मुख्याधिकारी अरविंद मुंढे, शहर अभियंता रत्नाकर अडसिरे, अभियंता वसंत पुतळे यांच्यासह भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी महावितरणचे कार्यकारी अभियंता सुरेंद्र मुंगारे, उपकार्यकारी अभियंता एस डी बेलसरे यांची भेट घेतली. वारंवार होत असलेल्या वीज खंडीतमुळे शहराला पाणीपुरवठा होत नसल्याच्याा तक्रारी नगर पालिका तसेच आ. मुटकुळे यांचेकडे येत असल्याचे सांगीतले.

या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी काही उपाययोजना करता येतील का असा सवाल यावेळी आ. मुटकुळे यांनी उपस्थित केल्यानंतर महावितरणच्या अधिकाऱ्यानी लवकरच यावर उपाय योजना करण्यासाठी महावितरण काम करीत असून नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा देण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत असल्याचे यावेळी अधिकाऱ्यांनी आ. मुटकुळे यांना आश्वासन दिले.

# आ. मुटकुळे यांचेकडून जलेश्वर तलावाच्या कामाची पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली ७ मे**

शहरातील पांडव कालीन जलेश्वर तलावाच्या कामाची पाहणी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी केली. यावेळी भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी पत्रकारांशी संवाद साधतांना आ. मुटकुळे म्हणाले की, त्यांच्या कारकिर्दीत जलेश्वर तलावाचे काम सुरू झाले नाही तर आगामी विधानसभा निवडणूक लढवणार नाही शी घोशणा केली होती. परंतु जलेश्वर महादेवाला मला आशीर्वाद द्यायचा होता आणि माझी राजकीय कारकीर्द जनतेच्या विकासाच्या मुद्यावर चालू राहावी म्हणून त्यांनी माझ्या या कारकीर्दीतच काम सुरू करायला लावले. आचारसंहिता संपल्यावर मी या कामासाठी राज्य शासनाकडून अजूनही मोठ्या प्रमाणावर निधी आणून हे काम युद्ध स्तरावर लवकरात लवकर पूर्णत्वास नेण्याचे मनोदय व्यक्त केला. तसेच परिसरातील २० किलोमीटर अंतरावरील सर्व शेतकरी बांधवांनी या तलावाच्या गाळाचा होत असलेल्या उपश्याचा फायदा घेत असून अजूनही गरजुंनी याचा फायदा घ्यावा, असे आवाहनही केले. तसेच नगरपरिषद च्या उपस्थित अधिकाऱ्यांना व संबधित कंत्राटदाराला त्यांनी काही मार्गदर्शक सूचनाही केल्या. यावेळेस त्यांचे समवेत भाजपा शहराध्यक्ष कैलासचंद्र काबरा,जितसिंहसाहू,हमीदप्यारेवाले,सदाशिव सूर्यतळ, संतोष टेकाळे,मनोज शर्मा, बाबा घुगे, संजय ढोके, शाम खंडेलवाल, रजनीश पुरोहित, नागेश बांगर आदी भाजपा कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.



**हिंगोली– येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघचा ३ दिवसीय निवासी प्रारंभिक वर्ग दिनांक ३ में ते ५ में ला संपन्न झाला. या वर्गामध्ये एकूण ३८ प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला. प्रशिक्षणार्थीना शारिरिक व बौद्धिक विकासासाठी वेग वेगळे कार्यक्रम घेण्यात आले. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### रूग्णवाहीकेवरील चालकाची आत्महत्या

हिंगोली– रूग्णवाहीकेवरील चालक सुनील नारायण शिंदे यांनी त्यांच्या रिसाला बाजार येथील घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. शिंदे हे २०१४ पासून कंत्राटी पध्दतीने रूग्णवाहीकेवर चालक म्हणून कार्यरत होते. दरम्यान सुनील यांनी चिठ्ठी लिहून आत्महत्या केल्याचे स्पष्ट झाले. यामध्ये त्यांनी जिल्हा व्यवस्थापक प्रमोद हिवराळे यांच्याकडून कर्तव्यावर नियुक्ती करणे तसेच इतर कारणावरून व कामावरून कमी करण्याची वारंवार धमकी देत असल्यामुळे आत्महत्या करत असल्याचे नमुद केले आहे. पोलिसांनी सदर चिठ्ठी चौकशीसाठी ताब्यात घेतली आहे. याप्रकरणी अनिल शिंदे यांच्या तक्रारीवरून जिल्हा व्यवस्थापक प्रमोद हिवराळे यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सपोनि गजानन मोरे हे करीत आहेत.

### बनावट सोने देऊन दुकानदाराची फसवणूक

हिंगोली– शहरालगत अकोला बायपास येथे सायकल दुकानदारास राजस्थानमधील जयपूर येथे बोलावून बनावट सोने देऊन २ लाख ८९ हजार रूपयांची फसवणूक केल्याप्रकरणी हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहीती अशी की, नामदेव कापसे यांचे अकोला बायपास येथे सायकलचे दुकान आहे. याच भागात राजस्थानातील संजय बघेल हा जेसीबी चालक म्हणून काम करीत होता. काही दिवसांपूर्वी त्याने नामदेव यांच्याशी ओळख करून मित्राकडे सोन्याची बिस्कीटे असून ती बिस्कीटे कमी किंमतीत देणार आहे असे सांगितले. त्यानंतर जयपूर येथील मित्रासोबत व्हिडीओ कॉलवरून सोन्याचे बिस्कीट देखील दाखवले. दरम्यान, सदर बिस्कीट नामदेव यांच्या फोन पे व गुगल पे खात्यावर एकदा ९० हजार रूपये तर दुसऱ्यावेळी ९९ हजार रूपये सोने देणाऱ्या व्यक्तीला पाठवले. त्यानंतर फेब्रुवारी महिन्यात जयपूर येथे येऊन सोने घेऊन जाण्यास सांगितले. त्यावेळी उर्वरित १ लाख रूपये आणण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार नामदेव हे फेब्रुवारी महिन्यात जयपूर येथे गेल्यानंतर त्याठिकाणी संजय बघेल आणि त्याच्या साथीदाराने नामदेव यांना एका जंगलात नेऊन त्याठिकाणी त्यांच्याकडून १ लाख रूपये घेतले. व सोन्याच्या बिस्कीटचा एक तुकडा त्यांना दिला. या बिस्कीटाचे वजन ३२ तोळे भरले होते. जयपूर येथून परत आल्यानंतर नामदेव यांनी सदर बिस्कीटच्या तुकड्याची एका मित्राकडून खात्री करून घेतली असता सदर बिस्कीटचा तुकडा सोन्याचा नसून पितळी असल्याचे स्पष्ट झाले. या प्रकारामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच नामदेव यांनी हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी संजय बघेल आणि त्याच्या साथीदाराविरूध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोनि विजय रामोड, सउपपोनि संतोष वाठोरे हे करीत आहेत.

### २९ वाहन चालकांविरूध्द कार्यवाही

हिंगोली– जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांतर्गत अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २९ वाहनचालकांवर पोलिसांनी कार्यवाही केली आहे. त्यांच्याकडून २९ हजार ८०० रूपयांचा दंडही वसूल करण्यात आला आहे. तसेच चार ठिकाणी भादवि २८३ अन्वये कार्यचाही केली आहे.

# पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल होऊनही आरोपी मोकाट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मे**

हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात एका पंधरा वर्षीय अल्पवयीन मुलीने एकाविरूध्द पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला परंतु अद्याप आरोपीला पोलिसांनी अटक केली नाही. आरोपी अल्पवयीन मुलीस जीवे मारण्याची धमकी देत असल्याची तक्रार मुलीच्या वडीलांनी पोलिस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

तालुक्यातील भांडेगाव येथील एका पंधरा वर्षीय अल्पवयीन मुलीने पंडीत आश्रूजी राजगुरू याच्याविरूध्द हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात पोक्सो कायद्यांतर्गत तक्रार देत गुन्हा दाखल केला आहे परंतु अद्याप आरोपीला ग्रामीण पोलिसांनी अटक केली नाही. उलट आरोपी हा अल्पवयीन मुलीस गुन्हा का दाखल केला असे म्हणत जीवे मारण्याची धमकी देत असल्याचे तसेच आरोपीला ग्रामीण पालिस पाठीशी घालत असल्याचे तक्रारीत नमुद करण्यात आले आहे. आरोपीमुळे संबंधित कुटुंबाच्या जीवीत्वाला धोका निर्माण झाला असून याप्रकरणी आरोपीवर तत्काळ कार्यवाही न केल्यास आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर मुनीर पठाण, ज्ञानेश्वर जगताप, गजानन जगताप, रामेश्वर मांदळे, विष्णू जगताप यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# कुऱ्हाडीचे वार करून मेहुण्याने केली भाऊजीची हत्या



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मे**

तालुक्यातील बोराळा येथे सासुरवाडीला गेलेल्या भाऊजीचा मेहुण्याने कुऱ्हाडीचे वार करून खून केल्याची घटना घडली आहे. मंगळवारी मध्यरात्री ही घटना घडली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली येथील संतोष बबन सराफ यांचा मागील आठ वर्षापूर्वी बोराळा येथे विवाह झाला होता. दि ६ मे रोजी संतोष हे बोराळा येथे सासुरवाडीला गेले होते. यावेळी रात्रीया सुमारास त्यांचा पत्नी सोबत वाद झाला होता. यावेळी त्यांचे सासरे, मेहुणा बाळू किशन देशमुख तेथेचे होते. यावेळी बाळु याने बहिणीचे भांडण होत असल्यने मागचा पुढचा विचार न करता कुऱ्हाडीने भाऊजी संतोष सराफ यांच्या डोक्यात घाव घातले. त्यानंतर हातावर, पायावर कुऱ्हाडीचे घाव घातले. यामध्ये संतोषचा जागीच मृत्यू झाला.

या घटनेची माहीती मिळताच हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विजय रामोड, जमादार आकाश पंडीतकर, प्रदीप राठोड, शंकर इडोळे, संदीप जाधव, चिभडे यांच्या पथकाने रात्री एक वाजता घटनास्थळी घाव घेतली.. पोलिसांनी घटनास्थळावर पाणी केल्यानंतर मयत संतोष यांचा मेहुणा बाळू यास ताब्यात घेतले. त्यानंतर संतोष सराफ यांचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी हिंगोली येथील सामान्य रूग्णालयात दाखल करण्यात आला. पोलिसांनी बाळू यांची अधिक चौकशी केली असता बहिणी सोबत भांडण करीत असल्याने भाऊजी संतोष यांचा खून केल्याची कबूली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# हिंगोलीत जागतिक परिचारीका दिनानिमित्त विविध कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मे**

जिल्हा सामान्य रुग्णालय येथे जागतिक परिचारिका दिनानिमित्त सप्ताह विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला.

यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस यांनी प्रसविका दिवस साजरा करण्याचे महत्त्व सर्व परिचारिका यानां देवुन माता बाल आरोग्य सेवा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्नशील असले पाहिजे याबाबत मार्गदर्शन केले. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ तडस अति. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ दिपक मोरे यांनी फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांच्या प्रतिमेचे पुजन करुन हिरवी झेंडी दाखवून रॅली काढण्यात आली. यावेळी प्रत्येक वार्ड मध्ये फळे वाटप करण्यात आले. माता बाल आरोग्य विषयक आरोग्य शिक्षण दिले. यावेळी डॉ. नितीन तडस, डॉ. दिपक मोरे, डॉ. भाकरे, डॉ. फैसल खान, नर्सिंग सुप्रिटेन्डन्ट बालासाहेब चिंचकर, सहायक सुप्रिटेन्डन्ट आशा क्षिरसागर, रागिणी जोशी, परिसेविका टापरे, बिना जॉर्ज, विणकरे, गायकवाड, सरोज दांडेकर, आशा कटके, कविता भालेराव, सविता पाईकराव, मोमले, सुनके, खंदारे, मनोरुग्ण तज्ञ परिचारिक सुनील दिंडे, पाठ्यनिर्देशक प्राचार्य शाम माळी, बनसोडे, हिनंमिरे, पवार, पाटील, बेलदार, बिराजदार आणि काशिदे, खंदारे, व सर्व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. प्रशिक्षणार्थीनी पोस्टर प्रदर्शित करुन आरोग्य शिक्षण दिले.

# अवैध रेती वाहतुक प्रकरणात उपविभागीय कार्यालयाची कारवाई



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मे**

उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी यांच्या पथकाने अवैध रेती वाहतूक प्रकरणात धडक कारवाई केली आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली उपविभागात अवैध गौणखनिज वाहतूक रोखण्यासाठी धडक कारवाई सुरू केली असून सदर कारवाईमध्ये लिंबाळा हुडी येथून अवैध रेती वाहतूक करणारे एक ट्रॅक्टर, तसेच बन येथून अवैध गौणखणीज वाहतूक करणारा रेतीने भरलेला एक टिप्पर, बन येथून अवैध वाहतूक करणारे रेतीने भरलेले दोन टिप्पर जप्त करून पोलीस स्टेशन सेनगाव येथे जमा करण्यात आले. उपविभागीय अधिकारी उमाकांत परधी यांच्या पथकानेही कार्यवाही केली आहे. सदरील कारवाईमध्ये अंदाजे साठ लाखाचा मुद्देमाल जप्त करून सेनगाव पोलीस स्टेशन यांच्या तब्यात देण्यात आला आहे.सदरील पथकामध्ये उमाकांत पारधी तहसीलदार सखाराम मांडवगडे, जी.डी.शिंदे मंडळ अधिकारी शेख अल्लाबक्ष, शिवानंद झोलगे,प्रदीप इंगोले, पंजाब होडबे,पुरूषोत्तम हेंबाडे, ज्ञानेश्वर खेलबाडे, श्रीमती सुनीता खंडारे, महेश गळाकाटू, प्रल्हाद घोडके यांचा समावेश होता. या कारवाईमुळे अवैध रेती वाहतुक करणाऱ्या माफीयांमध्ये खळबळ उडाली असून कारवाया नियमितपणे करणार असल्याचे पारधी यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सेवानिवृत्त कर्मचाऱ्यावर गोळीबार करून ४० हजाराची लुट

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ७ मे -**

बँकेच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यावर तीन गोळ्या झाडून अज्ञात चोरट्यांनी चाळीस हजार रुपये रोख आणि एक मोबाईल लुटून चोरटे दुचाकीवर फरार झाल्याची घटना आज दि. ७ मे रोजी शहरातील तरोडा नाका परिसरातील अष्टविनायक नगरात घडली.

स्टेट बँक ऑफ इंडियामधून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी तथा ज्येष्ठ नागरिक रविंद्र रामराव जोशी (६८) हे दुपारी तीनच्या सुमारास भावसार चौकातील स्टेट बँकेतून चाळीस हजार रुपये काढून पायी घरी जात असतांना अज्ञात दोन चोरट्यानी विनाक्रमांकाच्या स्कुटीवरुन त्यांचा पाठलाग केला. रविंद्र जोशी घराजवळ पोहचल्यानंतर सुरुवातीला दुचाकीवरील दोन युवकांनी त्यांना चाकूचा धाक दाखवून रक्कमेची मागणी केली. परंतु रविंद जोशी यांनी प्रतिकार केल्याने चोरट्यानी त्यांच्या जवळील बंदुकीतून तीन गोळ्या झाडल्या. यात रविंद्र जोशी यांच्या हाताला व पायाला गोळी लागल्याने खाली पडले. यावेळी चोरट्यांनी त्यांच्याजवळील रोख ४० हजार रुपये व एक मोबाईल घेऊन दुचाकीवरुन ते पसार झाले. घटनेची माहिती कळताच वरिष्ठ



पोलीस अधिकारी तसेच भाग्यनगरचे पोलीस पथक घटनास्थळी पोहंचले. रविंद्र जोशी यांना हातावर व पायावर गोळ्या लागल्याने त्यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय हे घटनास्थळी पोहंचले असून, त्यांनी घटनेचा पंचनामा तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरु केले आहे.

दरम्यान काही दिवस शहरात थांबलेले गोळीबाराचे सत्र पुन्हा एकदा सुरु झाल्याने नागरिक मात्र भयभित झाले आहेत.

### भगतसिंघ चौकात अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची वारंवार मागणी करुनही

# सार्वजनिक बांधकाम विभाग पाहतंय मोठ्या अपघाताची वाट

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ७ मे -**

शहरातील असर्जन परिसरात नव्याने असर्जन नाका ते हस्सापूर रोड हा मार्ग तयार करण्यात आला आहे. परंतु या मार्गावरील शहीद भगतसिंग चौक येथे अपघात टाळण्यासाठी कुठलीही उपाययोजना करण्यात आली नाही. वाहनधारक या मार्गावरून आपली वाहने भरधाव वेगाने नेत असल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असून बांधकाम विभागाने एखादा मोठा अपघात होण्यापूर्वीच या ठिकाणी अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करावी अशी मागणी वारंवार होत आहे. परंतु सार्वजनिक बांधकाम विभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्यामुळे बांधकाम विभाग मोठ्या अपघाताची वाट पाहत आहे की काय ? असा प्रश्न परिसरातील नागरिक उपस्थित करत आहेत.

असर्जन नाका ते हस्सापूर रोड या रस्त्याचे काम नव्यानेच करण्यात आले आहे. परंतु या मार्गावरील शहीद भगतसिंग चौक येथे अपघात रोखण्यासाठीची कुठलीही उपाययोजना करण्यात आली नाही. त्यातच या मार्गावरून रेती, मुरूम, माती आदींची मोठ्या प्रमाणात वाहतूक होते ही वाहतूक करणारे वाहनचालक भरधाव वेगाने



आपली वाहने नेत असल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या मार्गावर दररोज किरकोळ अपघात होत असून एखादा मोठा अपघात होण्यापुर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाने या ठिकाणी अपघात रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी होत असतांना सार्वजनिक बांधकाम विभाग याकडे दुर्लक्ष करीत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### बिलोली तालुक्यातील ग्रामस्थांनी फ्लोराईडयुक्त पाणी पिण्याचे टाळावे : डॉ. राजेश कुमार दारशी

**बिलोली -** तालुक्यातील विविध गावांमध्ये फ्लोराइड युक्त पाण्याच्या वापरामुळे दातांचे रोग मोठ्या प्रमाणात वाढत असून ग्रामस्थांनी फ्लोराइड युक्त पाणी पिण्याचे टाळावे असा सल्ला दंतरोग तज्ञ डॉ. राजेश कुमार दार्शी यांनी दिला. बिलोली तालुक्यातील आरळी येथील रुग्ण तपासणी कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी ललिता बंडे, पी.आर. मरखले यांची उपस्थिती होती. बिलोली तालुक्यातील विविध गावांमध्ये फ्लोराइड युक्त पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे येथील रुग्णांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. रुग्ण तपासणी कार्यक्रमात डॉक्टर राजेश कुमार दार्शी पुढे म्हणाले की, किनवट आणि बिलोली तालुक्यातील रुग्णांची दंतपंक्ती, दंत स्थिती पाहिल्यावर तेथील पाण्याचे स्थिती आपसूकच लक्षात येते. दात खराब होण्याबरोबरच हाडांचे रोगही मोठ्या प्रमाणात वाढतात. बिलोली तालुक्यातील विविध गावातील पाण्याची तपासणी करून त्यातील फ्लोराईडचे प्रमाण तपासण्याचे नितांत गरज असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### मुदखेड येथे संत शिरोमणी गोरोबा काका यांची पुण्यतिथी साजरी

**मुदखेड -** मुदखेड येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी स्वाभिमानी कुंभार समाजाच्या वतीने दि. ०६ मे रोजी श्री संत शिरोमणी गोरोबा काका यांच्या नियोजित जागेच्या ठिकाणी प्रतिमेचे पुजन करून ७०७ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. संत शिरोमणी गोरोबा काका यांच्या ७०७ व्या पुण्यतिथी निमित्ताने स्वाभिमानी कुंभार समाजाच्या वतीने महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता याप्रसंगी नागरिकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी स्वाभिमानी कुंभार तालुका अध्यक्ष विठ्ठल आचार्य, पुरभाजी तेलंगे, चंद्रकांत तेलंगे, लक्ष्मण देवडे, भगवान तेलंगे, गणेश तेलंगे, बळी पाटील शिंदे, गोविंद तेलंगे, संतोष रजारपल्लु, बालाजी तेलंगे, दशरथ तेलंगे, रामदास तेलंगे, गणेश देवडे, पांडुरंग तेलंगे, मारोती मोरताडे, कामुमामा मोरे, यासह आदिंची उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वाभिमानी कुंभार समाज बांधवांनी परिश्रम घेतला होता.

### जागतिक हास्य दिनानिमित्त शहरात भरला ऑनलाईन हास्य दरबार


**नांदेड -** येथील हास्यरंग हास्य क्लबच्या वतीने शहरातील मालेगाव रोडस्थित भावसार चौक परिसरात कवी, साहित्यिक तथा विचारवंतांचा ऑनलाईन पद्धतीने अतरंगी हास्य दरबार भरला. निमित्त होते जागतिक हास्य दिनाचे. या दरबाराच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत बालाजी थोटवे होते तर या हास्य दरबारात पांडुरंग कोकुलवार, प्रज्ञाधर ढवळे, मारोती कदम, सूनील काचमांडे, किशन राठोड, थोरात बंधू, ज्ञानोबा नरवाडे, शरदचंद्र हयातनगरकर, बालाजी थोटवे, मिनाक्षी गच्चे, शंकर गच्चे, सटवाजी माचनवार, अनुरत्न वाघमारे, नागोराव डोंगरे, प्रशांत गवळे, भैय्यासाहेब गोडबोले, कैलास धुतराज यांनी सहभाग घेतला. आजच्या धावपळीच्या आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या युगाल्या मानवी जीवनात माणूस माणसापासून दूर जात आहे. अनेक प्रकारच्या ताणतणांवामुळे हसणे तर दुरापास्तच होत चालले आहे. जागतिक हास्य दिन दरवर्षी मे महिन्याच्या पहिल्या रविवारी साजरा केला जातो. हा दिवस पूर्णपणे हसण्यासाठी समर्पित असतो. या दिवशी देश - विदेशात विविध प्रकारच्या विनोदी स्पर्धांचे आयोजन केले जाते. भारतात तर सततच्या ताणतणावांमुळे मनात टोकाचे विचार येतात आणि लोक आत्महत्या करतात. सर्व लोकांच्या मानसिक आणि शारीरिक विकासासाठी हसणे खूप फायदेशीर आहे. त्यामुळे येथील हास्यरंग हास्य क्लबच्या वतीने ऑनलाईन हास्य दरबार आयोजित करण्यात आला होता. यावेळी बोलतांना बालाजी थोटवे म्हणाले की, आयुष्यात माणसाने अधूनमधून मनमोकळेपणाने हसले पाहिजे. हसण्याचे काही फायदे पण आहेत. हसण्यामुळे वेदना कमी होतात तसेच शरीरातील स्नायूंचा ताण कमी होतो. अवयव उत्तेजित होतात तसेच हसल्याने शरीरातील रक्ताभिसरण चांगले राहते, ज्यामुळे तुम्ही हृदयविकार टाळू शकता. हसण्याने आपला मूडदेखील चांगला राहतो. थोड्या वेळासाठी का होईना पण आपण त्या तणावातून बाहेर येतो. आपलं दु:ख विसरतो. हसणे या मानसिक समस्यांना तोंड देण्यास आणि तुमचा स्वाभिमान सुधारण्यास मदत करते. तसेच चांगली झोप येणे, प्रतिकारशक्ती सुधारण्यासाठी मदत होते. यावेळी क्लब सदस्यांनी मोठमोठ्यांनी हसून हास्यदरबार संपविला.

### तामसा जिल्हा परिषद शाळेतील माजी विद्यार्थ्यांचे २५ वर्षानंतर गेट-टुगेदर

**तामसा -** तामसा येथील जिल्हा परिषद हायस्कूल मधील माजी विद्यार्थ्यांचे शनिवारी (ता.४) २५ वर्षानंतर गेटुगेदर झाले.वर्ष २००० च्या दहावी बॅचचे माजी विद्यार्थी आठवणींच्या हिंदोळ्यावर रमले होते. सुरुवातीला शाळेच्या प्रांगणात माजी विद्यार्थ्यांनी रांगेत उभे राहून सामूहिक राष्ट्रगीत गात वर्गखोल्यांमध्ये प्रवेश केला. यावेळी माजी शिक्षक धोंडोपंत भद्रे,संभाजीराव कल्याणे, दशरथ मेरगेवार, रमेशराव दुधमल, सुधीर गोळे, बबन घोडगे, विद्यमान मुख्याध्यापक सुरेश जोंधळे, शिक्षक मधूसूदन बिडकर,गजानन जाधव यांची उपस्थितिथी होती. माजी विद्यार्थ्यांनी बालपणीच्या शालेय आठवणीना उजाळा दिला. यावेळी माजी विद्यार्थीराहूल बिचेवार, गणेश काशीटवार, दत्ता फुले, सचिन शिबदरकर, धम्मदीप जाधव, मंगेश हनवते, व्यंकटेश बंडेवार, निलेश कदम, दिलीप मेहता,प्रभाकर कदम, प्रदीप वासकर, अफरोज पठाण,रचना काला, मीनाक्षी कदम, स्मिता शिंदे,रंजना तानुलवार, रश्मी कंठाळे, सुचिता तांदळे, गजाला शेख, अनिता देशमुख, दिपाली चव्हाण आदी उपस्थित होते.

# शिष्यवृत्ती परीक्षेत स्वराज मोकनपल्ले याचे यश

**उमरी -** राज्य शिक्षण परिषद पुणे मार्फत फेब्रुवारी २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता ५ वी ते ८ वी साठीच्या



शिष्यवृत्ती परीक्षेत यशवंत हायस्कूल उमरी येथील विद्यार्थी तथा तहसील कार्यालय येथिल लिपीक यांचे सुपुत्र स्वराज बालाजी मोकनपल्ले (इयत्ता ५ वी) हा विद्यार्थी राज्य शिक्षण परिषदेच्या शिष्यवृत्तीस पात्र झाला असून त्याच्या यशा बद्दल संस्थेचे सचिव शिरीष देशमुख गोरठेकर, संचालक कैलास देशमुख गोरठेकर,मुख्याध्यापक बी.जी.जाधव,पर्यवेक्षक, शिक्षकवृंद यांनी त्याचे व त्याच्या कुटुंबाचे अभिनंदन केले त्याच्या या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# जप्त रेती साठ्याचा ८ मे रोजी लिलाव

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, ७ मे -**

सन २०१९-२०२० मधील मौ. सांगवी व मेळगांव परिसरातील अवैध उत्खननातून ४६४७.८३ ब्रास जप्त रेती साठ्याचा सहाशे रुपये दराने लिलाव ८ मे रोजी सकाळी ११ तहसिल कार्यालय, नायगाव येथे करण्यात येणार आहे. जप्त रेती साठ्याचा लिलाव उपविभागीय अधिकारी बिलोली यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. लिलावाच्या अटी व शर्ती तहसिल कार्यालय, नायगाव (खै.) च्या नोटीस बोर्डवर लावण्यात आलेल्या आहेत. तरी इच्छूकांनी लिलावात सहभाग घ्यावा, असे तहसिलदार नायगांव (खै.) यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# सुप्रसिद्ध गायक संकल्प गोळे कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, ७ मे -**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सोहळ्या निमित सुप्रसिद्ध गायक संकल्प गोळे यांच्या भिमगीतांचा भव्य कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते राजू लांडगे व मित्रपरिवार यांनी केले होते.

दि. ६ मे रोजी जेतवन बुद्ध विहार गुरुवार बाजार सिडको येथे हा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस तथागत गौतम बुद्ध व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्धाटन भिकू संघाने केले तर अध्यक्षस्थानी पि.एस.गवळे होते. या कार्यक्रमास माजी नगरसेवक संदिप पाटील चिखलीकर, जितुसिंग टाक, गंगाधर वाघमारे,वैजनाथ देशमुख, संजय इंगेवाड, गजाननकहाळेकर,ब्रिजलाल उगवे,विठ्ठल गायकवाड, साहेबराव भंडारे, अशोक मगरे, विलास गजभारे,राजु निखाते,दैवशाला पांचाळ, सौ.भद्रे



यांच्यासह मान्यवराची उपस्थिती होती. प्रास्ताविक आयोजक राजु लांडगे,तर सुत्रसंचालन शाहीर गौतम पवार,यांनी केले. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजन समितीच्या वतीने व्यंकट इंगळे, प्रदिप हनवते, नितीन वाघमारे, डि. के.कांबळे, छोटु लांडगे, विजय करडे, अनिल बिरजे, रंजीतसिंह टाक, पप्पू गायकवाड, आशिष कदम, विशाल जोंधळे, रवी थोरात, दिलीप लांडगे, हर्षवर्धन झडते यांनी परिश्रम घेतले. सदरील जयंती सोहळ्याला सिडको हडको परीसरातील गोपाळ चावडी, राहुल नगर, वाघाळा, भिमवाडी, बळीरामपुर, वसरणी, विष्णुपुरी येथील समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थीती होती.

# खा. चिखलीकर व कुटुंबियांनी चिखली येथे बजावला मतदानाचा हक्क

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, ७ मे -**

जिल्ह्याचे खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी त्यांच्या मूळ गावी चिखली (ता कंधार) येथे सपत्नीक मतदानाचा हक्क बजवला तसेच त्याचे कुटूंब यांनी मतदान केले

लातूर लोकसभा मतदार संघात आज मंगळवारी ७मे रोजी मतदान होत आहे.लोहा विधानसभा क्षेत्राचा समावेश आहे. भाजपाचे खा. सुधाकर श्रुंगारे याना मतदानाची लीड मिळावी यासाठी खा. अशोक चव्हाण, खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी सर्कल निहाय जाहीर सभा घेतल्या असेच प्रतापराव पाटील हे दीड महिण्यापासून प्रचारात होते त्यांनी नांदेड येथील मतदान संपल्या नंतर विधानसभा मतदारसंघात प्रचारासाठी बैठका घेतल्या. प्राणिताताई देवरे यांनी गावोगावी जाऊन लोकांना पंतप्रधान मोदी यांनी केलेला विकसा तसेच भाजपा पक्षाची ध्येयधोरणे सांगितले. प्रवीण पा. चिखलीकर यांनी निवडणूकीचे नियोजन केले. त्यामुळे कार्यकर्त्यांनी शेवटच्या टप्प्यात जोमाने प्रचार केला.

जिल्ह्याचे खा. प्रताप पा. चिखलीकर, सुविद्य पत्नी प्रतिभाताई यांनी चिखली (ता



कंधार) या मूळ गावी मतदान केले.प्राणिताताई देवरे चिखलीकर, प्रवीण पाटील चिखलीकर, वैशालीताई चिखलीकर, प्रतापरावाचे बंधू श्याम पाटील चिखलीकर, चिरंजीव डॉ प्रमोद सचिन पाटील चिखलीकर, माजी पंचायत समिती सदस्या ललिताबाई चिखलीकर, तसेच सुना, नातेवाईक असा परिवार एकत्रित येऊन त्यांनी मतदान केले. त्यांनी अनेक मतदान केंद्रांना भेटी दिल्या.

**खा श्रुंगारेच विजयी होणार : चिखलीकर**

लातूर लोकसभा मतदार संघात देशाचे खंबीर नेतृत्व मोदीजी याना पुन्हा पंतप्रधान करायचे आहे असा याचा निर्धार येथील मतदारांनी केला आहे खा.शुगारे यांनी या भागात निधी दिलाच शिवाय लोहा विधानसभा क्षेत्रात भाजपला लीड मिळणार असून लातुर मध्ये भाजपा चा विजय निश्चित आहे असा विश्वास प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी व्यक्त केला.

# बिलोली येथील उत्पादन शुल्क विभाग असून अडचण नसून खोळंबा

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली, ७ मे -**

बिलोली येथील उत्पादन शुल्क विभाग असून अडचण नसून खोळंबा बनला आहे. या कार्यालयाने महसुला शिवाय आपल्याला मिळणारा मासिक लाभ याकडे अधिक लक्ष देतानाचे चित्र दिसून येत आहे.

बिलोली येथे उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय केवळ शोभेची वास्तू बनून उभे असल्याची बाब स्थानिक नागरिकांनी वारंवार प्रशासनाच्या लक्षात आणून दिली आणि सुधारणा करण्याची अपेक्षा व्यक्त केलेली आहे. उत्पादन शुल्क विभाग आपला महसूल मिळवण्यापेक्षा आपला मासिक हप्ता मिळवण्याकडे अधिक भर देत असल्याचे चित्र दिसून येत आहे. ही बाब उत्पादन शुल्क विभागाच्या वरिष्ठांना लक्षात आणून दिल्यानंतरही याचा या विभागावर काहीही परिणाम झाल्याचे चित्र दिसून आलेले नाही. याउलट आदमपूर, रामतीर्थ, आरळी आणि सगरोळी आणि सगरोळी फाटा येथे आणि परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध शिंदि आणि दारू विक्री मोठ्या प्रमाणात सुरू करण्यात आलेली आहे. उत्पादन शुल्क विभागाच्या मुक संमतीने सुरू असलेल्या या कारभारास पोलिसांनी आपली चीरीमिरी घेऊन अभय दिले आहे. अशी तक्रार गंजगाव आणि येसगी येथील ग्रामस्थांनी एका निवेदनाद्वारे प्रशासनाकडे केली आहे. उत्पादन शुल्क विभाग महसूल विभाग आणि पोलीस विभागाच्या वरिष्ठांनी याबाबत यथायोग्य पाऊल उचलावे. बरबाद होणारी युवा पिढी यांचे भविष्य आणि आरोग्य सांभाळावे. अवैध शिंदि, दारू विक्री यावर आळा घालावा अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.



मुदखेड - स्वाभिमानी कुंभार समाजाच्या वतीने श्री संत शिरोमणी गोरोबा काका यांच्या नियोजित जागेच्या ठिकाणी प्रतिमेचे पुजन करून ७०७ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

# महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त आरोग्य व रक्तदान शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**फुलवळ, ७ मे -**

कंधार कंधार तालुक्यातील कवठा येथे महात्मा बसवेश्वर विचारमंचाच्या वतीने आणि जिल्हा शाखेच्या वतीने महात्मा बसवेश्वर जयंती दिनी १०मे रोजी सकाळी ८.००वाजता कौठा येथे महात्मा बसवेश्वर यांना अभिवादन करून नंतर आरोग्य व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

आरोग्य व रक्तदान शिबिरामध्ये डॉ. विवेक टापरे दंतरोग तज्ञ, डॉ. रमेश वटमे हाडाचे डॉक्टर, डॉ. विभुते डोळे विकार तज्ञ, डॉ. विवेक कल्याणकस्तुरे दंतरोग तज्ञ, डॉ राम गुंडरे उच्च रक्तदाब व मधुमेह तपासणी तज्ञ, डॉ नागेश पांडागळे बालरोगतज्ञ, डॉ शिल्पा बोमनाळे वंधत्व निवारण, दुर्बिन शस्त्रक्रिया व आईवीएफ तज्ञ, डॉ संतोष बोमनाळे बालरोग तज्ञ, डॉ किरण भाले जनरल फिजिशियन हे सेवा देणार आहेत.

सर्व बंधू-भगिनींनी अभिवादनास उपस्थित राहावे. गरजूंनी आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा. इच्छुकांनी रक्तदान करावे असे आवाहन महात्मा बसवेश्वर विचार मंचाचे मुख्य मार्गदर्शक पूर्व शिक्षण संचालक गोविंद नांदेडे ,मार्गदर्शक समिती सदस्य सूर्यकांत विश्वासराव, शेषेराव शेटे, धोंडीराम मुस्तापुरे, आनंदराव पांडागळे, निळकंठ चोंडे, बाबुराव कैलासे, बाबुराव फसमले, रमाकांत पाटील, बालाजी पचलिंग, बालाजी पांडागळे, गंगाधर मंगनाळे, दत्तप्रसाद पांडागळे, मल्लिकार्जुन जोडराणे, विष्णुकांत लांडगे, वैजनाथ मिसे, वैजनाथ पसरगे, नरसिंग सोनटक्के, चंद्रकांत गोंड, शिवकुमार मुंडकर, अशोक कोळगावकर ,जिल्हाध्यक्ष बळवंत मंगनाळे, जिल्हा सरचिटणीस प्रमोद पाटील, कार्याध्यक्ष सचिन पाटील, कोषाध्यक्ष नागनाथ गाभणे ,सह कोषाध्यक्ष संतोष किडे आदींनी केले आहे.

# देगलूर दुय्यम निबंधक कार्यालयात दलालांचा सुळसुळाट

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, ७ मे -**

येथील दुय्यम निबंधक कार्यालयात दलालमार्फत कामे होतं असलायचे चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन कराव लागतं आहे.

जमीन, फ्लॅट, बंगले खरेदी-विक्री दस्त नोंदणी करणारे अधिकारी, कर्मचारी आणि एजंटांमुळे दुय्यम निबंधक कार्यालये भ्रष्टाचाराची कुरणे बनली आहेत. ऑनलाइन दस्त नोंदणीचा सर्व्हर सातत्याने डाउन होत असला तरी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे खाऊगिरीचे मीटर फास्ट असल्याचे सार्वत्रिक चित्र पाहायला मिळत आहे. दलाल, एजंटामार्फत गेल्यास दस्त नोंदणी वेळत होत असल्याने सर्वसामान्य लोक एजंटाकडे जातात. त्यामुळे अधिकारी कर्मचा-यांपेक्षा दलाल व एजंटांशिवाय निबंधक कार्यालयातील पानही हालत नाही, अशी स्थिती आहे.

जमीन, शेती, प्लॉट, बंगला खरेदी-विक्रीच्या व्यवहारावर सरकारकडून स्टॅम्प ड्युटी आकारली जाते. हे व्यवहार दुय्यम निबंधक कार्यालयाकडून केले जातात. गेली पाच वर्षे ही प्रक्रिया ऑनलाइन झाली असली तरी भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी झालेले नाही. स्टॅम्प ड्युटी चलनाद्वारे भरून घेतली जाते, तर दस्त नोंदणी ऑनलाइन पद्धतीने केली जाते. दस्त नोंदविताना विक्री करणारा, खरेदी करणारा, दोन साक्षीदार यांची उपस्थिती असते. एजंट अथवा दलालामार्फत न जाता एखादी व्यक्ती दस्त नोंदणीसाठी कार्यालयात गेल्यास कर्मचारी, अधिकारी त्रुटी काढून अडचणी निर्माण करतात. दस्त नोंदणी लवकर व व्यवस्थित व्हावे यासाठी सर्वसामान्य लोक एजंटाकडे जातात. त्यामुळे दुय्यम निबंधक कार्यालयात कर्मचारी व दलालांची साखळी निर्माण झाली आहे. त्यामुळे निबंधक कार्यालयातील 'कारभार' जणू दलाल व एजंटांच्या हातात गेलाय की काय असे वाटते

ऑनलाइन दस्त नोंदणी प्रक्रिया राबविण्यासाठी प्रत्येक दुय्यम निबंधक कार्यालयात २०१२ पासून कंपन्यांना ठेका दिला आहे. कंपन्यांनी नियुक्त केलेले उमेदवार किंवा ऑपरेटर ऑनलाइन दस्त नोंदणीचे काम करतात. गेली काही वर्षे ऑपरेटर हे दलाल, एजंट आणि कर्मचारी, अधिकाऱ्यांसाठी दुवा म्हणून काम करत आहेत. प्रत्येक दस्त नोंदणीसाठी तीन हजार रुपयांपासून पाच हजार रुपये जादा घेतले जातात. लाच घेतलेल्या रकमेची वाटणी शिपायापासून अधिकाऱ्यांपर्यंत ठरलेली तर नाही ना? जे काम नियमानुसार होत




नाही, त्या दस्त नोंदणीचे दर अव्वाच्या सव्वा असतात. हे व्यवहार कार्यालयाच्या बाहेर होतात.

देगलूर येथील दुय्यम निबंधक कार्यालय दलालामार्फत सुरू आहे. नागरिकांची आर्थिक लूट होत आहे. जमीन खरेदी विक्रीसाठी नागरिकांना हजारो रुपये मोजावे लागत आहेत. अधिक मूल्यांकन दाखवून भाव केले जातात असल्याचा प्रकार बेफिकिरपणे सुरू आहे. एवढेच नसून खरेदी किंवा विक्री दाराच्या व साक्षीदाराच्या सह्या घेण्यासाठी सुद्धा नागरिकांना पैसे मोजावे लागतं आहे तसेच एखादी फाईल पुढे लवकर पाठवायचे असेल तर अगोदर असलेले कागदपत्र बाजूला करून ज्या कागदपत्रावर पैशाचं ओझं जास्त आहे ती कागदपत्र लवकर पुढे ढकलली जात असून याबाबत सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.